सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, १३ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १३५ । पाने १२ । किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

आजचा सामना
TATA IPL
RAJASTHAN ROYALS vs SUNRISERS
राजस्थान वि. हैदराबाद
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : हैदराबाद

# अलवार सुरांची 'आशा' निमाली

● बहुआयामी प्रतिभेने घडवली पार्श्वगायनाची नवी व्याख्या ● ब्रीच कॅण्डी रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास



**मुंबई, १२ एप्रिल**

आपल्यान बहिणीच्या महानतेच्या सावलीत केवळ टिकूनच न राहता, आपल्या अलवार सुरांच्या बळावर त्या सावलीतून बाहेर पडून हिंदी पार्श्वगायनाच्या क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र विश्व निर्माण करणाऱ्या महान गायिका आशा भोसले यांचे रविवारी निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना छातीचा संसर्ग आणि थकव्यामुळे शनिवारी सायंकाळी ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, असे त्यांची नात जनाई भोसलेने सांगितले.

१९४९ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी गणपतराव भोसले यांच्याशी विवाह करणाऱ्या आणि पुढे जाऊन आपले सहकारी आणि संगीतकार आर. डी. बर्मन यांच्या लग्न करणाऱ्या आशा यांच्या पश्चात त्यांचा मुलगा आनंद आणि नातवंडे असा परिवार आहे.

*(शेवटच्या पानावर ▸*

### मीनाकुमारी ते उर्मिला मातोंडकर

आशा भोसले यांनी आपला आवाज आघाडीच्या अभिनेत्री मीनाकुमारी, मधुबाला, झीनत अमान, काजोल ते उर्मिला मातोंडकर आणि दक्षिणेतील अभिनेत्री पद्मिनी आणि वैजयंतीमाला यांना दिला होता.

### दुबईतील 'आशा ॲट रेट ९०' कॉन्सर्ट

आशा भोसले या चैतन्याचा वाहता झरा होत्या. त्यांनी २०२३ मध्ये वयाच्या ९० व्या वर्षी दुबईत लाईव्ह कॉन्सर्ट केला होता. ९० व्या वाढदिवसानिमित्त केलेल्या या विशेष कार्यक्रमाचे नाव 'आशा ॲट रेट ९० : लाईव्ह कॉन्सर्ट' असे होते. ■

**मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं... (अग्रलेख)**

**आशा भोसले विशेष (पान ३ व ६ वर)**

> भारताच्या ख्यातनाम गायिका आशा भोसले यांच्या निधनामुळे देशाच्या संगीत क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक दशकांपर्यंत, आपल्या समर्पणशक्तीच्या आणि चित्रपट माध्यमाच्या जोरावर त्यांनी आपल्या कालातीत गीतांच्या माध्यमातून जनमनोरंजन क्षेत्रावर एक अमिट छाप उमटवली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. भारताचा सांस्कृतिक वारसा आणि देशाचे देशभक्त यांच्याप्रती असलेली त्यांची निष्ठा सातत्याने आणि स्पष्टपणे दिसून येत असे. या अतुलनीय योगदानासाठी त्यांना सदैव अत्यंत आदराने स्मरले जाईल. ॐ शांती.
>
> **- डॉ. मोहनजी भागवत,** रा. स्व. संघाचे सरसंघचालक

# महिला आरक्षण विधेयकासाठी भाजपाचा व्हीप जारी

**नवी दिल्ली, १२ एप्रिल -**

संसदेचे १६ ते १८ एप्रिल दरम्यान विशेष अधिवेशन होणार असून, त्यात महिला आरक्षण सुधारणा विधेयकावर चर्चा केली जाईल. भाजपाने आपल्या खासदारांसाठी व्हीप जारी केला आहे. त्यानुसार अधिवेशनाला सर्व खासदारांना उपस्थित राहणे अनिवार्य असेल. संसदेच्या विशेष अधिवेशन काळात कोणत्याही खासदाराला किंवा केंद्रीय मंत्र्याला रजा दिली जाणार नाही, असे पक्षाने स्पष्टपणे निर्देश दिले आहेत. सर्व सदस्यांना सभागृहात सतत उपस्थित राहून संसदेच्या कामकाजात सक्रिय सहभागी होण्यास सांगितले आहे. महिला आरक्षण सुधारणा विधेयकावर चर्चा करण्यासाठी हे विशेष संसद अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या ऐतिहासिक विधेयकावरील व्यापक चर्चेची प्रक्रिया आणि पुढील प्रगतीला गती देणे, हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

दरम्यान, विरोधी पक्षांनी सरकारकडे अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक बोलावून मतदारसंघ पुनर्रचनेसारख्या मुद्द्यांवर स्पष्ट माहिती देण्याची मागणी केली आहे. विरोधी पक्षांना विश्वासात न घेता विशेष संसदीय अधिवेशन बोलावण्यात आले आणि चर्चे साठी आवश्यक असलेले म हत्त्वाचा तपशील अद्याप अस्पष्ट असल्याचा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी केला. तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा खासदार डेरेक ओब्रायन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेची थट्टा केल्याचा आरोप करत जोरदार हल्ला चढवला.










## महत्त्वाचे

### चार फलंदाज बाद होण्याने सामन्याला वळण



**चेन्नई** : येथे चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यात सलग चार षटकांत चार गडी गमावणे हा सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. त्यामुळे आमच्या संघाला २३ धावांनी पराभव पत्करावा लागला, असे मत दिल्ली कॅपिटल्सचे क्रिकेट संचालक वेणुगोपाल राव यांनी व्यक्त केले. २१३ धावांचे लक्ष्य गाठताना, दिल्ली कॅपिटल्सने ४.५ षटकांत बिनबाद ६१ धावा केल्या होत्या, परंतु केएल राहुल (१८), पथुम निस्संका (४१), अक्षर पटेल (०१) आणि समीर रिझवी (०६) बाद झाल्यामुळे धावसंख्या ७६ धावांवर चार गडी बाद अशी झाली. सामन्यानंतर वेणुगोपाल यांनी पत्रकारांशी संवाद साधला ते म्हणाल की, मला वाटते आमच्या फलंदाजीत काहीतरी उणीव होती. चार षटकांत चार गडी गमावणे हा सामन्याचा टर्निंग पॉईंट होता. या फॉरमॅटमध्ये सातत्याने गडी बाद झाल्याने आमच्या संघाचे नुकसान झाले. दिल्ली कॅपिटल्सचे क्षेत्ररक्षणही खराब होते. त्यांनी आयुष म्हात्रेला धावबाद करण्याची संधी गमावली आणि संजू सॅमसनचा झेल सोडला, ज्याचा फायदा घेत सॅमसनने ५६ चेंडूंमध्ये नाबाद ११५ धावा केल्या.

### पंचांशी वाद घातल्याबद्दल नितीश राणाला दंड

**चेन्नई** : चेन्नई सुपर किंग्स विरुद्धच्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यादरम्यान चौथ्या पंचांशी वाद घातल्याबद्दल दिल्ली कॅपिटल्सचा फलंदाज नितीश राणाला त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. ही घटना १९ व्या षटकात घडली, जेव्हा पंचांनी ट्रिस्टन स्टब्सची ओले ग्लोव्हज बदलण्याची विनंती नाकारली. यामुळे राणा आणि पंच यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक उडाली. दमट हवामानामुळे जास्त घाम येत असल्याने स्टब्सने ग्लोव्हज बदलण्याची विनंती केली होती.राणा बाद झाल्यानंतरही चौथ्या पंचांशी वाद घालत होता, ज्यासाठी त्याला एक डिमेरिट पॉईंटही देण्यात आला. आयपीएलने एका निवेदनात म्हटले आहे की, दिल्ली कॅपिटल्सचा फलंदाज नितीश राणाला आयपीएल खेळाडूंच्या आचारसंहितेच्या श्रेणी १ चे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉईंट देण्यात आला आहे.राणा आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला, जे सामन्यादरम्यान अश्लील भाषेचा वापर करण्याशी संबंधित आहे, असे निवेदनात म्हटले आहे. राणाने आपला गुन्हा कबूल केला आणि सामनाधिकाऱ्याने दिलेली शिक्षा स्वीकारली. दरम्यान, चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार ऋतुराज गायकवाडला सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

# देशी गिल, विदेशी बटलर तळपले

## गुजरातचा जायन्टस्‌चा लखनौवर सोप्पा विजय

◆ **लखनौ, १२ एप्रिल**

ताज्या दमाची फौज असलेल्या गुजरातच्या संघाने सहजसोपा विजय साकारताना लखनौ संघाला सात गडी राखून पाणी पाजले. कर्णधार शुभमन गिल आणि जॉश बटलर यांनी शानदार फलंदाजी करीत अर्धशतके झळकावली. अवघ्या २८ धावा देत ४ गडी बाद करणारा प्रसिद्ध कृष्णा सामनावीर ठरला.

विजयासाठी आवश्यक असलेल्या १६४ धावांचा पाठलाग करताना सलामीवीर साई सुदर्शन आणि गिल यांनी सावध सुरूवात केली. साई सुदर्शन सहाव्या षटकात १५ धावा काढून बाद झाला. त्यानंतर गिल-बटलर जोडी मैदानावर जमली. या दोघांनी घाई न करता फलंदाजी करीत संघाची धावसंख्या सव्वासेच्या पलीकडे नेली. गिल ५६ तर बटलर ६० धावा काढून बाद झाले. तंबूत परतण्यापूर्वी या जोडीने संघाचा आणखी एक विजय निश्चित केला. वाशिंग्टन सुंदरने नाबाद २१ तर राहल तेवतीयाने नाबाद १० धावा काढत गुजरातला आठ चेंडू व सात गडी राखून विजय मिळवून दिला. लखनौकडून मोहम्मद शमी, प्रिन्स यादव आणि दिग्वेस राठी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.



तत्पूर्वी, एडम मार्करम, मिशेल मार्श, निकोलस पुरण आणि वृषभ पंत सारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू असलेल्या लखनौ जायंटस्‌ संघाची कामगिरी गुजरात संघासमोर ढेपाळली. २० षटकांत लखनौचा संघ १६४ धावाच काढू शकला.

मार्करम आणि मार्श यांनी डावाची सुरूवात केली. सलामी जोडीकडून मोठ्या धावसंख्येची अपेक्षा होती. मात्र, मार्श संघाच्या १४ धावा असताना प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर वॉशिंग्टन सुंदरकडे झेल देऊन बाद झाला. मार्शने कशाबशा ११ धावा काढल्या. यानंतर कर्णधार वृषभ पंत मैदानात उतरला. गुजरातच्या सर्वच गोलंदाजांनी अचूक मारा केल्याने धावा काढताना नाकीनाऊ आले. यातच पंत मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीवर तेवतीयाकडे झेल देऊन तंबूत परतला. त्याने ११ चेंडूत दोन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १८ धावा काढल्या. दोन बाद ४५ अशा स्थितीतून लखनौला मोठ्या भागीदारीची गरज असताना अनुभवी मार्करमला प्रसिद्ध कृष्णाने ३० धावांवर बाद केले. संघाच्या ६९ धावांवर मार्करम तर ७४ धावांवर आयुष बडोनीही बाद झाल्याने लखनौचा संघ अडचणीत आला. आता सर्व भिस्त निकोलस पुरण ,अब्दुल समद आणि मुकूल चौधरीवर होत्या. प्रसिद्धने आज फारच तिखट आणि अचूक मारा केला. बडोणीला अवघ्या ९ धावांवर बाद केल्यानंतर त्याने धोकादायक पुरणाही तंबूची वाट दाखविली. पुरण चांगलाच अडखळत होता. २१ चेंडू खेळूनही त्याला १९ धावाच काढता आल्या. त्यामध्ये दोन षटकारांचा समावेश आहे. मोक्याच्या वेळी फलंदाज तंबूत परत जात असल्याने संघ १५० धावाही ओलांडतो की नाही, अशी परिस्थिती असल्याने समद आणि मुकूल चौधरी यांना संयमी फलंदाजी करावी लागली. दोघेही प्रत्येकी १८ धावा काढून बाद झाले. तळाचे फलंदाज जॉर्ज लिंडे याने १६ तर मोहम्मद शमीने पाच चेंडूंमध्ये एक षटकार आणि एक चौकार हाणत १२ धावा काढल्याने लखनोने १६४ ही समाधानकारक धावसंख्या गाठली. (वृत्तसंस्था)

### कृष्णाचे चार बळी



गुजरातच्या कगिसो रबाडा वगळता सर्वच गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी केली. प्रसिद्ध कृष्णाने तर कमालच केली. त्याने चार षटकांमध्ये अवघ्या २८ धावा देत चार गडी बाद केले. मोहम्मद सिराज आणि रबाडाने प्रत्येकी एक तर अशोक शर्माने दोन गडी बाद केले. सिराजने चार षटकांमध्ये केवळ १९ धावा दिल्या. राशीद खानला गडी बाद करता आला नसला तरी त्याने चार षटकांत फक्त २५ धावा दिल्या. विशेष म्हणजे गुजरातच्या गोलंदाजांनी वाईडच्या रुपात फक्त दोन अतिरिक्त धावा दिल्या. कुणाही नोबॉल टाकला नाही.

# राजस्थान करणार का ‘सनरायझर्स’चा ‘सनसेट?’

## आज क्रिकेटप्रेमींना मेजवानी

◆ **हैदराबाद, १२ एप्रिल**

सध्या फॉममध्ये असलेला राजस्थान रॉयल्स संघ सोमवारी येथे इंडियन प्रीमियर लीगमध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्ध खेळताना अव्वल स्थानावरील आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

या हंगामात रॉयल्सने जवळपास प्रत्येक विभागात वर्चस्व गाजवले आहे. चार सामन्यांतील चार विजय त्यांचे वर्चस्व दर्शवतात. संघात एक धोकादायक आघाडीची फळी आणि अत्यंत संतुलित गोलंदाजी आक्रमण आहे.

संघाच्या यशामागे यशस्वी जयस्वाल आणि युवा वैभव सूर्यवंशी या स्फोटक सलामीच्या जोडीचा हात आहे, ज्यांनी पॉवरप्लेमध्ये सातत्याने प्रतिस्पर्धी संघाच्या गोलंदाजीना फोडून काढले आहे. जयस्वाल आणि सूर्यवंशी यांच्या स्फोटक फलंदाजीने त्यांना चालू हंगामातील सर्वात धोकादायक जोड्यांपैकी एक बनवले आहे. ध्रुव जुरेलने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करून संघाला स्थैर्य दिले आहे आणि संघाची लय कायम राखली आहे.



इशान किशन  रियान पराग

कर्णधार रियान परागच्या नेतृत्वाखालील मधल्या फळीची आतापर्यंत फारशी परीक्षा झालेली नाही. मात्र, मधल्या फळीतील फलंदाजांना आतापर्यंत मिळालेल्या मर्यादित संधींचा पुरेपूर फायदा घेता आलेला नाही आणि संघाच्या दमदार कामगिरीतील ही कदाचित एकमेव चिंतेची बाब आहे.

या हंगामात रॉयल्सच्या गोलंदाजीत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. गेल्या हंगामात गोलंदाजीतील अपयशामुळे नवव्या स्थानावर राहिल्यानंतर, त्यांनी अधिक शिस्तबद्ध आणि धोकादायक गोलंदाजी आक्रमण म्हणून पुनरागमन केले आहे.

याउलट, सनरायझर्स हैदराबादची कामगिरी अस्थिर राहिली आहे. संघ सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात अपयशी ठरला आहे. चारपैकी तीन सामने गमावल्यानंतर हा माजी विजेता संघ सहाव्या स्थानावर आहे. संघ आपल्या जुन्या रणनीतीवर ठाम आहे. जलद सुरुवातीसाठी ते ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा या स्फोटक जोडीवर अवलंबून आहेत, परंतु या दोघांनाही सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही.

कार्यवाहक कर्णधार इशान किशनसुद्धा त्याच्या सुरुवातीच्या खेळीनंतर फॉर्ममध्ये नाही. धावा करण्याची जबाबदारी प्रामुख्याने हेनरिक क्लासेनने उचलली आहे, ज्याने चार डावांमध्ये १८४ धावा केल्या आहेत आणि काही प्रसंगी सनरायझर्सला सामन्यात परत आणण्यात यश मिळवले आहे.

मात्र, गोलंदाजी हा संघाचा कमकुवत दुवा राहिला आहे आणि नियमित कर्णधार पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीमुळे संघाच्या समस्या अधिकच वाढल्या आहेत. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, हैदराबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



बंगळुरू येथे झालेल्या भारतातील सर्वांत मोठ्या ‘फिटनेस रेस’मध्ये सहभागी झालेल्या बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू आणि क्रिकेट खेळाडू हरमनप्रीत कौर

# तीन पराभवांनी खेळाडू थकले होते

## चेन्नईचे गोलंदाजी प्रशिक्षक सिमन्स यांची कबुली

◆ **चेन्नई, १२ एप्रिल**

सलग तीन पराभवांमुळे संघाच्या मनोधैर्यावर परिणाम झाला नाही, परंतु खेळाडू पराभवाने थकून गेले होते, अशी कबुली चेन्नई सुपर किंग्सचे गोलंदाजी प्रशिक्षक एरिक सिमन्स यांनी दिली.

पाच वेळच्या विजेत्या सीएसकेने दिल्ली कॅपिटल्सला २३ धावांनी पराभूत करून आपल्या पराभवाची मालिका खंडित केली आणि चालू हंगामात आपले खाते उघडले. सामन्यानंतर सिमन्स म्हणाले, आमचे खेळाडू हा सामना जिंकण्यासाठी खूप आतुर होते. मला वाटते की सलग तीन सामने गमावल्यानंतर आम्ही पराभवाने थकून गेलो होतो.

आज ड्रेसिंग रूममधील वातावरण खूप छान होते, पण ते कधीही वाईट नव्हते. मला वाटते की लोकांनी आरसीबी विरुद्धचा सामना पाहिला आणि विचार केला, अरे, आपण खूप मागे आहोत, पण आम्हाला कधीही तसे वाटले नाही.

सिमन्स म्हणाले, या स्पर्धेत लय मिळवणे आणि सकारात्मक राहणे खूप महत्त्वाचे आहे. या विजयानंतर संघातील वातावरण सकारात्मक आहे. पण त्याआधीही, सराव सत्रांदरम्यान खेळाडूंचा दृष्टिकोन चांगला होता.

मागील सामन्यांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता होती का, असे विचारले असता, सिमन्स म्हणाले, नाही, मला तसे वाटत नाही. मला म्हणायचे आहे की आत्मविश्वासाची कमतरता होती. पण क्षेत्ररक्षण अनेकदा संघाचा मूड ठरवते आणि जेव्हा सरफराजने हवेत झेल घेतला, तेव्हा संघाचे मनोधैर्य वाढले. या छोट्या गोष्टी खूप महत्त्वाच्या असतात.

संजू सॅमसनने ५६ चेंडूंमध्ये ११५ धावा केल्या, तर आयुष म्हात्रेनेही ५९ धावांची वादळी खेळी केली, ज्यामुळे सीएसकेने २ गडी गमावून २१२ धावा केल्या. जेमी ओव्हरटनच्या १८ धावांत चार बळींमुळे सीएसकेने दिल्ली कॅपिटल्सला १८९ धावांवर बाद केले.

सॅमसनचे कौतुक करताना सिमन्स म्हणाला, मला अनेक वर्षे एमएस धोनीसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. मी भेटलेल्या सर्वात शांत क्रिकेटपटूंपैकी तो एक आहे. संजू सॅमसन त्याच्यासारखाच आहे. तो खेळाकडे त्याच पद्धतीने पाहतो. मी त्याला कधीही अस्वस्थ पाहिले नाही. (वृत्तसंस्था)


ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# आयुष शेट्टीने पटकावले आशिया चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक

◆ **चीन, १२ एप्रिल**

बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदकासह पदार्पण करणाऱ्या आयुष शेट्टीचा प्रवास रविवारी पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात चीनच्या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या शी यु ची विरुद्ध २१-८, २१-१० अशा चुरशीच्या लढतीत पराभव झाल्याने संपुष्टात आला.

या वीस वर्षीय खेळाडूने या स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा पहिला भारतीय आणि पुरुष एकेरीमध्ये ६१ वर्षांनंतर अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला खेळाडू बनून इतिहास रचला. मागील फेऱ्यांमधील आपला वेग कायम ठेवण्यात शेट्टीला अपयश आले, कारण अनुभवी चिनी खेळाडू या भारतीय युवा खेळाडूसाठी खूपच कडवी झुंज ठरली. पहिल्याच गेममध्ये आघाडी घेतल्यामुळे शी ने आयुषला पुनरागमन करण्याची फारशी संधी दिली नाही.



दुसऱ्या गेममध्ये ७-२ अशी ५ गुणांची आघाडी घेत आयुषने दमदार सुरुवात केली, पण त्याला ती आघाडी टिकवता आली नाही, कारण चिनी खेळाडूने पुन्हा एकदा नियंत्रण मिळवत ७-७ अशी बरोबरी साधली आणि अखेरीस विजयावर शिक्कामोर्तब केले.

या स्पर्धेने या युवा खेळाडूची क्षमता आणि भारतीय बॅडमिंटनचे उज्ज्वल भविष्य सिद्ध केले. त्याने जागतिक क्रमवारीत पहिल्या, तिसऱ्या आणि सातव्या क्रमांकावर असलेल्या खेळाडूंना पराभूत करून जगातील अव्वल खेळाडूंपुढे गंभीर आव्हान उभे केले. (वृत्तसंस्था)

# तीन तासांच्या खराब खेळामुळे आम्हाला फटका : विशाल उप्पल

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

बिली जीन किंग कप (बीजेकेसी) टेनिस स्पर्धेच्या आशिया-ओशनिया गट आयमध्ये आपल्या संघाला तिसरे स्थान मिळाल्याबद्दल भारतीय कर्णधार विशाल उप्पलने पहिल्या दिवशीच्या तीन तासांच्या खराब खेळाला दोषी ठरविले. या पराभवामुळे भारताला वर्ल्ड ग्रुप प्लेऑफसाठी पात्र ठरण्याची संधी गमवावी लागली.

भारत गट आय मध्येच कायम राहील, तर अव्वल दोन संघ, थायलंड आणि इंडोनेशिया, प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत. आठवडाभरातील चढ-उतार असलेल्या कामगिरीवर भाष्य करताना उप्पल म्हणाला की, थायलंडविरुद्धची संथ सुरुवात एका कठीण सामन्यात महागात पडली. शनिवारी अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाला २-१ ने हरवल्यानंतर उप्पल म्हणाला, सर्वांत मोठा आनंद म्हणजे आम्ही कोरियाला हरवले. पण दुःखद गोष्ट ही आहे की आठवड्याच्या सुरुवातीला आम्ही तीन तास खराब टेनिस खेळलो, ज्यामुळे आम्हाला प्लेऑफ गमवावे लागले.



पात्र ठरण्याच्या मोठ्या आशांसह भारताने या स्पर्धेत प्रवेश केला होता, परंतु थायलंडविरुद्धचा पराभव त्यांना महागात पडला. उप्पल म्हणाला, मला आता खूप वाईट वाटत आहे. स्पर्धेपूर्वी आम्हाला माहीत होते की पात्र होण्यासाठी आम्हाला थायलंड आणि कोरियाला हरवावे लागेल. जर आम्ही पहिल्या दिवशी दोन-तीन तास खराब टेनिस खेळलो नसतो, तर चित्र वेगळे असते.

वैष्णवी अडकर थायलंडविरुद्ध पहिला एकेरी सामना हरली. त्यानंतर पावसामुळे बाधित झालेल्या दुसऱ्या एकेरी सामन्यात सहजा यमलापल्लीचा पराभव झाला. थायलंडने इंडोनेशियाला मागे टाकून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. भारतालाही इंडोनेशियाकडून निसटता पराभव पत्करावा लागला.

ज्येष्ठ खेळाडू अंकिता रैना म्हणाली की, क्रमवारी काहीही असली तरी देशासाठी खेळण्यात एक वेगळाच उत्साह असतो. अशा संधी वारंवार मिळत नाहीत. (वृत्तसंस्था)

# राजस्थान रॉयल्सचे व्यवस्थापक भिंदर वादाच्या भोवऱ्यात

**डगआऊटमध्ये फोन वापरून नियमांचे उल्लंघन**

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यादरम्यान संघाच्या डगआऊटमध्ये मोबाईल फोन वापरताना टीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्यामुळे राजस्थान रॉयल्सचे माजी संघ व्यवस्थापक रोमी भिंदर वादात सापडले आहेत.

ही घटना सर्वप्रथम एका सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरने इन्स्टाग्रामवर शेअर केली होती, परंतु शुक्रवारी गुवाहाटी येथे रॉयल्सच्या सहा गडी राखून झालेल्या विजयादरम्यान भिंदर मोबाईल फोन वापरत असल्याची पुष्टी झाली आहे. तडाखेबंद खेळाडू वैभव सूर्यवंशी त्यांच्या शेजारी बसला होता.



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) एका अधिकाऱ्यानेही भिंदर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याची पुष्टी केली आहे. ते म्हणाले, होय, भिंदर यांनी खेळाडू आणि सामना अधिकारी क्षेत्राच्या (पीएमओए) नियमांचे उल्लंघन केले आहे, कारण सामन्यादरम्यान डगआऊटमध्ये मोबाईल फोन वापरण्यास मनाई आहे.

आयपीएलच्या अधिकृत वेबसाइटवरील पीएमओए प्रोटोकॉल २०२६ नुसार, संघ व्यवस्थापक ड्रेसिंग रूममध्ये फोन वापरू शकतो, परंतु डगराऊटमध्ये नाही. भिंदर फ्रँचायझीच्या स्थापनेपासूनच तिच्याशी संबंधित आहे आणि तज्ज्ञांच्या मते, त्याला भ्रष्टाचारविरोधी नियमावलीची चांगलीच माहिती असायला हवी.

अधिकाऱ्याने सांगितले, हे अनवधानाने घडले असेल, परंतु नियमांचे उल्लंघन असल्याने कारवाई केली पाहिजे. सामनाधिकारी आणि एसीयू (भ्रष्टाचारविरोधी पथक) यांच्या अहवालाच्या आधारे ताकीद द्यायची की बंदी घालायची, हे ठरवले जाईल. याच्या आधारे आयपीएल नियामक परिषद निर्णय घेऊ शकते. सामन्यानंतर सूर्यवंशीने भिंदरचा उल्लेख आपला ‘स्थानिक मार्गदर्शक’ असा केल्याने त्याला आणखी चौकशीला सामोरे जावे लागू शकते. (वृत्तसंस्था)

# सविताच्या पुनरागमनामुळे भारताला दिलासा

## कर्णधार सलीमा आजारपणामुळे बाहेरच

◆ **बुएनोस आयर्स, १२ एप्रिल**

स्टार गोलकीपर आणि माजी कर्णधार सविता पुनिया १० महिन्यांनंतर राष्ट्रीय महिला हॉकी संघात पुनरागमन करणार आहे. सोमवारी येथे सुरू होणाऱ्या अर्जेंटिनाविरुद्धच्या चार सामन्यांच्या मालिकेत ती खेळणार आहे, पण कर्णधार सलीमा टेटे आजारपणामुळे खेळू शकणार नाही.

वैयक्तिक कारणांमुळे खेळापासून दूर राहिल्याने सविता जून २०२५ पासून कोणत्याही स्पर्धेत खेळलेली नाही, तर मिडफिल्डर सलीमा सध्या कांजण्यांमधून बरी होत आहे. एफआयएच नेशन्स कप, यावर्षी बेल्जियम आणि नेदरलँड्समध्ये होणारा एफआयएच हॉकी विश्वचषक आणि आशियाई खेळांच्या पृष्ठभूमीवर हा दौरा भारतासाठी महत्त्वाचा आहे.

भारतीय महिला संघ गुरुवारी संध्याकाळी अर्जेंटिनासाठी रवाना झाला. यापूर्वी, त्यांनी बंगळुरू येथे एका प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला होता.

हैदराबाद येथे झालेल्या २०२६ विश्वचषक पात्रता फेरीत उपविजेता ठरलेला भारतीय संघ आपली विजयी लय कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. सलीमाच्या अनुपस्थितीत, अनुभवी फॉरवर्ड नवनीत कौर या दौऱ्यावर संघाचे नेतृत्व करेल. नवनीतला तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नुकताच हॉकी इंडिया बलबीर सिंग सीनियर प्लेयर ऑफ द इयर पुरस्कार मिळाला आहे.

अनुभवी भारतीय गोलकीपर सविता पुनियाच्या पुनरागमनामुळे संघ लक्षणीयरीत्या मजबूत होईल. बिचू देवी खरिबाम तिच्यासोबत गोलकीपिंगची जबाबदारी सांभाळेल. नुकताच आपला २०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळलेली निक्की प्रधान आणि अनुभवी सुशीला चानू बचावफळीचे नेतृत्व करतील.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक स्योर्ड मारिन यांनी या दौऱ्याबद्दल सांगितले, आम्ही येथे २३ खेळाडूंसह आलो आहोत आणि प्रत्येकाला आपली प्रतिभा दाखवण्याची संधी मिळेल. आम्ही या दौऱ्याचा उपयोग विविध सांघिक संयोजन आजमावण्यासाठी आणि जिंकण्याचे मार्ग शोधण्यासाठी करू. जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या संघाविरुद्ध वैयक्तिक आणि सांघिक कामगिरी पाहण्यासाठी मी उत्सुक आहे. इशिका चौधरी, मनीषा चौहान, ज्योती आणि उदिता यांसारख्या खेळाडू देखील भारताच्या बचावफळीचा भाग आहेत. वरिष्ठ संघात निवड झाल्यामुळे लालथंतुलंगीलाही आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. सलीमा संघाबाहेर असल्याने, नेहा, वैष्णवी विठ्ठल फाळके आणि सुनेलिता टोप्पो यांच्यावर मिडफिल्डची जबाबदारी असेल.साक्षी राणा, ऋतुजा दादाशो पिसाळ, इशिका आणि दीपिका सोरेंग यांसारख्या खेळाडू आपली छाप पाडण्यासाठी आणि संघात आपले स्थान पक्के करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाहीत. बलजीत कौर, दीपिका आणि ब्युटी डुंगडुंग यांच्यावर फॉरवर्ड लाईनची जबाबदारी असेल. मुमताज खानचेही संघात पुनरागमन झाले असून, तिच्या उपस्थितीमुळे भारतीय संघाची गोल करण्याची क्षमता वाढेल. (वृत्तसंस्था)





# ‘जिंदगी इत्तेफाक है...’

आशा भोसले यांचा जन्म मंगेशकर कुटुंबातला असून त्यांना मास्टर दीनानाथांचा गाण्याचा वारसा मिळाला. ते कलाकार आणि गायक होते. लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर आदी भावंडांचे मार्गदर्शन व त्यांची साथ या सगळ्यांतून आशाताईंचा गळा घडत गेला. दीनानाथ मंगेशकरांचे वडील कऱ्हाडे ब्राह्मण आणि आई देवदासी होत्या. अशा अपत्यांना आता गोमंतक मराठा म्हणतात.

आशा भोसले यांनी चित्रपट गायनाची सुरुवात ‘माझा बाळ’ या चित्रपटातून केली. १९५० च्या सुमारास त्यांनी हिंदी चित्रपटांतही अनेक गाणी गायली खरी, पण ते चित्रपट विशेष गाजले नाहीत. त्या काळात हिंदी चित्रपटसंगीतावर लता मंगेशकर, शमशाद बेगम, गीता दत्त अशा गायिका राज्य करत होत्या. त्यामुळे आशाताईंना संधी मिळणे अवघड होते. या गायिकांच्या राज्यात राहून, गाऊन, आपले वेगळे अस्तित्त्व निर्माण करण्याचे, स्वतःला सिद्ध करण्याचे फार मोठे आव्हान आशाताईंपुढे होते. या दरम्यान त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी, मुलांची जबाबदारी, प्रतिकूल परिस्थिती या सगळ्या विपरीत घटकांशी सामना करत करत आशाताईंनी ते आव्हान स्वीकारले आणि ते स्वबळावर, आत्मविश्वासाने यशस्वीपणे पेलून दाखवले.

१९५७-१९५८ हे वर्ष आशा भोसले यांचेच होते. सचिन देव बर्मन यांच्याकडे गाण्याची संधी त्यांना मिळाली. त्या संधीचे त्यांनी सोने केले. ‘कालाबाजार’, ‘लाजवंती’, ‘नौ दो ग्यारह’, ‘चलती का नाम गाडी’, ‘सुजाता’ हे आणि असे असंख्य चित्रपट त्यांनी आपल्या आवाजाने अजरामर केले. पुढची पाच दशके आशाताईंनी गाजवली.

अनेक संगीतकारांबरोबर काम केले. अनेक कवींच्या काव्यरचनांना सुरांचे कोंदण दिले. एवढेच नाही तर आपल्या गाण्यांबरोबर त्या चित्रपटांना, त्यातल्या अभिनेत्रींनादेखील अजरामर केले.

ओ. पी. नय्यर आणि आशाताई एक अफलातून जोडी होती. १९६०च्या सुमारास नय्यर यांचे संगीत असणारे ‘आँखोसे जो उतरी है दिलमे’ (फिर वही दिल लाया हूँ ) हे गाणे; १९६५चे ‘जाइये आप कहाँ’ (मेरे सनम); १९६८ मधील ‘वो हसीन दर्द देदो’ (हम साया); ‘चैन से हमको कभी’ अशी अनेक प्रसिद्ध गाणी त्यांनी गायली.

हिंदीबरोबर आशा भोसलेंची मराठी गाण्यांची कारकीर्द बहरतच होती. सुधीर फडके, हेमंत कुमार, लता मंगेशकर, सुरेश वाडकर, अनुराधा पौडवाल अशा गायक-गायिकांबरोबरची गाणी मराठी रसिकमनात घर करून राहिली आहेत. बा. भ. बोरकर, आरती प्रभू, ग. दि. माडगुळकर, शांता शेळके, सुरेश भट, सुधीर मोघे यांच्या कवितांबरोबर सौमित्रसारख्या नव्या दमाच्या कवींच्या कविताही आशाताईंच्याच आवाजात रसिकांपुढे आल्या. सर्व कवींच्या शब्दांना आशाताईंनी सुरेल न्याय दिला. ‘तरुण आहे रात्र अजुनी’, ‘जिवलगा राहिले रे दूर’, ‘ही वाट दूर जाते’, ‘फुलले रे क्षण माझे’, ‘झिनी झिनी वाजे’, ‘गेले द्यायचे राहूनी’, ‘गंध फुलांचा गेला सांगून’, ‘आज कुणीतरी यावे’, ‘एका तळ्यात होती बदके’ अशा लोकप्रिय गीतांची यादी प्रचंड आहे.

हिंदी चित्रपट गीतांचा विचार करता आशा भोसले यांनी एस.डी.बर्मन यांच्यापासून ते ए.आर. रहमानपर्यंतच्या विविध कालखंडांतील, अनेक प्रकारच्या संगीतकारांबरोबर काम केले आहे. मराठीतही दत्ता डावजेकर-श्रीनिवास खळे यांच्यापासून ते श्रीधर फडके यांच्यापर्यंत असंख्य संगीतकारांच्या रचनांना त्यांनी सुरेल साज चढवला आहे. मधुबाला-मीनाकुमारीपासून ते अलीकडच्या तब्बू-उर्मिला मातोंडकर-ऐश्वर्या रायपर्यंतच्या अभिनेत्रींना त्यांनी आपला आवाज दिला आहे. त्यांनी मोहम्मद रफी, किशोर कुमार व सुधीर फडके यांच्याबरोबरचा काळ तर गाजवला आहेच, तसेच त्या आज हृषीकेश रानडे सारख्या तरुण गायकाबरोबरही गायले.



कॅनडा, इंग्लंड, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, स्विडन आदि अनेक देशांत झालेले कार्यक्रम, परकीय संगीतकारांबरोबर केलेले काम, ‘राहुल ॲण्ड आय’सारखा अल्बम, लेस्ली लुईबरोबरचे काम असे अनेक नवनवे प्रयोग आशा भोसले यांनी केले. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू ब्रेट ली, अभिनेता संजय दत्त यांच्याबरोबर गाण्याचा प्रयोग केला. ‘आशा ॲण्ड फ्रेन्ड्स’ या अल्बमचा हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला होता.



## अल्पपरिचय

**जन्म** : सांगली येथे ८ सप्टेंबर १९३३
**मृत्यू** : १२ एप्रिल २०२६
**निवासस्थान** : प्रभुकुंज अपार्टमेन्ट, पेडर रोड, दक्षिण मुंबई.
**कारकीर्दीचा काळ** : १९४३ पासून
**जोडीदार** : गणपतराव भोसले, दुसरा विवाह राहुलदेव बर्मन
**अपत्ये** : हेमंत, वर्षा, आनंद
**वडील** : दीनानाथ मंगेशकर
**आई** : शेवंती उपाख्य शुद्धमती मंगेशकर

“ आशा भोसले यांच्या निधनामुळे संगीतविश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक दिग्गज गायिका म्हणून त्यांच्या दैदीप्यमान कारकीर्दीने भारतातील संगीताचा एक संपूर्ण कालखंडच परिभाषित केला आहे. त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधल्याच्या माझ्या अनेक सुखद आठवणी आहेत. एक कलाकार आणि एक व्यक्ती म्हणून, त्या आपले आयुष्य आपल्या स्वतःच्या अटींवर जगल्या. आपल्या सुमधुर आणि कालातीत आवाजाने त्यांनी अनेक दशके भारतीय संगीताला समृद्ध केले. त्यांचे संगीत सदैव अजरामर राहील. मी त्यांच्या कुटुंबीयांना आणि असंख्य चाहत्यांना माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करते.

**- द्रौपदी मुर्मू,** राष्ट्रपती

“ भारतातील सर्वांत ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन. त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.

**-नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

“ भारतीय संगीत विश्वातील एक अत्यंत प्रतिष्ठित आणि दिग्गज व्यक्तिमत्त्व असलेल्या गायिका तथा पद्मविभूषण सन्मानप्राप्त आशा भोसलेयांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्याशी माझे अत्यंत जवळचे, कौटुंबिक ऋणानुबंध होते. त्यांच्या जाण्यामुळे भारताच्या संगीत क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे. आपल्या असाधारण प्रतिभेच्या जोरावर, आशा भोसले यांनी संगीत क्षितिजावर आपली एक आगळीवेगळी ओळख निर्माण केली. आपल्या सुमधुर आवाजाच्या जोरावर त्यांनी अनेक अजरामर चित्रपट आणि गीतांना अजरामर केले. ही गीते विविध युगांत आणि पिढ्यांमध्ये लोकप्रिय ठरली. यामध्ये ‘नया दौर’, ‘तीसरी मंझिल’, ‘हरे रामा हरे कृष्णा’ आणि ‘उमराव जान’पासून ते ‘इजाजत’ आणि ‘रंगीला’पर्यंतच्या चित्रपटांचा समावेश आहे. एक पार्श्वगायिका म्हणून त्यांनी असंख्य अविस्मरणीय गीते रसिकांच्या भेटीस आणली. त्यांचा आवाज आणि संगीत क्षेत्रातील त्यांचे अजोड योगदान येणाऱ्या अनेक पिढ्यांपर्यंत स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या दिवंगत आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या शोककुल कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो. ॐ शांती.

**- नितीन गडकरी,** केंद्रीय मंत्री

“ आशा भोसले या देशातीलच नाही तर संगीत विश्वातील सिद्धहस्त आणि प्रतिभासंपन्न पार्श्वगायिका होत्या. आपल्या अवीट स्वरांनी, विविध संगीत प्रकार लीलया गाण्याच्या क्षमतेने आणि संगीतातील व्यापक योगदानामुळे त्यांनी संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य केले. आपल्या जवळपास आठ दशकांच्या सांगीतिक कारकीर्दीत त्यांनी विविध भाषा व संगीत प्रकारांमध्ये असंख्य अजरामर गीते सादर करून भारताच्या सांस्कृतिक परंपरेला समृद्ध केले. आशाजींची भावोत्कटता व कलेप्रती बांधिलकी भावी पिढ्यांमधील कलाकार आणि रसिकांना प्रेरणा देत राहील. ‘जो भी है बस यही एक पल है’ हे त्यांचे गाजलेले गीत त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान झाले होते. या दुःखद प्रसंगी मी महाराष्ट्रातील जनतेच्या तसेच आपल्या स्वतःच्या वतीने दिवंगत आशाजींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना तसेच संपूर्ण संगीत क्षेत्राला आपल्या शोकसंवेदना कळवतो.

**- जिष्णू देव वर्मा,** राज्यपाल

“ तीन वर्षांपूर्वी धडाक्यात नव्वदी साजरी करणाऱ्या ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशाताई भोसले यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांच्या निधनाने मंगेशकर घराण्यातील लतादीदींनंतर आणखी एक तारा निखळला आहे. सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली. आशाताईंचा आवाज म्हणजे संगीताचा आत्मा होता. गायनातील बारमाही हिरवा ऋतू आणि भावभावनांचा सुरेल असा महासागर म्हणजे आशाताई. ‘तोरा मन दर्पण कहलाए’ अशा भावपूर्ण गाण्यापासून ‘खल्लास’पर्यंत अनेक मूडची गाणी लीलया गाणाऱ्या आशाताई भोसले यांनी भक्तिगीत, भावगीत, नाट्यसंगीत, गझल, शास्त्रीय संगीत, रवींद्र संगीत, लोकगीते, पॉप असे अनेक संगीत प्रकारांचे गायन करताना त्यावर आपला वेगळा ठसा उमटवला. मराठी, हिंदी, बांगलासह २० भारतीय भाषा आणि विदेशी भाषांमध्ये १२,००० वर गाणी त्यांनी गायली. अलिकडेच जागतिक रेडिओ दिनाच्या कार्यक्रमात आम्ही सोबत होतो, त्यांनी आग्रह करून ‘अभी ना जाओ छोडकर...’ हे गाणे माझ्याकडून गाऊन घेतले होते आणि ‘पहा मी मुख्यमंत्र्यांना गाणे गायला लावले’, असे म्हणाल्याही होत्या. त्या आशाताईंचा सहवास आता आपल्याला लाभणार नाही, ही कल्पनाच करवत नाही.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

“ भारतीय संगीत सृष्टीतील अढळ ध्रुवतारा आणि आपल्या सुरावलींनी अवघ्या जगाला मोहिनी घालणाऱ्या पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांच्या निधनामुळे देशाने एक महान स्वरसम्राज्ञी गमावली आहे. गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या निधनानंतर आता आशाताईंच्या जाण्याने महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. आज प्रत्येक रसिकाच्या मनात एकच आर्त साद उमटत आहे, ‘अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नहीं.’ आशाताईंनी त्यांच्या गाण्यांनी आपल्याला इतके समृद्ध केले की, त्या कधीतरी आपल्याला सोडून जातील ही कल्पनाच सहन होत नाही. त्यांच्या आवाजातील तोच उत्साह आणि तीच तरलता आता पुन्हा कधीच ऐकायला मिळणार नाही. आशाताई म्हणजे केवळ एक गायिका नव्हत्या, तर त्या संगीतातील चैतन्याचा झरा होत्या. भक्तिगीत असो, लावणी असो किंवा पाश्चात्य ढंगाची गाणी, प्रत्येक सुरात त्यांनी स्वतःचा वेगळा ठसा उमटवला. सर्वाधिक गायनाचा विक्रम करून त्यांनी गिनीज बुक मध्ये आपले नाव नोंदवले.

**- एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

## मिळालेले प्रमुख पुरस्कार



- भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान दादासाहेब फाळके पुरस्कार-२०००
- भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा नागरी सन्मान पद्मविभूषण-२००८
- महाराष्ट्र भूषण-२०२१
- बंगा विभूषण- २०१८

### फिल्मफेअर पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिका- सात वेळा विजेत्या
- फिल्मफेअर विशेष पुरस्कार-१९९६
- फिल्मफेअर लाईफटाईम अचिव्हमेन्ट-२०२१

### राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

- दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार
- ‘दिल चीज क्या है’-उमराव जान (१९८१)
- ‘मेरा कुछ सामान’-इजाजत (१९८६)

### आंतरराष्ट्रीय आणि इतर पुरस्कार

- ग्रॅमी पुरस्कारासाठी दोन वेळा नामांकन
- बीबीसी लाईफटाईम अचिव्हमेन्ट अवॉर्ड-२००२
- एमटीव्ही अवॉर्ड- १९९७, २००१
- झी सिने अवॉर्ड, आयफा अवॉर्ड-२००२
- नाईटटिंगेल ऑफ एशिया अवॉर्ड -१९८७
- सिंगर ऑफ मिलेनियम- २००० दुबई

### इतर उल्लेखनीय कामगिरी

- महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार- १८ वेळा
- सर्वाधिक गाणी रेकॉर्ड करणाऱ्या कलाकार म्हणून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद





## अवघ्या दहाव्या वर्षी पहिले गाणे

आशा भोसले यांच्या दीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीची सुरुवात अतिशय लहान वयात झाली. त्यांचे पहिले गाणे १९५० मध्ये आलेला मराठी चित्रपट ‘माझा बाळ’ साठी होते. या चित्रपटातील ‘चला चला नव बाळा’ हे गाणे त्यांनी अवघ्या १० वर्षांच्या वयात गायिले.

त्या काळात त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कठीण होती, त्यामुळे लहान वयातच त्यांना गायन क्षेत्रात काम करावे लागले. त्यांच्या आवाजात नैसर्गिक गोडवा आणि लयबद्धता होती, ज्यामुळे हे पहिले गाणे लक्षवेधी ठरले. जरी सुरुवातीला त्यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली नाही, तरी याच गाण्यामुळे त्यांच्या कारकीर्दीची पायाभरणी झाली.

पुढे त्यांनी हिंदीसह विविध भाषांमध्ये हजारो गाणी गायली आणि जागतिक स्तरावर नाव कमावले. त्यामुळे ‘चला चला नव बाळा’ हे गाणे त्यांच्या संगीत प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा मानले जाते.



## ‘सावन आया’ने हिंदी पार्श्वगायनाला सुरुवात

आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायनाची पहिली संधी सहजासहजी मिळालेली नाही. साधारणपणे १९४८ मध्ये त्यांनी ‘चुनरिया’ या चित्रपटात ‘सावन आया’ हे पहिले हिंदी गीत गायिले, असे मानले जाते. त्या वेळी त्या फक्त १४-१५ वर्षांच्या होत्या.

या गाण्यामागील कथा खूप संघर्षमय आहे. मोठी बहीण लता मंगेशकर यांना मोठ्या चित्रपटांत संधी मिळत असताना, आशाजींना मात्र बी-ग्रेड चित्रपट, कमी बजेटची गाणी किंवा दुय्यम भूमिका असलेली गाणी मिळत होती.‘सावन आया’ हे गाणे त्यांनी अत्यंत कमी मानधनात रेकॉर्ड केले. त्या काळात त्यांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. अनेक संगीतकार त्यांना मुख्य गायक म्हणून संधी देण्यास तयार नव्हते. परंतु, या सुरुवातीच्या संघर्षामुळेच त्यांच्यात आत्मविश्वास आणि वेगळेपण निर्माण झाले. पुढे त्यांनी ओ. पी. नैयर, आर. डी. बर्मन यांच्यासोबत काम करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. थोडक्यात, आशा भोसले यांचे पहिले हिंदी गाणे हे त्यांच्या दीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीची सुरुवात होती, ज्याची पायाभरणी संघर्ष आणि चिकाटीवर झाली.



## मोठ्या संघर्षानंतर मिळाला ‘ब्रेक’

आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीत खूप संघर्ष केल्यानंतर मोठा ‘ब्रेक’ मिळाला. त्यामागे एक रोचक कहाणी आहे. लहान वयातच गाण्याची सुरुवात केलेल्या आशा भोसले यांना सुरुवातीला फार मोठ्या संधी मिळत नव्हत्या. त्या काळात लता मंगेशकर यांचे वर्चस्व होते, त्यामुळे निर्माते- दिग्दर्शक आशा यांना दुय्यम गाणी देत असत.

त्यांचा खरा ब्रेक १९५० च्या दशकात ‘सीआयडी’ या चित्रपटातून मिळाला. या चित्रपटाचे संगीत ओ. पी. नय्यर यांनी दिले होते. नय्यर यांनी आशा भोसले यांच्या आवाजातील वेगळेपणा ओळखला आणि त्यांना संधी दिली. ‘जरा हौले हौले चलो मोरे साजना’ सारखी गाणी लोकप्रिय झाली आणि आशा भोसले यांचे नाव लोकांच्या लक्षात आले.

यानंतर त्यांच्या कारकीर्दीला मोठे वळण मिळाले ते ‘नया दौर’ चित्रपटातून. या चित्रपटातील ‘उड़े जब जब ज़ुल्फें तेरी’ आणि ‘मांग के साथ तुम्हारा’ ही गाणी प्रचंड गाजली. यामुळे आशा भोसले हिंदी चित्रपटसृष्टीत एक प्रमुख गायिका म्हणून स्थापित झाल्या.

या यशामागे त्यांच्या मेहनतीसोबतच ओ. पी. नय्यर यांचा मोठा वाटा होता. त्यांनी आशा भोसले यांना वेगळी ओळख मिळवून दिली आणि त्यांच्या करिअरला नवी दिशा दिली. संघर्षातून पुढे येत ‘सीआयडी’ आणि ‘नया दौर’ या चित्रपटांनी आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीत खऱ्या अर्थाने ‘ब्रेक’ मिळवून दिला.



## संगीताच्या प्रत्येक युगाची ‘आशा’

### २० भाषा, १२ हजारांवर गाणी आणि सुरांची बाग!

भजनांपासून कव्वालीपर्यंत, कॅब्रेपासून भावगीतांपर्यंत, गजलांपासून पॉपपर्यंत, तामिळ-तेलुगूपासून बंगाल उर्दूपर्यंत... भारतासह जगभरातील संगीतक्षेत्रात गेल्या आठ दशकात आलेल्या प्रत्येक नव्या युगाची ‘आशा’ निमाली. वयाच्या दहाव्या वर्षी एका मराठी गीताने सुरू झालेला प्रवास ९२ व्या वर्षी पूर्ण झाला. लो बजेट चित्रपटांसाठी गाणारी, लतादीदींच्या प्रभावाखाली काहीशी दबलेली आशा, स्वतःच्या गायकीवर काम करत गेली आणि आज गाण्यांचा विश्वविक्रम करून अजरामर झाली.

एका मुलाखतीत आशाताई म्हणाल्या होत्या, विचार केला की,मी दीदीसारखीच गात राहिले तर माझी स्वतःची ओळख कधीच निर्माण होणार नाही. स्वतःच्या गायकीमध्ये विविध शैली आणण्याचा सराव केला. इंग्रजी चित्रपट बघून त्या गाण्यांचा अवाका लक्षात घेतला. वेस्टर्न गायकी समजून घेतली. हिंदीसोबत उर्दू उच्चारांचा सराव केला. आवाजात गाण्याच्या गरजेनुसार बदल करण्यास शिकले. त्यांच्या या अभ्यासाचा परिणाम म्हणून २० पेक्षा जास्त भारतीय आणि इतर भाषांमध्ये १२ हजारांवर गाणी गायल्याचा विक्रम आशाताईंच्या नावे झाला. यात सर्व प्रमुख भारतीय भाषांसोबतच नेपाळी, मल्याळी, रशियन, झेक भाषांमध्येही त्या गायल्या आणि रसिकांनीही गाणी उचलून धरली. विशेषतः ‘बो डाऊन मिस्टर’साठी बॉय् जॉर्जसोबत गायलेल्या गीताने त्यांच्या चाहत्यांचा विस्तार पाश्चिमात्त्य देशांमध्ये झाला. ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालेल्या पहिल्या भारतीय गायिका आशाताई जगातील सर्वाधिक स्टुडिओ रेकॉर्डिंग झालेल्या गायिका आहेत आणि हा विक्रम गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्‌मध्ये त्यांच्या नावे कायम आहे. वर्ष २०११ मध्ये हा विक्रम नोंदविण्यात आला.

तत्पूर्वी, बॉलिवूडमधील सर्वाधिक प्रयोगशील दशक १९७० मध्ये आशा भोसलेंच्या खट्याळ, मादक आणि स्टायलिश आवाजाने लोकांना वेड लावले. ८० च्या दशकात‘उमरावजान’प्रदर्शित झाला आणि आशाच्या शास्त्रीय गायकीने सगळे अंदाज साफ चुकवले. ९० च्या दशकात रेकॉर्डिंगचे तंत्रज्ञान बदलले पण, आशाताईंची ‘इंडी पॉप’मधील लोकप्रियता निःशंक होती.

दैवी देणगी असलेल्या आवाजाला त्यांनी परिश्रमाने पैलू पाडले आणि त्या अंतिम गाणे २०२२ मध्ये प्रदर्शित ‘लाईफ इज गुड’ या चित्रपटासाठी गायल्या. आशाताईंच्या गाण्यांचा स्वॅग प्रत्येक पिढीतील संगीत प्रेमींसाठी आदर्श ठरणार आहे. गाण्यापूर्वी भाषेचा अभ्यास आणि शब्दांच्या उच्चारावर घेतलेले श्रम आशा भोसले यांचे कर्तृत्त्व ऐतिहासिक ठरवतात.



## अमरावती विद्यापीठाने दिली होती ‘डी. लिट.’




कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांच्या हस्ते ‘डी.लिट. उपाधी स्वीकारताना आशा भोसले

बहुआयामी आणि अजरामर स्वराच्या धनी आशा भोसले यांना १९८७ मध्ये अमरावती विद्यापीठाने दीक्षान्त समारंभात डी. लिट. पदवी देऊन सन्मानित केले होते. त्यावेळी विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षान्त सोहळ्यात प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांनी आशा भोसले यांना ही उपाधी देऊन सन्मानित केले होते. तत्कालीन व्यवस्थापन मंडळ सदस्य आणि अकोल्यातील श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. डॅडी देशमुख यांचा प्रस्ताव मंजूर झाल्यावर अमरावती विद्यापीठाने त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला होता.

आमच्या कुटुंबाच्या कठीण काळात अमरावतीकर प्रेक्षकांनी सातत्याने मदत केली, असे माझी आई नेहमीच सांगायची. आज मी इतकी शिकली नसतानाही अमरावती विद्यापीठाने माझा डी. लिट. देऊन गौरव केला, हा माझ्यासाठी महत्त्वाचा क्षण असल्याची भावना त्यावेळी आशा भोसले यांनी व्यक्त केली होती, असे अमरावती विद्यापीठाचे तेव्हाचे जनसंपर्क अधिकारी प्रा. डॉ. किशोर फुले यांनी आठवणींना उजाळा देताना सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं...

पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी कुठल्या तरी एका कार्यक्रमात सांगितलेला किस्सा. लतादीदी, मीनाताई या सगळ्या मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्यासमोर गात असायच्या त्यावेळी छोट्या आशा मंगेशकर खेळत-बागडत असायच्या. आईने एकदा दीनानाथांना सांगितले की, या मुली गातात, ही आशा मात्र गात नाही. त्यावर मास्टर दीनानाथ म्हणाले होते की, ती बंदिशी पाठ करीत नाही. गाणे शिकत नाही. पण, सर्व गोष्टींचा तिचा रियाज आतल्या आत सुरू आहे. एक दिवस असा येईल की, ती कुणालाच काहीही लक्षात न येता फार मोठी गायिका म्हणून प्रसिद्ध होईल!...आणि झाले अगदी तसेच. बालपणी खेळण्यात रमलेली, सुरुवातीला फारशी गंभीर न झालेली आशा जागतिक कीर्तीची गायिका बनली आणि तिने अनेक दशके स्वरसम्राज्ञीचे पद भूषविले. गजल, ठुमरी, लावणी, भावगीत, भजन, पॉप-रॅप असे सारे प्रयोग केले. आशा पारेख, मुमताज, साधना, मधुबाला, मीनाकुमारी, झीनत अमान, हेलन ते माधुरी दीक्षित-करिश्मा कपूर-काजोल आणि उर्मिला मातोंडकर यांच्यापर्यंत अनेकींना आशाताईंनी स्वर दिला. अशा आशाताईंचा श्वास रविवारी, १२ एप्रिल रोजी थांबला. हजारो गाणी आणि त्यातील त्यांचा सुरेल आवाज, आर्तता, मादकता, नाद आणि खट्याळपणा हे सारे त्यांनी रसिकांसाठी मागे सोडले आहे. प्रत्येक मानवी भावनेशी निगडित असलेले एक तरी गाणे आशाताईंनी गायिलेले आहे. नऊ दशकांच्या वळणदार आणि संघर्षमय जीवनात सात दशकांहून अधिक काळ संगीताशी नाते कायम ठेवलेल्या आशाताईंची गाणी हे भारतीय संगीतातील फार मोठे संचित आहे. आशाताई आता आपल्यात नसल्या तरी त्यांच्या सुरावटींच्या रूपाने त्या आपल्या साऱ्यांच्या काळजात सदैव अमर असतील. अमर सुरांच्या या सम्राज्ञीला आदरांजली.

आशा मंगेशकरांची आशा भोसले झाली कोवळ्या वयात. लहानग्या वयापासून घरातली सगळी कामे आणि पुढे मुलांची जबाबदारी. तरुण वयात जोडीदार सोडून गेला. एकीकडे घर आणि मुलांचा सांभाळ आणि दुसरीकडे जमेल तशी गायकी. स्वातंत्र्योत्तर काळाचे दशक उलटता-उलटता लतादीदी ख्यातकीर्त झालेल्या होत्या. गीता दत्त आणि शमशाद बेगम यांच्यासारख्या गायिकांचे चित्रपटसृष्टीवर अधिराज्य होते. हिंदी चित्रसृष्टीला बहर आला होता. आशा भोसले धडपडत होत्या. त्या गात होत्या, काही हिंदी-मराठी गाणी रेकॉर्ड पण झाली होती, त्यांच्या गाण्याला मान्यता मात्र मिळाली नव्हती. १९५७ मध्ये दिलीपकुमार आणि वैजयंतीमालाचा 'नया दौर' हा चित्रपट आला. साहिर लुधियानवीने लिहिलेल्या आणि ओ. पी. नय्यर यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांनी आशा भोसले हे नाव प्रकाशात आले. तत्पूर्वी सचिन देव बर्मन यांच्यासोबत त्या गायिल्या होत्या. त्यांचे चित्रपट चालले होते. पण आशा भोसले यांचे दमदार गायिका असे नाव झाले नव्हते. यश त्यांना हुलकावण्या देत होते. आशाताईंच्या जीवनात 'नया दौर'च्या निमित्ताने खरोखर नवे युग सुरू झाले. तेव्हापासून आशाताईंचे गाणे जे नव्या दमाने सुरू झाले, ते अखेरपर्यंत थांबले नाही. आशाताईंचा खरा प्रवास सुरू झाला तेव्हा लतादीदी प्रस्थापित झाल्या होत्या. घर आणि घराणे एकच. महावृक्षाच्या सावलीत स्वतःच्या गायकीच्या वृक्षाला बहर आणायचा हे आव्हानच होते. ते त्यांनी स्वीकारले. संकटे, संघर्ष, दगदग यांचे सावट कलेवर आणि साधनेवर पडू दिले नाही. त्या सतत गात राहिल्या. प्रयोग करीत राहिल्या. त्यांनी तब्बल बारा हजारावर गाणी गायिली. प्रामुख्याने ती हिंदी आणि मराठीतच असली तरी देशातल्या आणि जगातल्या एकूण २० भाषांमध्ये त्या गायिल्या. बंगाली, गुजराती, आसामी, भोजपुरी, पंजाबी, तमिळ, मल्याळम, तेलगू, नेपाळी आणि इंग्रजीतही त्या गायिल्या.

आर. डी. बर्मन यांच्याशी आशाताईंचे दुसरे लग्न झाले होते. आर. डी. उपाख्य पंचमदा आणि आशाताईंनी सिनेसृष्टीला अवीट गोडीची आणि विविध धाटणीची अनेक गाणी दिली. या जोडीने चित्रसृष्टीच्या संगीताचा चेहरामोहराच बदलून टाकला. काही वर्षांपूर्वी आशाताईंची एक मुलाखत झाली होती. त्यात त्या म्हणाल्या होत्या की, पंचमना (आर. डी. बर्मन) भेटेपर्यंत आपण इतक्या ताकदीने आणि विविधतेने गाऊ शकतो, याची मला कल्पनाच नव्हती. ओ. पी. नय्यर यांनी प्रस्थापित केलेल्या आशाताईंना एका धाटणीत न अडकवता वैविध्यात रमविले ते आर. डी. बर्मन यांनी. पुढे १९८१ मध्ये आलेल्या 'उमराव जान'मध्ये रेखा जितकी गाजली, तितकीच गाजली आशा भोसलेंची गायकी. शहरयार यांनी लिहिलेली गाणी, खय्यामचे संगीत आणि आशाताईंचा सूर यातून दिल चीज क्या है, इन आँखों की मस्ति के, जुत्सजू जिसकी थी अशा एकाहून एक सरस चीजा चित्रपट संगीताला मिळाल्या. आशाताईंच्या स्वरांत गाण्यातील भावनेच्या गरजेप्रमाणे खट्याळपणा असे आणि आर्तताही. गंमतही असे आणि गांभीर्यही. 'उडे जब जब जूल्फें तेरी' ते 'चैन से हमको कभी' ही त्यांची एकमेव 'रेंज नव्हे'. अशा कितीतरी 'रेंजेस' त्यांच्या हजारो गीतांतून काढता येतील. बंधू हृदयनाथ मंगेशकर, कवी सुरेश भट, सुधीर फडके, शांताराम नांदगावकर, जगदीश खेबुडकर, शांता शेळके, राजा बढे, सी. रामचंद्र अशी कित्येक नावे आहेत, ज्यांच्या साथीने आशाताईंच्या मराठी संगीतातील योगदानाचा उल्लेख करावा लागतो. ही सारी अत्यंत प्रतिभावंत मंडळी. गीतकाराच्या शब्दांना आवाज देणे किंवा चालीवर गाणे एवढेच गायकाचे काम नसते. शब्दांमागील भाव गायकाला व्यक्त करावा लागतो. सुरात गातानाही शब्दांना न्याय देण्याचे भान गायकाला ठेवावे लागते. आशाताईंनी या प्रतिभावंतांच्या आव्हानांना संधी मानले आणि त्यामुळेच त्या अष्टपैलू गायिका म्हणून प्रसिद्ध झाल्या. संगीत आणि गायकीला जीवन अर्पण केलेली ही गायिका. तिने कधीही कोणत्याही अपमार्गाचा अवलंब करून स्वतःला सिद्ध केले नाही आणि खरोखर काहीतरी नवे सिद्ध करण्याचा प्रसंग आला तेव्हा कोणत्याही आव्हानापासून पळ काढला नाही. त्यामुळेच आशाताईंचा स्वर अनेकदा इतक्या वैविध्याने व्यक्त होतो की, अनेकदा आपल्या कानांवर पडत असलेले 'हे' गाणे नेमके कुणी गायिले, याचा अंदाज येत नाही. आशाताईंच्या स्वरांची ओळख वेगळी आणि त्यांच्या लकबीची नजाकत वेगळी. एरवी साधे बोलत असतानाच आशाताईंचा खरा आवाज कानांवर पडायचा. गाण्यांतून त्यांच्या लकबी आणि ताना ओळखीच्या झाल्या. कोणत्या शब्दावर भर द्यायचा आणि कुठल्या शब्दांना गाण्यात वाहून जाऊ द्यायचे, याचे कौशल्य आशाताईंच्या अनेक गाण्यांतून दिसायचे. आता गीतकाराचे शब्द अजरामर करणारीच नव्हे तर लौकिकार्थाने काव्य किंवा नादमय नसलेल्या गाण्यातही जीव ओतणारी गायिका आपल्यात नाही. 'एक सौ सोलह चांद की रातें, एक तुम्हारे कांधे का तिल, गीली मेंहदी की खुशबू, झुठमूठ के शिकवे कुछझूठमूठ के वादे भी सब याद करा दूँसब भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो', हे गाणे गुलजार साहेबांनी लिहिले होते. १९८७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'इजाजत' या चित्रपटातले हे गीत. या गाण्यासाठी गुलजार यांना सर्वोत्कृष्ट गीतकार आणि आशा भोसले यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार मिळाला होता. पण, मुळात हे गाणेच नव्हते. ते मुक्तंद पद्धतीने लिहिलेले काव्य होते. असे म्हणतात की, गुलजार यांनी हे गाणे आर. डी. बर्मन यांना दाखवले तेव्हा त्यांनी गुलजार साहेबांची गंमत केली होती. आता पेपरातल्या बातमीला संगीत द्यायचे तेवढे राहिले, असे पंचमदा गुलजार यांना म्हणाले होते. कारण या गाण्याचे शब्द गद्यासारखे वाटत होते. त्या गद्याला आशाताईंनी पद्यात उतरवून दाखविले. हजारो गाणी गायिली असली तरी आशाताईंकडे देण्यासारखे खूप काही होते याचा हा पुरावा. आजही ते गाणे कुठे तरी वाजत असते तेव्हा आपसूकच मनात येते की, आशाताई, मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं...

## दिल्ली दिनांक

### रवींद्र दाणी

# 'सबसे बडा खिलाडी'

एक काळ होता इस्लामाबादला म्हणजे पाकिस्तानला भारताशी संघर्ष थांबविण्यासाठी वॉशिंग्टनकडे धाव घ्यावी लागत होती. आता काळ बदलला आहे. वॉशिंग्टनला म्हणजे अमेरिकेला स्वतःचे युद्ध थांबविण्यासाठी इस्लामाबादकडे धाव घ्यावी लागली आहे. एका जागतिक महाशक्तीच्या शक्तिवानाचे यापेक्षा अधिक उत्तम उदाहरण कोणते असू शकते?

**मुनीरची मध्यस्थता** : अमेरिका-इस्रायल आणि इराण, लेबनान यांच्यात युद्धविराम घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ती पाकिस्तानचे फिल्ड मार्शल असीम मुनीर यांनी. एक पाय व्हाईट हाऊसच्या दालनात तर दुसरा पाय इराणच्या लष्करात अशी ख्याती असणाऱ्या मुनीर यांनी हा युद्धविराम घडविला.

भारत-पाकिस्तान यांच्यात वाढलेला संघर्ष- प्रारंभी जसा तात्पुरता थांबविण्यात आला व नंतर तो कायम झाला, तसेच या १५ दिवसांसाठी झालेल्या युद्धविरामचे होणार आहे. एखादी लष्करी कारवाई मोहीम १५ दिवसांसाठी स्थगित झाल्यानंतर, ती पूर्ववत पुन्हा सुरू करणे बरेच अवघड असते. त्यामुळे १५ दिवसांत या युद्धविरामला औपचारिकपणे कायम केले जाईल आणि आखाती देशांमध्ये पुन्हा एकदा 'शांतता' नांदू लागेल.

**दबावतंत्र** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी घालून दिलेली मुदत संपण्यास दोन तास बाकी असताना पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी या युद्धविरामाची घोषणा केली. एक विचित्र संयोग म्हणजे भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामाची घोषणा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केली होती तर अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध थांबविण्याची घोषणा पाकिस्तानने केली.

**फिल्ड मार्शल मुनीर** : पाकिस्तानी फिल्ड मार्शल मुनीर यांचे इराणच्या लष्करात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फार घनिष्ठ संबंध आहेत व तेच इराणी लष्कराला युद्धबंदीसाठी राजी करू शकतात असे म्हटले जात होते. फिल्ड मार्शल मुनीर मागील काही दिवसांपासून इराणी लष्करी अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात होते. इराणचे नवे सर्वोच्च नेता मोसाबा खामेनी हे जखमी असून ते एका रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले जाते. या पृष्ठभूमीवर इराणी लष्करी अधिकारीच याबाबत निर्णायक भूमिका घेणार होते. आणि ही बाब असीम मुनीर यांच्या पथ्यावर पडली.

**व्हाईट हाऊस** : दुसरीकडे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्याशीही मुनीर यांची मैत्री झाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर ट्रम्प यांनी मुनीर यांना व्हाईट हाऊसमध्ये दुपारच्या भोजनासाठी निमंत्रित केले होते. असा सन्मान मिळालेले हे पहिले लष्करी अधिकारी असावेत. राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या भाषणांमध्ये मुनीर यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव सुरू केला होता. राष्ट्रपती ट्रम्प यांनाही या युद्धातून सन्मानजनक माघार हवी होती. माघारीचा हा रस्ता मुनीर यांनी खुला करून दिल्यानंतर ट्रम्प यांनी लगेच युद्धबंदीचा प्रस्ताव स्वीकारला. यामागे ट्रम्प यांच्यावर असणारा दुहेरी दबाव हे कारण मुख्य होते.

**दुहेरी दबाव** : अमेरिकेतच त्यांच्याच पक्षाच्या रिपब्लिकन नेत्यांनी ट्रम्प यांच्यावर टीका करणे सुरू केले होते. उपराष्ट्रपती जेडी व्हान्स हे तर तातडीने युद्ध संपविण्याच्या बाजूने होते. अमेरिकेत जनता युद्धाच्या विरोधात जात होती. पेट्रोल-गॅसच्या वाढत्या किमती हे त्याचे कारण होते. अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याला हादरे बसणे सुरू झाले होते. अमेरिकेचे डझनाहून अधिक विमाने व हेलिकॉप्टर्स या युद्धात गमावली आहेत. आखाती देशात असणाऱ्या अमेरिकन लष्करी तळांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागले आहे. हा सारा दबाव राष्ट्रपती ट्रम्प यांच्यावर होता. दुसरा दबाव होता तो आखाती भागातील मित्र देशांचा. इराणने सौदी अरेबिया, संयुक्त अमिरात, कुवैत, बहरीन, कतार या देशांना 'लक्ष्य' केल्यापासून यांनी अमेरिका-इस्रायलने हे युद्ध लवकर थांबवावे यासाठी अमेरिकेला साकडे घालणे सुरू केले होते. अमेरिकेने खरोखरीच इराणच्या ऊर्जा प्रकल्पांना उद्ध्वस्त करणे सुरू केल्यास इराण आपल्या देशातील ऊर्जा प्रकल्प व पाणी शुद्धीकरण संयंत्रांना लक्ष्य करणे सुरू करील याची भीती या देशांना वाटू लागली होती. आणि प्रत्येक दिवसागणिक ही भीती वाढत होती. इराणी लष्कर ज्या अचूकपणे कतार, कुवैत, बहरीन यांच्या तेल शुद्धीकरण कारखान्यांना लक्ष्य करीत होते त्याची एकप्रकारची धास्ती या देशांनी व अमेरिकेनेही घेतली होती. बहरीन या लहानशा देशात अमेरिकेच्या पाचव्या आरमाराचे मुख्यालय आहे. इराणच्या धसक्यामुळे हे मुख्यालय इतरत्र हलविण्यात आले. इराणी लष्कराला चीनच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा पाठिंबा आहे. हे अमेरिकेच्या व या मित्र देशांच्या लक्षात आले होते. त्यांनी अमेरिकेला लवकरात लवकर हे युद्ध संपविण्याचा सल्ला दिला होता. या संघर्षात अमेरिकेच्या या मित्रदेशांचे मोठे आर्थिक नुकसान होत होते. ते होत राहिल्यास आपल्या भवितव्यावर परिणाम होईल, हेही या देशांना समजत होते. या साऱ्याचा परिणाम अमेरिकेवर झाला आणि राष्ट्रपती ट्रम्प यांनी एका रात्रीतून इराणला संपविण्याची घोषणा मागे घेतली आणि एका रात्रीच युद्धविरामची घोषणा करण्यात आली.

**चीन-रशिया** : इराणला या युद्धात चीन व रशिया केवळ पाठिंबाच नाही तर संपूर्ण तांत्रिक व लष्करी सहकार्य देत होते. हे आता निर्विवाद समोर आले आहे. त्यावर शिक्कामोर्तब, संयुक्त राष्ट्रातील घटनाक्रमाने केले. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत बहरीनने एक प्रस्ताव आणून होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याचा प्रस्ताव आणला होता. १५ सदस्य देशांपैकी ११ देशांनी त्यास समर्थन दिले होते. पण, चीन व रशिया यांनी नकाराधिकार वापरून तो हाणून पाडला.

**चीनची भूमिका** : इराणला युद्धासाठी मदत करणारा चीन आणि युद्धबंदीसाठी राजी करणाराही चीन. या दोन्ही भूमिका चीनने पार पाडल्या असे दिसते. एकीकडे अमेरिकेच्या मित्र देशांना म्हणजे सौदी अरेबिया, बहरीन, कुवैत, कतार यांचे नुकसान करण्यासाठी चीनने इराणला मदत केली. मात्र राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला विनाशाचा- विध्वसांचा निर्वाणीचा इशारा दिल्यानंतर- आपल्या मित्राला म्हणजे इराणला त्यापासून वाचविण्यासाठी त्याला युद्धविरामासाठी राजी करण्यातही चीनची निर्णायक भूमिका राहिली. कारण, इराण हा चीनचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. इराण उद्ध्वस्त होणे, इराणची अर्थव्यवस्था कोलमडून पडणे चीनला परवडणारे नव्हते. त्याने लगेच इराणला सावध केले व सावरले. इराणने चीनचे न ऐकण्याचा प्रश्नच नव्हता.

**पाकिस्तानची लॉटरी?** : आखाती देशातील हा घटनाक्रम पाकिस्तानसाठी एक प्रकारची लॉटरी ठरला. त्याने यात महत्त्वाची भूमिका बजावित अमेरिका, चीन व मुस्लिम जगत या तीन आघाड्यांवर आपली छाप सोडली. अमेरिकेची अप्रत्यक्ष मदत केल्यामुळे 'अमेरिका मेहेरबान', मुस्लिम जगतातील संघर्ष थांबविण्यामुळे 'अल्ला मेहेरबान' आणि हे सारे फिल्ड मार्श मुनीर यांनी केल्यामुळे 'आर्मी मेहेरबान'! म्हणजे आखाती युद्ध एक प्रकारे पाकिस्तानच्या पथ्यावर पडले. जगाला विनाशापासून आम्ही वाचविले असा प्रचार करण्यास पाकिस्तान मोकळा राहणार आहे. शिवाय इस्लामी देशात पाकिस्तानची प्रतिमा व प्रतिष्ठा उंचावणार ते वेगळेच.

**सबसे बडा खिलाडी** : आखातातील संघर्ष अमेरिका-इस्रायल व इराण-लेबनान- हिजबुल्ला यांच्यात झडला. या साऱ्या संघर्षात 'सबसे बडा खिलाडी' ठरला चीन. त्याने आपल्या अचूक तंत्रज्ञानाची चुणूक अमेरिकेला दाखविली. हेच त्याने भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान केले होते. भारतीय वायुदलाच्या हालचालींची 'लाईव्ह माहिती' चीन, पाकिस्तानला पुरवीत होता. अगदी हेच आखाती युद्धात झाले. चीन इराणला अमेरिकन नौदल व वायुदलाची 'लाईव्ह माहिती' पुरवीत होता. त्या आधारे इराणने, यूएसएस अब्राहम लिंकन, जेराल्ड फोर्ड या जगातील दोन बलाढ्य विमानवाहू जहाजांना लक्ष्य केले होते. त्याचाच फटका अब्राहम लिंकन या जहाजाला बसला व अमेरिकेला ते इराणच्या टप्प्यापासून दूर हलवावे लागले. आजवर जगातील अन्य देशांना युद्ध थांबविण्यासाठी वॉशिंग्टनचा दरवाजा ठोठवावा लागत होता. आणि आता वॉशिंग्टनला युद्ध संपविण्यासाठी इस्लामाबादचा दरवाजा ठोठवावा लागला ही सारी 'करामात' चीनची! आखाती संघर्षात सबसे बडा खिलाडी ठरला-चीन!

## वेध

### पुंडलिक आंबटकर

# पोशिंद्याचे उत्पन्न कसे वाढणार?

सरकारने राज्याच्या प्रगतीसाठी ठोस कृती आराखडा आखला असून त्या दिशेने काम सुरू आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक योजना अंमलात आणल्या जात आहेत. सध्या महाराष्ट्राच्या बहुतांश भागात खरीप हंगामाचे नियोजन सुरू झाले आहे. केंद्र सरकारने रासायनिक खतांसाठी ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. यंदा विदर्भात काही शेतकऱ्यांना विक्रमी चणा उत्पादन झाले तर काहींना रोगांच्या प्रादुर्भावामुळे मोठे नुकसान सहन करावे लागले. काही शेतकऱ्यांनी कापसाची फरदळ घेतल्याने आगामी हंगामातही बोंडअळीचा धोका आहे.

तेलबियांच्या लागवडीमुळे शेतीची सुपिकता कमालीची घटल्याने आता पूर्वीप्रमाणे कापूस व सोयाबीन उत्पादन होत नाही. शिवाय पावसाच्या अनियमितपणाचा महाराष्ट्रातील शेतीला सातत्याने फटका बसला आहे. गतवर्षी पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उन्हाळी तिळाची लागवड केली होती. हे एक नगदी पीक आहे. परंतु, गत हंगामात अवकाळी पावसाने सातत्याने मारा केल्याने प्रचंड नुकसान झाले. परिणामी यंदा तिळ लागवड आपोआपच कमी झाली.

सरकारने शेतकऱ्यांना विपन्नावस्थेतून बाहेर काढण्यासाठी अनेक योजना लागू केल्या असल्या तरी आजही बहुतांश अल्पभूधारकांना दारिद्र्यरेषेखालीच जगावे लागत असल्याने सरकारकडून कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन दिले जात आहे. गरिबांची आर्थिक स्थिती सावरण्यासाठी सरकारकडून अनेक कृषिपूरक योजना अनुदानावर राबविल्या जातात. परंतु, योग्य मार्गदर्शन आणि जनजागृतीअभावी उद्दिष्ट साध्य होत नाही, हे तेवढेच सत्य आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अल्पभूधारकांना मोठ्या प्रमाणात दिलासा देणारी ठरत आहे. सरकारने अल्पभूधारकांसाठी सौरकृषिपंप योजना आणली. परंतु, काही लोकांनी वारंवार या योजनेबाबत अपप्रचार केला. स्थानिक समस्या असू शकतात. परंतु, ही योजना सरकारने भविष्यातील समस्या गृहीत धरूनच आखल्याची पावती देण्याची गरज नाही. महाराष्ट्र राज्य खरीप हंगाम २०२६ साठी कृषी विभागाने खतांचे नियोजन आणि संरक्षित साठ्यावर भर दिला आहे. खरीप हंगामाचा कालावधी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ याप्रमाणे निर्धारित करण्यात आला आहे. केंद्र सरकारने ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे खत अनुदान मंजूर केले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत खतसाठा ३.९९ लाख टन इतका वाढल्याने यंदा शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. गरजेनुसार रासायनिक खतांचा साठा उपलब्ध केला जात असला तरी सरकारकडून नैसर्गिक शेतीलाही प्रोत्साहन दिले जात आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून कर्जाच्या खाईतून बाहेर काढणे शक्य होऊ शकते.

शेतीचा खर्च कमी करून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न सरकारकडून होत असला तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मालाच्या दरातील चढउताराचा परिणाम भारतीय शेतीवरही होतो. भारताने तांदूळ निर्यातीत चीनला मागे टाकून आघाडी घेतली आहे. परंतु, सध्या अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने आयात-निर्यात क्षेत्राचा खर्च वाढला आहे. हे युद्ध दीर्घकाळ चालले तर त्याचा परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊन आर्थिक दरवाढीचा वेग मंदावू शकतो. असे झाले तर त्याचे दुष्परिणाम भारतीय शेतीवरही दिसतील.

राज्य सरकारने 'पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' आणल्याने शेतकऱ्यांना बऱ्यापैकी दिलासा मिळत आहे. शेततळे बांधण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना दीर्घकाळापासून अनुदान दिले जाते. परंतु, या योजनेचा उद्देश कितपत पूर्ण झाला, हा अभ्यासाचा विषय आहे. महाराष्ट्रात नदीजोड प्रकल्प शेतीला नवी उभारी देणारा ठरू शकतो. महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्यात अशा योजना खूपच प्रभावी ठरू शकतात. सरकारी योजनांचा योग्य वापर आणि पारदर्शक प्रशासकीय व्यवस्था शेतकऱ्यांच्या जीवनाला कलाटणी देऊ शकतात. परंतु, अजूनही भ्रष्टाचार आणि लाचखोरीची प्रकरणे वारंवार उघडकीस येतात. सरकारला या समस्येवर मात करावीच लागेल. शंभर टक्के भ्रष्टाचार नष्ट होऊ शकणार नाही. परंतु, भ्रष्टाचार कमी करणे नक्कीच शासन-प्रशासनाच्या हाती आहे. पूर्वीच्या तुलनेत आता भ्रष्टाचार शिथिल झाल्याने शेतकऱ्यांची फसवणूकही कमी झाली आहे. पूर्वी साध्या एका कागदपत्रासाठीही वेठीस धरले जायचे. आता डिजिटलायझेशनमुळे बहुतांश क्षेत्रातील दलालांची साखळी खंडित होऊन वेळ आणि पैशांची बचत होऊ लागली आहे. मात्र, आजही कृषी क्षेत्राला ठोस सुधारणांची गरज आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

### अमोल पुसदकर

# डॉ. आंबेडकरांची संवेदनशीलता

महापुरुष हे त्यांच्या कार्यामुळे महानतेला पोहोचलेले असतात. त्यांचे कार्य बघितले की सर्वसामान्य माणसाला असे वाटते की, हा आपल्या सारखाच दिसणारा हाडामासाचा माणूस इतके मोठे कार्य कसे काय करू शकला? परंतु ज्या लाखो अनुयायांनी त्यांचा मार्ग स्वीकारलेला असतो, इतक्या लोकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी त्यांच्याकडे अत्यंत संवेदनशील असे मन सुद्धा असते. पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचे नाव आहे. संविधानाची निर्मिती, हिंदू कोड बिलाची मांडणी, समाजातील उपेक्षित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष हा सर्वांना सुपरिचित आहे; परंतु त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू, त्यांच्या जीवनातील अनेक खाजगी गोष्टी, सर्वसामान्य जनतेला फारशा माहीत नसतात.

बाबासाहेब लहान असताना त्यांना सुद्धा मुलांसोबत खेळणे, भांडणे, झाडावर चढणे, नदीमध्ये जाऊन मासळ्या पकडणे इत्यादी गोष्टी फारच आवडायच्या. खेळामध्ये क्रिकेट, टेनिस हे त्यांचे आवडते खेळ होते. इतरांसोबत पत्ते खेळणे सुद्धा त्यांना खूप आवडायचे. समुद्रामध्ये तासन्‌तास डुंबत राहणे हे पण त्यांना आवडायचे. ते एक चांगले चित्रकार सुद्धा होते. त्यांना तबला सुद्धा वाजवता येत होता. एवढेच काय, पण भारताच्या या कायदा मंत्र्यांना स्वयंपाक सुद्धा उत्तम करता येत होता. जरी त्यांनी आयुष्यभर संघर्षाचा बिगुल वाजवलेला असला, तरी सुद्धा मित्र आणि कार्यकर्त्यांसोबत असताना हास्यविनोद करणे हे सुद्धा त्यांना आवडायचे. विदर्भातील ग्रामीण भाषा, बोलीभाषेतील म्हणी या सुद्धा त्यांना तोंडपाठ असायच्या.

जीवनाचा बराचसा कालखंड त्यांचा गरिबीमध्ये गेला होता. तरीसुद्धा विदेशात राहत असताना तेथील लोकांचे नीटनेटके राहणे, उत्तम पोशाख हे सुद्धा त्यांना खूपच आवडू लागले होते. ते नेहमी म्हणायचे की, टाय लावणे अनेकांना जमत नाही, परंतु मी उत्तम प्रकारे तो लावू शकतो. विद्यार्थी म्हणून तर ते फारच हुशार होते; परंतु त्यांचे हस्ताक्षर सुद्धा खूप सुंदर होते. विदेशात राहून तिथल्या लोकांसोबत मिळून मिसळून सुद्धा त्यांनी धूम्रपान किंवा मद्यपानाला स्पर्श केलेला नव्हता.



प्राण्यांबद्दल सुद्धा त्यांना विशेष प्रेम होते. श्वान हा त्यांचा आवडता प्राणी होता. चांगल्या प्रजातीचे श्वान त्यांना आवडायचे. एकदा त्यांनी पाळलेला श्वान आजारी झाला, त्यावेळेस बाबासाहेबांनी त्याची पूर्ण सेवा केली. त्याला दवाखान्यात घेऊन गेले; परंतु शेवटी तो मरण पावला. आपल्या पाळीव श्वानाचा मृत्यू त्यांना हलवून गेला. एखाद्या लहान मुलगा जसा रडावा, त्याप्रमाणे त्यांनी त्याच्या मृत्यूचा शोक केला. एकदा एका गावी गेले असता, त्यांना त्यांच्या एका मित्राने हरणाचे पिल्लू भेट म्हणून दिले होते. बाबासाहेब त्याला आपल्या घरी घेऊन आले. त्याची सर्व प्रकारची व्यवस्था केली. ते हरिण काही दिवस राहिले व नंतर मरण पावले. त्यावेळेस सुद्धा बाबासाहेब खूप दुःखी झाले होते.

त्यांच्या आई-वडिलांबद्दल सुद्धा त्यांच्या भावना फार हळव्या होत्या. आपल्या बालपणीच्या स्वभावामुळे आपण आपल्या वडिलांचे प्रेम ओळखू शकलो नाही, असे त्यांना नेहमी वाटायचे. त्यांची आठवण आल्यावर बरेचदा ते शोकमग्न व्हायचे. कधीकधी स्मशानामध्ये, ज्या ठिकाणी त्यांच्या वडिलांचा अग्निसंस्कार झाला होता, त्या ठिकाणी जाऊन ते आपला काही वेळ घालवायचे. एकदा त्यांच्या मित्रासोबत ते सातारा रोड स्टेशनवर गेले होते. तिथे जवळच असलेल्या एका ठिकाणी ते थांबले व एका मैदानात जाऊन उभे राहिले. त्यावेळेस ते बरेच भावविव्हळ झाले होते. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. त्याबद्दल मित्राने विचारल्यावर ते म्हणाले की, इथेच माझ्या आईचा अंतिम संस्कार झाला होता. इथे जवळच आम्ही एका पडक्या घरात राहत होतो. माझी आई, भाऊ व बहीण गिट्टी फोडण्याचे काम करीत होते. इथल्या जंगलामध्ये मी खूप खेळलो आहे; परंतु अतिशय दुःखाची गोष्ट आहे, की माझी आई आणि वडील दोघेही मी शिकून किती मोठा झालेलो आहे हे बघण्याकरिता जिवंत नाहीत.

त्यांची पत्नी रमाबाई यांच्याबद्दल सुद्धा त्यांच्या मनात अत्यंत प्रेम होते. बाबासाहेब जेव्हा विदेशामध्ये शिकत होते, त्यावेळेला रमाबाई मोलमजुरी करून पैसे साठवीत होत्या व आवश्यक तेव्हा त्यांना पाठवीत सुद्धा होत्या. बाबासाहेब म्हणायचे की, तिने माझ्यासाठी डोक्यावर शेण वाहण्याचे कार्य सुद्धा केलेले आहे. रमाबाईंचे निधन झाले, त्या वेळेला त्यांच्या डोक्याशी बसून त्यांनी खूप शोक केला होता. पत्नीच्या मृत्यूनंतर अनेक दिवस ते शोकमग्न होते. त्यांनी स्वतःला घरामध्ये बंद करून घेतलेले होते. रमाबाईंचे स्वास्थ्य चांगले राहावे, यासाठी त्यांनी आपल्या इच्छांना सुद्धा मर्यादित केलेले होते. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या आपल्या पुस्तकांमध्ये त्यांनी जी अर्पण पत्रिका दिलेली आहे, त्यामध्ये त्यांनी आपल्या पत्नीचा 'रामू'असा उल्लेख करून तिला ते पुस्तक समर्पित केले आहे.

बाबासाहेब जेव्हा कायदा मंत्री होते, त्यावेळेस त्यांचे सुपुत्र भय्यासाहेब यांना दोन व्यापाऱ्यांनी संपर्क केला व त्यांचे काही काम करण्यासाठी ते त्यांना विमानाने दिल्लीला घेऊन आले. दिल्लीला पोहोचल्यावर भय्यासाहेबांनी बाबासाहेबांना, या लोकांना तुमची सही आणि शिफारसपत्र पाहिजे, असे सांगितले. त्यासाठी मी यांना तुमच्याकडे घेऊन आलो आहे, असे भय्यासाहेब म्हणाले. त्यावर बाबासाहेब त्यांना म्हणाले की, ''इथे मी देशाचा कायदा मंत्री आहे, तुझा बाप नाही. तुझा बाप मुंबई दादरमधील राजगृहामध्ये असतो. घरी मी तुझा वडील आहे; इथे जर तू माझ्याकडे आला तर मी देशाचा कायदा मंत्री आहे हे लक्षात ठेव.'' त्यामुळे बाबासाहेबांनी त्यांना त्यांचे काम न करता परत पाठवून दिले. कर्तव्यकठोर, परंतु संवेदनशील मन असलेल्या महामानवाला शत शत प्रणाम.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### वानखेडे स्टेडियमचे महत्त्व

कितीही नवी स्टेडियम्स उभी राहिली तरी वानखेडे ते वानखेडेच राहणार असा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी वानखेडे स्टेडियमचा केलेला गौरव योग्यच आहे. वानखेडेचे स्थानच अद्वितीय आहे. क्रिकेट इतिहास याच्याशिवाय अपूर्ण आहे असं म्हटल्यास वावगे होणार नाही. या मैदानावर जगभरातील अनेक दिग्गज खेळाडूंनी अविस्मरणीय तुफानी सामने आणि विक्रम घडवून तत्कालीन क्रिकेटप्रेमींना त्या क्षणांचा दिलेला आनंद शब्दांत मावणारा नाही. जुन्या पिढीच्या मनात त्या आठवणी आजही ताज्या आहेत, राहणार आहेत. मात्र, एक खंत राहते ती त्याकाळी या स्टेडियमवर प्रत्येक कसोटी सामन्यातून पाच पाच सहा सहा मुंबईचे कसोटीवीर पाहावयास मिळत असत. आज मात्र प्रथम श्रेणी सामन्यातूनही शोधावे लागतात.



**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

### शेतजमिनी अनियंत्रितपणे अकृषक रूपांतरणाचे दुष्परिणाम

दि. ३० मार्च रोजी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी संसदेत कृषीसाठी उपयोगी जमिनीचे अनियंत्रितपणे अकृषीकरण होत असल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांचे विश्लेषण त्यांच्या भाषणात केले. मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी निवासी आणि औद्योगिक वापरासाठी वळवल्या जात आहेत त्यामुळे शेती क्षेत्र कमी होऊन अन्न सुरक्षेवर वाईट परिणाम होत आहे. अन्नधान्य निर्यातीवर विपरीत परिणाम व अन्नधान्य दुर्मिळतेमुळे महागाईत अतोनात वाढ होत आहे. शेतकऱ्यांची जमीन विक्री व अकृषक रूपांतर करताना शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळायला हवा. जमीन गमावल्यामुळे शेतकऱ्याचे पुनर्वसन व रोजगार यांची योग्यप्रकारे पूर्तता झाली पाहिजे. शहराचा विकास आवश्यक असला तरी; अनियंत्रित शहरीकरणामुळे सुपीक जमीन नष्ट होण्याचे प्रमाण सतत वाढत आहे.

राज्य सरकारने याबाबतीत कायदे आणि नियंत्रणाचे स्पष्ट धोरण ठेवणे आवश्यक आहे. कोणती जमीन अकृषक करायची याबाबत कडक निकष असणे आवश्यक आहे. गुंतवणूकदार शेतजमीन स्वस्तात विकत घेऊन अकृषक रूपांतरित करून महाग भावात विकून नफाखोरी करतात. यावर कायद्याचे नियंत्रण ठेवावे तसेच नियोजनाशिवाय अकृषीकरणामुळे रस्ते, पाणी, वीज यासारख्या सुविधांची पूर्तता करण्यात समस्या निर्माण होतात. बिल्डर, व्यावसायिकांनी या सर्व विपरीत परिणामांचा विचार न करता अनियंत्रितपणे शेतजमीन अकृषक रूपांतरित करण्याने शहरांचे अमर्याद विस्तारीकरण होत आहे आणि खेड्यातील बेरोजगारीमुळे तेथील लोक रोजगारासाठी शहराकडे धाव घेत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील पायाभूत सुविधांची पूर्तता होऊ शकत नाही. शासनाद्वारे याबाबतीत असणारे शिथिल कायदे कडक करून त्यांची शिक्षेच्या तजविजीसह अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे ७०५८९७५३७६

### क्रांतीची ठिणगी पेटवणारे थोर क्रांतिकारक दामोदर चाफेकर



भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे दामोदर चाफेकर! त्यांचा बलिदान दिवस १८ एप्रिल रोजी साजरा केला जातो. इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठवून त्यांनी क्रांतीची पहिली ठिणगी पेटवली. दामोदर चाफेकर आणि त्यांच्या भावांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले.

१८९७ साली पुणे येथे प्लेगची भीषण साथ पसरली होती. त्या काळात इंग्रज अधिकारी वॉल्टर चार्ल्स रँड याने लोकांवर अमानुष अत्याचार सुरू केले होते. या अन्यायाविरुद्ध दामोदर चाफेकर यांनी आवाज उठवला. त्यांनी आपल्या भावांसह रँडचा वध करण्याचा निर्णय घेतला. २२ जून १८९७ रोजी रँडवर गोळीबार करून त्यांनी इंग्रज सत्तेला जबर धक्का दिला. या घटनेमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण मिळाले आणि क्रांतीची ज्वाला अधिक प्रखर झाली. या घटनेनंतर इंग्रजांनी चाफेकर बंधूंना अटक केली. न्यायालयातही त्यांनी निर्भीडपणे आपल्या कृत्याची कबुली दिली. १८ एप्रिल १८९८ रोजी दामोदर चाफेकर यांना फाशी देण्यात आली.

त्यांच्या बलिदानाने असंख्य भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना निर्माण झाली. देशभक्ती, धैर्य आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा त्यांनी दिली. त्या त्यागाची जाणीव ठेवून आजच्या पिढीने प्रामाणिकपणे देशसेवा करणे आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# वधू-वर मेळाव्यांचे आयोजन एक सामाजिक जबाबदारी

## खासदार डॉ. मेधा कुलकर्णी; महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १२ एप्रिल-**

सरकारी नोकरदार वर पाहिजे हा हट्ट सोडला पाहिजे कारण सरकारी नोकऱ्या मर्यादित आहेत, यापुढे आधुनिक शेतीलाच भविष्य आहे, शेतकरी मुलांनाच महत्व प्राप्त होणार आहे याचा विचार उच्चशिक्षित मुलींनी केला पाहिजे असे आवाहन खासदार मेधा कुलकर्णी यांनी केले.

धनकवडी येथील शिवछत्रपती सभागृहात महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याचा प्रारंभ खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी ठाण्याचे ज्येष्ठ उद्योजक प्रशांत सपकाळ हे होते, पुणे तरुण भारतचे महाव्यवस्थापक अशोकराव शिंदे सहकारी संस्था, संत सेना महाराजांचे वंशज



खुशपालसिंग चिमा, मध्य प्रदेशाचे राज्यमंत्री हिरा ठाकूर, पुण्याचे जिल्हा उपनिबंधक संजय राऊत, सार्थी शिक्षण मंडळाचे सचिव प्रकाश साळुंके, नगरसेविका स्वप्नाली पंडित, उद्योजक प्रवीण कारले, भाजपा ओबीसी मोर्चाचे सचिव उध्दव कावरे, नगरसेवक सोपान उर्फ काका चव्हाण. पीएमपीएलचे अधिकारी ज्ञानेश्वर जाधव , औदुंबर आणा सूर्यवंशी, बाळासाहेब तावरे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष विष्णू वखरे, सुधाकर आहेर, शिवनाथ लिंगायत, यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते संत सेना महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलनाने मेळाव्याचा प्रारंभ झाला. उपस्थित मान्यवरांचे स्वागत महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष पै महेश पांडे यांनी केले. प्रास्ताविक बाळासाहेब तावरे यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या सुमनताई पवार यांना स्व. हणमंतराव साळुंके सामाजिक सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सातारा येथील यशस्वी उद्योजक शंकरराव गायकवाड व गिर्यारोहक सचिन गायकवाड यांना समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मरणोत्तर समाज रत्न पुरस्कार स्व. वामनराव अप्पा देसाई यांचा त्यांचे पुत्र हेमंत देसाई तर स्व. सुरेशराव जगताप देण्यात आलेला पुरस्कार त्यांचे वारस मधुरा व महेश जगताप यांनी स्विकारला. मोठ्या संखेने उपस्थित विवाहोत्सुक वधू - वरांनी आपला परिचय दिला.

वधूवरांच्या पालकांनी आपसात प्रदिर्घ संवाद साधला. महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष सयाजी झुंजार, विभागीय अध्यक्ष बाबासाहेब काशीद, मेळावा समिती अध्यक्ष राजाभाऊ दळवी, पुणे जिल्हा अध्यक्ष पै. निलेश पांडे, पुणे शहराध्यक्ष, महेश सांगळे,राजेश पाथरकर पुरूषोत्तम ईबार, शिवाजी पांडे यांनी संयोजन केले होते. आभार गायकवाड यांनी मानले.

## महत्वाचे...



### स्मिता पोरे यांना पीएच.डी. प्रदान

**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

स्मिता महेश पोरे यांनी मॅक्रो आणि मायक्रो अल्गीपासून बायोडिझेल (इथेनॉल) निर्मिती या विषयावर पीएच.डी. प्रबंध सादर करून पदवी प्राप्त केली. पर्यावरण विज्ञान विषयातील हे संशोधन शाश्वत ऊर्जा निर्मितीसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे. त्यांच्या पीएच.डी. संशोधनातून ७ संशोधन निबंध प्रकाशित झाले आहेत. २ भारतीय युटिलिटी पेटंट, १ यूके पेटंट व १ जर्मनी पेटंटही प्राप्त केले आहेत. डॉ.प्रशांत पवार, डॉ.प्रकाश करियाजनवार, डॉ.विनायक धुळप यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा.आर.आर. पाटील, प्रा.अनिल नारायणपेठकर, डॉ. धवल कुलकर्णी, डॉ. प्रियंका माने उपस्थित होते.

### महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करावे

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न किताब देण्यात यावा, यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ठराव करण्यात यावा. महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करावे, अशी मागणी महात्मा फुले जयंती उत्सव मध्यवर्ती समितीच्या वतीने करण्यात आली. स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ही मागणी करण्यात आली. यावेळी उत्सव मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष ॲड.राजन दीक्षित, मुख्याध्यापक बनसोडे, प्रभाकर गोरे, झगडे, प्रा.माळी, खाडे, यशवंत फडतरे उपस्थित होते.

### तक्षशिला तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी संदेश कांबळे

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**



जुना विजापूर नाका येथील तक्षशिला तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी संदेश कांबळे यांची निवड करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नियोजन बैठकीचे आयोजन दीपक बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत जयंती उत्सवाची रूपरेषा ठरविण्यात आली असून यावेळी मंडळाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी संदेश कांबळे, उपाध्यक्षपदी महेश उर्फ सोनू तूपसुंदर, खजिनदारपदी दिनकर बनसोडे, सचिवपदी सुनील आठवले, सहसचिवपदी श्रीनिवास बनसोडे, कार्याध्यक्षपदी दीपक कांबळे यांची निवड करण्यात आली. संघटक - राहुल चलवदे व सचिन गायकवाड, मिरवणूक प्रमुख - रवी बनसोडे, आकाश बनसोडे, पंकज कांबळे, युवराज एकमले, सम्राट बनसोडे व चंद्रमणी बनसोडे यांची निवड करण्यात आली. मार्गदर्शक राज लोखंडे, केवल फडतरे व संदीप वाघमारे यांची उपस्थिती होती.



### राज्य व्हॉलिबॉल स्पर्धेत सोलापूरच्या महिला तृतीय

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

नागपूर येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व्हॉलिबॉल स्पर्धेत सोलापूर जिल्हा महिला संघाने तृतीय स्थान मिळविले. या सामन्यात सोलापूर जिल्हा महिला संघाने यवतमाळ जिल्हा महिला संघाचा २५-२१, २५- २२ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव केला. यात शिवाली कुंभार, कार्तिका गरगडे, वैष्णवी ताटे, वैष्णवी अदलिंगे, संचिका माळी या खेळाडूंनी उत्तम सांघिक खेळ करत हे यश मिळवले आहे. यशस्वी संघाचे आमदार विजयकुमार देशमुख, सोलापूर जिल्हा व्हॉलिबॉल संघटनेचे अध्यक्ष दिपक मुनोत, सुदेश मालप, अनिल गिराम, अनिल यरगल, रजपूत, धनश्री देशपांडे, दशरथ गुरव, जानगवळी, किरण शिंदे यांनी अभिनंदन केले.

## नळदुर्ग परिसरात मारहाणीत एकाचा मृत्यू; १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि.१२ एप्रिल-**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या निलेगाव (ता. तुळजापूर) येथे चोरीच्या संशयावरून झालेल्या मारहाणीमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी १६ जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास निलेगाव येथील मारुती मंदिरासमोर ही घटना घडली. मयत बबन चंदर काळे (रा. पारधी वस्ती, तुळजापूर खुर्द) आणि जखमी सागर जयराम भोसले हे दोघे गावात आले असता, आरोपी पिंकी शैलेश शिंदे, विकी शिंदे व राहुल शिंदे यांनी त्यांना पकडून ठेवले. त्यानंतर गावातील इतर लोकांना बोलावून, ''हे दोघे चोरी करण्यासाठी आले आहेत'' अशी माहिती दिली. या संशयावरून जमलेल्या जमावाने बबन काळे व सागर भोसले यांना काठ्यांनी बेदम मारहाण केली. यात बबन काळे हे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी फिर्यादी राहुल बबन काळे (वय २१) यांनी ११ एप्रिल २०२६ रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार मोहसीन वजोद्दीन इनामदार, पापा वजोद्दीन इनामदार, शंकर उर्फ श्रीधर जमादार, विठ्ठल महादेव घंटे, प्रकाश दशरथ जमादार, धनेश्वर प्रकाश जमादार, आदित्य प्रकाश जमादार, सचिन मारुती जमादार, पवन हनमंत जमादार, दादा बस्वराज जमादार, नितीन मारुती जमादार, समर्थ रमेश जमादार, रमेश अर्जुन जमादार, पिंकी शैलेश शिंदे, विकी शिंदे व राहुल शिंदे (सर्व रा. निलेगाव, ता. तुळजापूर) भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नळदुर्ग पोलीस करत आहेत.

## वृध्द मातेस मुलाने घराबाहेर दिले हाकलून

### मंगळवेढा पोलिस प्रशासनाकडून न्याय न मिळाल्याने वृध्देची पोलीस अधिक्षकांकडे धाव

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १२ एप्रिल -**

: मंगळवेढा शहरालगत असलेल्या चोखामेळानगर मधील एका ६४ वर्षीय वृध्द आईस चक्क मुलाने व सुनेने घरजागा नावे करण्याच्या कारणावरुन घराबाहेर जबरदस्तीने ओढून बाहेर काढल्याने त्या वृध्द महिलेने न्यायासाठी सोलापूरचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे लेखी तक्रार करुन न्याय मागीतला आहे. दरम्यान मंगळवेढा पोलीसाकडे न्याय मगीतला मात्र सदर वृध्द महिलेस येथे कोणताही न्याय न मिळाल्याने त्या वृध्देस न्यायासाठी वरिष्ठाकडे धाव घेण्याची वेळ आली आहे.





या घटनेची हकीकत अशी,सुरेखा सिद्राम नवगिरे (वय ६४,रा.चोखामेळानगर) येथील रहिवासी असून ३४/अ/७४/१ ही घरजागा सदर वृध्देच्या नावे असून तिच्या पतीचे जुलै २०१६ मध्ये निधन झाले आहे. या वृध्देस मुलगा प्रशांत सिद्राम नवगिरे व सुन सरुबाई प्रशांत नवगिरे असे कुटूंबात रहावयास होते. मुलगा एकटाच असल्यामुळे सुरळीत संसार सुरु होता. मात्र दि.१० जानेवारी २०२६ रोजी मुलगा व सुनेने ही घरजागा मुलाच्या नावे कर असा अट्टाहास धरला,मात्र ती जागा नावे न केल्यामुळे चक्क मुलाने व सुनेने आजीच्या हातास धरुन ढकलत घराबाहेर काढले. एकीकडे समाजात मुल असावी म्हणून देवाला नवस बोलले जाते येथे मात्र त्या उलट परिस्थिती पहावयास मिळत आहे. वृध्द आईस मुलाने संभाळणे ही नैतिक जबाबदारी असताना याला तिलांजली देत वृध्देस घराबाहेर काढल्याने संताप व्यक्त होत आहे. आज ही वृध्द महिला गेली तीन महिने जिथे जागा मिळेल त्या ठिकाणी आश्रय घेवून राहत आहे. या आजीला बी. पी व शुगरचा त्रास असल्यामुळे तिला जीवन जगणे मुश्किल बनले आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांना प्रत्यक्ष भेटून या आजीने न्याय मागितला मात्र या अधिकार्याला त्या आजीची कीव न आल्यामुळे अद्याप तरी त्यांच्याकडून न्याय मिळाला नसल्यामुळे त्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. मुलाबाबत पोलीसात दोन अदखलपात्र गुन्हे दाखल करुनही तपासिक अमंलदार कृष्णा जाधव यांनीही दखल न घेतल्यामुळे येथील पोलीस प्रशासनाचा कारभार चव्हाटयावर आला असून येथे न्याय गोरगरीबांना मिळत नसल्याचे लक्षात येताच सदर वृध्द महिलेने पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे धाव घेतली आहे. एस.पी. अतुल कुलकर्णी यांच्या सहाय्यकाने तात्काळ पोलीस निरीक्षक बोरीगिड्डे यांना कॉल करुन वृध्द महिलेस न्याय देण्याच्या सुचना करुनही अद्यापही अधिकार्यांचे न्यायासाठी डोळे उघडले नसल्याचे सांगण्यात आले. या निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री,आय.जी.कोल्हापूर परिक्षेत्र,जिल्हाधिकारी सोलापूर आदींना देण्यात आल्या आहेत.

### महात्मा फुले समाजसेवा मंडळातर्फे चित्रकला व निबंध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

महात्मा फुले समाजसेवा मंडळ, करमाळा या संस्थेच्या वतीने बालविवाह मुक्त भारत या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. यासाठी प्रवेश फी नाही. इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी, अकरावी-बारावी, महाविद्यालय आणि सर्वांसाठी खुला गट या पध्दतीने स्पर्धा होईल. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रत्येक गटात तीन क्रमांक काढले जातील. ए-४ साईजच्या कागदावर चित्र काढून संस्थेचे समन्वयक रजनीगंधा गायकवाड (९५८८६६१२०१) या नंबरवर संपर्क करुन दि. २१ एप्रिलपर्यंत आणून द्यावे. चित्रामधून बालविवाह मुक्त भारत ही संकल्पना स्पष्ट झाली पाहिजे.

## रॉयल्स संघास विजेतेपद; गुलमोहरला नमविले

### इंडियन मॉडेल पेरेंट्स लीग क्रिकेट : प्रशांत भट सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

रॉयल्स संघाने इंडियन मॉडेल पेरेंट्स लीग १६व्या क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. श्री अरूणोदय मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड व इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात पार पडली. यामध्ये १५ संघातून १९५ पालकांनी भाग घेतला होता. अंतिम सामन्यात रॉयल्स संघाने गुलमोहर क्लबवर ५ गडी राखून विजय मिळविला.

अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना गुलमोहर संघाने १५ षटकांत ७ बाद ७९ धावा केल्या. विजयी लक्ष्य रॉयल्स संघाने १२.५ षटकात ६ बाद ८३ धावा करीत गाठले. प्रशांत भट (१४ धावा व २ बळी) सामन्याचा मानकरी ठरला.



या स्पर्धेचे नाणेफेक महापालिकेचे नगरअभियंता सारिका अक्कुलवार यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शरणप्पा पासोडी, विशाल गायकवाड, राजकिरण वडनाल, सुधांशु भालेराव, प्रितीश कुलकर्णी, अमित काबणे, राघवेंद्र जोशी, सोनु केसवाणी, सुगंधराज कुलकर्णी व महादेव वरळे यांच्या हस्ते करण्यात आला.या स्पर्धेत पंच म्हणून नविन माने आणि दया नवले यांनी तर गुणलेखक म्हणून विशाल कुलकर्णी आणि समलोचक म्हणून शंकर पवार यांनी काम पाहिले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडाशिक्षक सचिन ढवाण, रविकिरण आवटे, अक्षय माने, राजकुमार माने, अजय चाबुकस्वार व प्रमोद म्हेत्रे सर्व पालकांचे सहकार्य लाभले.

**वैयक्तिक विजेते खेळाडू**

फलंदाज- इम्तियाज अत्तार, गोलंदाज- आनंद बबलेश्वर, मालिकावीर- महेश आरकाल, यष्टिरक्षक- राकेश उदगिरी, क्षेत्ररक्षक- राजपाल सरवदे, इमर्जिंग प्लेयर- प्रमोद मंगलपल्ली, विनय कत्ते, फेयर प्ले प्लेअर- योगेश भंडारी , फेअर प्ले टीम- आय. एम. एस. विशाल.

**संक्षिप्त धावफलक : गुलमोहर** : १५ षटकांत ७ बाद ७९ (प्रेम राठोड १६, संदीप व्हटकर १९, काशिनाथ कोळी १३, प्रशांत भट्ट २-११, कुमार देवसानी, बसवराज अडगळ, सचिन वांगीकर १ बळी) **पराभूत विरुद्ध रॉयल्स:** १२.५ षटकांत ६ बाद ८३ (महेश आरकाल नाबाद २६, शरणप्पा पासोडी ११, प्रशांत भट्ट १४. संदीप व्हटकर २-२१, नितीन बोगे, प्रेम सातपुते १ बळी)

## भिमशक्ती सेना मंडळाची आतिषबाजीची परंपरा कायम

### ३५ वर्षांपासून 'स्वयंप्रकाशित व्हा'चा देतात संदेश

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

**३५ वर्षांची परंपरा, प्रेरणेचा प्रकाश**

भिमशक्ती सेना तरुण मंडळ, मिलिंद नगर यांच्याकडून गेल्या ३५ वर्षांपासून भीम जयंतीनिमित्त मध्यरात्री १२ वाजता भव्य आतिषबाजीची परंपरा अखंड सुरू आहे. १९९१ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमातून 'स्वयंप्रकाशित व्हा' हा संदेश दिला जातो. यंदा आवाजहीन आतिषबाजी, प्रकाशवृष्टी, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिबिंब साकारण्यासह धबधबा, नागफणीसारख्या आकर्षक आकृत्यांचे सादरीकरण होणार आहे. दीड ते दोन तास चालणारा हा सोहळा सोलापूरकरांसाठी दरवर्षीचे खास आकर्षण ठरतो, असे अध्यक्ष गौरव कांबळे यांनी सांगितले.

बुधवार पेठेतील मिलिंद नगर येथे भिमशक्ती सेना तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे भीम जयंतीनिमित्त मध्यरात्री १२ वाजता भव्य आणि मनोहारी आतिषबाजीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून त्यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्याची ३५ वर्षांची परंपरा यंदाही कायम ठेवली जाणार आहे. 'स्वयंप्रकाशित व्हा' हा प्रेरणादायी संदेश देणारा हा सोहळा सोलापूरकरांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

या उपक्रमाची सुरुवात १९९१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त करण्यात आली होती. दिवंगत मार्गदर्शक विलास निकंबे, दिवंगत पँथर नेते मोहन बनसोडे, दिवंगत विष्णू साळवे तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेने ही परंपरा आजतागायत अखंड सुरू आहे. तथागत गौतम बुद्ध यांच्या 'अत्त दीप भव' अर्थात 'स्वयंप्रकाशित व्हा' या संदेश देणारी ही आतिषबाजी समाजाला प्रेरणा देणारी ठरत आहे.

दरवर्षीप्रमाणे १३ एप्रिल रोजी मध्यरात्री होणाऱ्या या नयनरम्य सोहळ्यासाठी शहरातील विविध भागांतून महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. दीड ते दोन तास चालणाऱ्या या कार्यक्रमाची अबालवृद्धांमध्ये वर्षभर उत्सुकता असते.

यंदा आतिषबाजीमध्ये नव्या तंत्राचा वापर करण्यात येणार असून पिवळ्या व पांढऱ्या प्रकाशवृष्टीसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिबिंब साकारले जाणार आहे. धबधबा, नागफणी यांसारख्या आकर्षक आकृत्यांचे भव्य सादरीकरण हा या सोहळ्याचा मुख्य आकर्षण ठरणार आहे. एम. एम. पटेल व सहकाऱ्यांच्या हस्तकलेतून ही आतिषबाजी साकारली जात आहे.


मंडळाचे मार्गदर्शक विशाल माने, आतिश बनसोडे व अध्यक्ष गौरव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांकडून शिस्तबद्ध नियोजन सुरू आहे. आतिषबाजी केवळ प्रदर्शन नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रकाश घराघरांत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे सल्लागार आतिश बनसोडे यांनी सांगितले.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी या मंडळाचे प्रमुख विशाल माने ,अध्यक्ष गौरव कांबळे, उपाध्यक्ष सुमित सोनवणे ,खजिनदार विशाल कांबळे , सचिव रोहन आखाडे , सहसचिव विकी साळवे, प्रमुख सल्लागार आतिश बनसोडे, काशिनाथ साळवे, दीपक सोनवणे, नागेश रणखांबे, सुरज निकंबे, उमाकांत गायकवाड, संजय सोनवणे, अण्णा भालेराव, बबलू डावरे, रजनीकांत गायकवाड, प्रवीण सोनवणे, अमर साळवे, नितीन कदम, आकाश थोरे, राज तळभंडारे ,केतन कांबळे , बाळू डावरे, ओम माने, विठ्ठल रणदिवे, रोहन बनसोडे, करण माने, श्रवण कांबळे आदी प्रयत्न करत आहेत.

## सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये जागतिक आरोग्य दिन उत्साहात

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, केगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.





सुरुवातीला विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक घोषवाक्ये सादर केले. यावेळी विज्ञान शिक्षिका डॉ. सबा शेख यांनी प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन करत निरोगी जीवनशैलीचे महत्त्व स्पष्ट केले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी चांगल्या सवयी आत्मसात करणे आवश्यक असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे त्यांनी सांगितले.

यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाची संकल्पना आरोग्यासाठी एकजूट : विज्ञानाच्या पाठीशी उभे राहूया अशी असून विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक योग्य माहिती स्वीकारून अफवांपासून दूर राहावे, असेही आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**CHANG IN NAME**

I am changing my name from SHRUTI RAJKUMAR BHOSALE * To *SHRUTI RAJENDRA BHOSALE for passport issuance as per document.

**CHANG IN NAME**

I am changing my name from RAJKUMAR PANDIT BHOSALE To RAJENDRA PANDIT BHOSALE for passport issuance as per document.

**CHANG IN NAME**

I am changing my name from SANGITA R A J K U M A R BHOSALE To SANGITARAJENDRA BHOSALE for passport issuance as per document.

सोलापूर तरुण भारत https://epaper.dainiktarunbharat.com/ सोमवार, १३ एप्रिल २०२६ ६

# फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश...



श्रेष्ठ गायिका आशाताई भोसले एका कार्यक्रमाच्या निमित्ताने सोलापूरला आल्या असत्या पेठे फुडस्‌ला भेट द्यायला त्या आवर्जून आल्या होत्या. आशाताईंना चटपटीत लोणचं आणि पेठेंच्या चटण्या प्रचंड आवडायच्या असं मंगेशकर कुटुंब सांगत.

## अद्वितीय, अतुलनीय मधाळ आवाज

### आशाताईंना आवडल्या होत्या कारळ आणि जवसाच्या चटण्या ...

**गे**ल्या एक दोन वर्षोपूर्वी उषा मंगेशकर सोलापुरात आल्या होत्या. तेव्हा लता ताईंसाठी खास कारळ, जवसाच्या बिन मीठाच्या चटण्या आणि लोणची तयार करून देण्यात आल्या होत्या. ते सर्व पदार्थ जसे स्वर्गीय लता ताईंकडे गेले तसेच ते आशाताईंकडेही गेले आणि त्यांनाही ते प्रचंड आवडले होते. त्याआधीही त्या सोलापूरला आल्या होत्या तेव्हा पेठे फुड्स ला भेट द्यायला आल्या होत्या. पण





सुवर्णा पेठे

दुर्दैवाने भेट झाली नाही आणि ती भेट हुकली व कायमची हळहळ वाटत राहिली ती आजही वाटत आहे. अशा हळव्या भावना पेठे फ ड्सच्या संचालिका सुवर्णा पेठे यांनी आशाताई भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहताना व्यक्त केल्या.

आज आशाताई आपल्यात नाहीत परंतु त्यांच्या मधाळ आवाजाने संपूर्ण जगाला त्या कायम आधार देत राहणार आहेत ही बाब ही काही कमी नाही इतक्या महान कलाकाराला काही क्षण आपण आनंदाचे देऊ शकलो याचे मला कायम समाधान वाटत राहील परंतु त्या नाहीत हे दुःख अतिव आहे. त्यांच्यासारख्या अष्टपैलू कलावंताला आपण मुकलो आहोत याच दुःख कायम असणारच आहे. पण त्यांना लाभलेल्या अद्वितीय आणि अतुलनीय मधाळ आवाजाने त्या कायम आपल्या मनात कानात आणि विचारात रुंजी घालणार आहेत हे शाश्वत आहे अश्याही भावना पेठे यांनी व्यक्त केल्या.

## उसंतवाणी

मधुर स्वरांची मा



मधुर स्वरांची। मावळली आशा।
दाटली निराशा। काळजात।।१।।

'आशा'दायी सूर। घुमतो कानात।
साठतो प्राणात । अलवार ।।२।।

स्वर्गातला गळा । आला धरेवर ।
गाऊनी सुस्वर। तृप्त केले ।।३।।

आभाळात जसा। संचारला पक्षी।
ठसवून नक्षी। परतला ।।४।।

कानी ओतले गा। अमृताचे घडे ।
आनंदाचे सडे। अंगणात ।।५।।

स्वर्गीचा तो सूर। गेला परतून।
काळीज फाटून। गेले आज ।।६।।

भावपूर्ण श्रद्धांजली



श्रीकांत उमरीकर

## गायन क्षेत्रातील असामान्य व्यक्तिमत्व




**मी** गेल्या ३६ वर्षापासून सिने नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहे. या क्षेत्रातील आतापर्यंत अनेक मान्यवरांशी माझा संपर्क आला. त्यात अविस्मरणीय संपर्क म्हणजे असामान्य व्यक्तिमत्व असलेली आशाताई भोसले यांचा भेटण्याचा कार्यक्रम घेण्याचा योग आला जिल्हाधिकारी जगदीश पाटील असताना २३ जानेवारी २०१० रोजी सोलापूर महोत्सवात आशाताई भोसले यांचा दिलखुलास मुलाखतीचा कार्यक्रम घेण्याचे भाग्य मला मिळाले.

आशाताई भोसले यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची दिलखुलास मुलाखत सुधीर गाडगीळ यांनी घेतली. हा कार्यक्रम अविस्मरणीय झाला. याच कार्यक्रमात सोलापूरचे सुपुत्र शिल्पकार भगवान रामपुरे यांनी आशाताई भोसले यांची लाईव्ह मूर्ती साकारली. तेव्हा सर्व रसिक मान्यवरासह आशाताई भोसले याही भारावून गेल्या. असा हा अविस्मरणीय कार्यक्रम घेण्याच्या योग मला मिळाला, हे मी माझे भाग्य समजतो.

विठ्ठल बडगंची

सुप्रसिद्ध अभिनेते असरानी यांनी एका मुलाखतीत आशाताई भोसले यांच्याबाबत बोलताना ते म्हणाले, 'हम ॲक्टर लोक फिल्म मे एक्टिंग करते है पर आशाताई भोसले एकमात्र ऐसी गायिका आहे जो गानो मे एक्टिंग करती है.' असरानी यांनी किती बोलके आणि वास्तव मत व्यक्त केले. आशाताई भोसले यांचा मराठी सिनेसृष्टीत सुधीर फडके यांनी तर हिंदी सिनेमासृष्टीत संगीतकार ओपी नय्यर व आर. डी. बर्मन यांनी आशाताईंचा सर्वोत्तम उपयोग करून घेतला आहे असं म्हणावे लागेल. अशा असामान्य व्यक्तिमत्व लाभलेल्या आपल्या सर्वांच्या लाडक्या व्यक्तिमत्व असलेल्या आशाताई पुन्हा होणे नाही अशा शब्दात सांस्कृतिक क्षेत्रात वावरणारे अविष्कार फिल्म सोसायटीचे अध्यक्ष विठ्ठल बडगंची यांनी व्यक्त केले

## आशा भोसले यांना आज श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्यावतीने दिवंगत सुरसम्राज्ञी आशा भोसले यांना सोमवार दिनांक १३ एप्रिल रोजी सायंकाळी ६:३० वाजता वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात संगीतमय श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. रसिक श्रोत्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर केले आहे.

## आशाताईंच्या गाण्यांचे संग्राहक

### मोहन सोहनी अनोखे रसिक

**१**९७४ सालापासून वेगवेगळ्या गाण्यांचा संग्रह करण्याचा छंद जपणारे मोहन सोहनी हे सोलापुरातील अनोखे व्यक्तिमत्व ज्यांच्याकडे जुन्या काळातील ग्रामोफोन पासून आत्ताच्या काळातील कराओके पर्यंत सर्व प्रकारच्या रेडिओ टेप आणि गाणी साठवण्याचे जे जे माध्यम आहे त्याची उपलब्धता त्यांनी केली आहे. या छंदाच्या माध्यमातून त्यांनी लाखोंच्या घरात रेकॉर्ड्स जमा केले आहेत. रविवारी या संगीताच्या पेटीयातून हळूच अडीच हजार गाण्यांचा रखाना बाहेर आला तो अनेक ग्रामोफोनच्या पुस्तकांच्या कॅसेट्स आणि पेपर माध्यमातून. वेगवेगळ्या गायकांच्या संगीतकारांच्या गीतांची संग्रह करणारे सोहनी सांगत होते. चित्रपटाचे नाव गाण्याचे बोल त्याचे साल दिग्दर्शक कोण आणि संगीतकार कोण गीतकार कोण या साऱ्याची माहिती या अडीच हजार गाण्यांच्या माहितीत आहे ती त्यांनी बुकमाइंड करून वही स्वरूपात जमा करून ठेवली आहे त्यात अडीच हजार गाण्यांचे संग्रह ताईंच्या नावावर जमा केलेले आहेत. जवळपास मी चार

अश्विनी तडवळकर

वेळा आशाताईंना भेटलो शब्दसमूहात कधी झाला नाही पण हाताच्या अंतरावरती आम्ही त्यांना न्याहाळले आहे पाहिले आहे इतक्या दैवी शक्ती लाभलेल्या आणि अष्टपैलू अशा व्यक्ती महत्त्वाच्या गळ्यातून आपल्याला गाण्याचे सुख ऐकायला मिळते याहून ती सद्भाग्यता काय होती असे ते सांगत होते. यावेळी बोलताना भरभरून ते सांगत होते की, आशाताई अनेक मुलाखतीत सांगत ज्याला पार्श्वगायन करायचा आहे त्यांनी शास्त्रीय संगीत शिकलच पाहिजे. शास्त्रीय संगीत हे समुद्र आहे त्यातील इतर सर्व उपप्रकार हे थेंबाप्रमाणे आहेत त्यामुळे समुद्रात ओहळून जाणाऱ्यांनी कुठले थेंब जमा करायचे कुठले वाहून सोडायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे कधीच कुठल्याच गोष्टीची कमतरता भासत नाही हे आवर्जून सांगते असेही त्या म्हणत असत. शास्त्रीय संगीत ते नाट्यसंगीत विविध भाषांमधील गायन आणि चित्रपटातील पैलूदार आणि वेगवेगळ्या पद्धतीच्या गायनाने



### गाडगीळाकडून माईक घेऊन आठ गाणी गायली

इचलकरंजीला आशाताईंचे कार्यक्रम भरवला होता तिथेही पावसाने हजेरी लावली होती प्रेक्षक आतुर झाले होते सुधीर गाडगीळ हे आपले सूत्रसंचालन करीत होते मध्ये मध्ये मुलाखतीच्या फटा होत्या पण मुलाखत लांबत होती तेव्हा अशा ताईनी वेळ प्रसंग लक्षात घेऊन गाडगडांच्या हातून माईक घेतला आणि सलग वेगवेगळ्या मूडची आठ गाणी न थांबता म्हणाल्या त्यावेळी प्रेक्षकांनी टाळ्यांचा गजर करत आशाताईंचे प्रचंड कौतुक केले होते तो क्षण मला आजही आठवतो आणि अंगावर शहारा येतो असे कुमार सोहनी यांनी सांगितले.



त्यांनी संपूर्ण संगीत विश्वावर आपली एक वेगळी छाप सोडली होती त्याचे प्रचंड कौतुक वाटत होते अशा प्रकारची गायिका आजवर कुठेच झाली नाही आणि पुन्हा होणे नाही असेही सोहनी यांनी आवर्जून सांगितले.

संगीत मानापमान ते उमराव जान ते मंडी ते इजाजत अशा अनेक अनोख्या गीतातून त्यांनी आपले जे शैलीदार सादरीकरण केले आहे तेवस्मरणीय आहे आणि हृदयावर कायमचे कोरलेले आहेत त्यांच्या प्रत्येक शब्दावर प्रेम करण्याची कला ही अनोखी होती आणि त्यांनी ती कला शेवटच्या क्षणापर्यंत जागवली असेही ते म्हणाले.

### पावसाच आणि त्यांच्या मैफिलीचं गमक होतं

सोहनी यांनी आठवण सांगताना सांगितले की आशाताईंच्या पुण्यातील एका कार्यक्रमाला आम्ही गेलो होतो तेव्हा प्रचंड पाऊस पडला त्यामुळे आयोजकांनी कार्यक्रम रद्द केला पण दुसऱ्या दिवशी पेपरला बातमी आली की काल पावसामुळे कार्यक्रम रद्द केला असला तरी ज्यांना तिकीट नकोय त्यांनी तिकीट परत द्यावी त्यांचे पैसे परत मिळतील आणि ज्यांना तिकीट आपल्याजवळ ठेवून कार्यक्रम पाहायचा आहे त्यांनी आवर्जून आज कार्यक्रमाला यावे असं सांगत पुन्हा कार्यक्रमाचे आयोजन केले आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी कार्यक्रम सुरू झाला. मात्र तेव्हाही पावसाने हजेरी लावली नाना पाटेकरांनी आशाताईंच्या डोक्यावर छत्री धरली आणि सबंध कार्यक्रम पावसात झाला पण कोणीही हल्ले नाही कार्यक्रम झालाच त्यांच्या मैफिलींना पाऊस हजेरी लावून जायचा अशी कायम चर्चा असायची म्हणजेच पावसाचा आणि त्यांच्या मैफिलीचं काहीतरी वेगळं गमक होतं असं सगळे नेहमीच म्हणत.



## स्वर्गीय आशाताईंचं धाराशिवशी जुळलेलं अनोखं नातं...

### आशाताईं मुळेच धाराशिवचा कलाकार ख्वाजाभाई सय्यद थेट जागतिक दर्जाच्या संगीतविश्वाशी जोडला गेला

धाराशिव जिल्हा तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक गावचे सुपुत्र प्रख्यात आर्ट डिझायनर ख्वाजाभाई सय्यद (मुंबई ) यांनी आपल्या कारकिर्दीतील अनेक महत्त्वाची वर्षे आशाताईंच्या सहवासात घालवली. त्यांच्या या प्रवासामुळे धाराशिवचा एक कलाकार थेट जागतिक दर्जाच्या संगीतविश्वाशी जोडला गेला.

**ख्वा**जाभाई सय्यद यांनी आपल्या कारकिर्दीत 'लिजेंड्स', 'अनमोल रतन', 'गोल्डन कलेक्शन', 'सॉलिड गोल्ड' आणि 'जीवनगाणे' यांसारख्या प्रीमियम सिरीजसाठी डिझाइन केले. या सिरीजमध्ये मोहम्मद रफी, किशोर कुमार, मुकेश, पंडित भीमसेन जोशी, सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, यशवंत देव आणि मंगेश पाडगावकर यांसारख्या दिग्गजांचा समावेश होता. भावगीते, भक्तिगीते, 'स्वराशा', 'भावआशा' अशा विविध प्रकारच्या अल्बमसाठी त्यांनी केलेले डिझाइन हे त्यांच्या कलेची साक्ष देतात.

पुण्यातील 'सरहद्द म्युझिक'च्या माध्यमातून आशाताईंच्या दुर्मिळ काश्मिरी गाण्यांच्या सीडी प्रकाशनावेळी त्यांना त्यांच्या सांताक्रूझ येथील निवासस्थानी भेट देण्याचा योग आला. तिथे आर. डी. बर्मन (पंचमदा) यांच्या वाद्यसंग्रहाचे दर्शन घेण्याची संधी मिळाली. हा अनुभव त्यांच्या शब्दात 'अविस्मरणीय' ठरला.

अनिल आगलावे


लहानपणापासूनच संगीत आणि कलेची ओढ असलेल्या ख्वाजाभाई सय्यद यांनी १९९६ साली मुंबईत - या नामांकित कंपनीत कामाला सुरुवात केली. त्या काळात त्यांच्या मनात एकच स्वप्न होतं. दिग्गज कलाकारांना भेटण्याचं आणि त्यांच्या अल्बमसाठी डिझाइन करण्याची संधी मिळवण्याचं. नशीब आणि मेहनत यांची सांगड घालत त्यांनी पुढे (सारेगमा) या प्रतिष्ठित म्युझिक कंपनीत २००० साली प्रवेश केला. सुरुवात मराठी अल्बमपासून झाली, पण त्यांच्या सर्जनशीलतेमुळे आणि मेहनतीमुळे लवकरच त्यांची निवड विशेष आणि प्रीमियम अल्बम डिझाइनसाठी होऊ लागली.

### आशाताईंसोबतचा अविस्मरणीय सहवास

ख्वाजाभाईंना जेव्हा लता मंगेशकर आणि आशाताईंच्या अल्बमसाठी काम करण्याची संधी मिळाली, तेव्हा तो त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च क्षण ठरला. 'जीवनगाणे' सारख्या अल्बमच्या डिझाइन दरम्यान त्यांना आशाताईंना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली. त्या वेळी सुप्रसिद्ध फोटोग्राफर गौतम राज्याध्यक्ष यांच्या माध्यमातून घेतलेले आशाताईंचे दुर्मिळ फोटो आजही ख्वाजाभाईंच्या संग्रहात जपलेले आहेत. जिवनगाणे या अल्बम पूर्ण झाल्यानंतर आशाताईंनी त्या डिझाइनचं मनापासून कौतुक केलं आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला हा क्षण ख्वाजाभाईंसाठी आयुष्यभराचा ठेवा ठरला.

### धाराशिवसाठी अभिमानाचा क्षण

धाराशिवच्या मातीतून घडलेल्या कलाकाराने जागतिक कीर्तीच्या गायिकांसोबत काम करत आपल्या कलेचा ठसा उमटवला, ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानाची आहे. स्वर्गीय आशाताई सोबतचा सहवास, त्यांचे कौतुक आणि मिळालेल्या आठवणी हे सर्व ख्वाजाभाई सय्यद यांच्या आयुष्यातील अमूल्य ठेवा ठरले. आज आशाताई आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्वरांचा गंध आणि अशा अनेक कलाकारांच्या आठवणींमधून त्या सदैव जिवंत राहतील.देशाच्या लाडक्या गायिका पद्मविभूषण आशाताई भोसले यांना भावपूर्ण आदरांजली.





## आधी लता आणि आता आशा....

एक पर्व संपलं....
मंगेशकर घराण्याचा अस्त....
अधिराज्य गाजवलं या
दोघींनी....
आपल्या घरातील लाडकी आजी,
पणजी गेल्याचं दुःख सगळा
महाराष्ट्र.... सगळा हिंदुस्थान
अनुभवतो आहे....
"No regrets , happy I
lived and loved"
Once she quoted on her
birthday....
Now she left.... For heavenly
abode....
Peacefully....
Leaving behind a deep
sorrow for us....
एका कृतार्थ आणि आनंदी
पर्वाची अखेर....
आशाबाई आनंद आणि
फक्त आनंद दिलात तुम्ही
आम्हाला....
आता संगीताच्या दुनियेत
कायमची आमावास्या झाली असं
वाटतंय....
चंद्रच निघून गेला आहे
आकाशातून....
औदासिन्य घालवणारा अखेरचा
स्वर हरपला....
Versatility thy name is
Asha....
नाट्यसंगीत....
भावगीत....
ड्युएट्स....
कॅबरे....
भक्ति संगीत....
मोठ्या झाडाच्या सावलीत
वाढलेला तेवढाच मोठा वृक्ष....
पंचमदाची प्रतिभा....
हजारो गाणी हजारो आठवणी....
बाळ नी गायला लावलेलं
जिवलगा....
कधीही ऐकलं तरी डोळ्यात पाणी
आणि अंगावर शहारा....
शब्द बापुडे केविलवाणे....
यही कहेंगे हम सदा....
के दिल अभी नही भरा....
आपल्या सगळ्यांची लाडकी
आशा....

मुकुंद कुलकर्णी

# मंगळवेढ्यात महात्मा बसवेश्वरांचे स्मारक उभारणारच

## आमदार समाधान आवताडे यांचे आश्वासन; संकल्प मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ एप्रिल-**

मंगळवेढ्यात महात्मा बसवेश्वरांचे भव्य स्मारक उभारणारच, असे आश्वासन आमदार समाधान आवताडे यांनी दिले.

मंगळवेढा येथे रविवारी १२ एप्रिल रोजी वीरशैव मंगल कार्यालय, पंढरपूर रोड येथे आयोजित करण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर स्मारक प्रबोधन सप्ताहांतर्गत संकल्प मेळाव्यात ते बोलत होते.

प्रास्ताविक विनायक कलुबर्मे यांनी करत स्म ारकाच्या गरजेवर प्रकाश टाकला.विजय बुरकुल यांनी बसवेश्वर स्मारक कसे असावे याबाबत माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



यावेळी माजी नगराध्यक्ष अरुणा माळी व पंचायत समिती सदस्या जयश्री कवचाळे यांनी आपले विचार व्यक्त करत महिलांमध्येही स्मारक उभारणीबाबत तीव्र इच्छा असल्याचे स्पष्ट केले. तसेच शिवानंद पाटील व मल्लया स्वामी यांनी ग्रामस्थांच्या भावना व्यक्त केल्या.भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण यांनी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी आपल्या कार्यकाळात राहिलेला हा विषय लवकरात लवकर पूर्ण करून बसवेश्वर स्मारक उभारावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमात सतीश दत्तू यांनी उपस्थित मंगळवेढेकरांना बसवेश्वर स्मारकासाठी प्रतिज्ञा देत स्मारक लवकरात लवकर उभारण्यासाठी सर्वांनी एकजूट होऊन प्रयत्न करावेत असे आवाहन केले. सूत्रसंचालन संतोष मोगले व आभार प्रदर्शन अजय आदाटे यांनी केले.

## महत्वाचे...



### जिजामाता प्रशालेत महात्मा फुले यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

जिजामाता प्रशाला कोंडी (ता. उत्तर सोलापूर) येथे शेतकऱ्यांचा कैवारी स्त्रीशिक्षणाचे जनक समाजसुधारक दलितांचे तारणहार क्रांतीकारी विचारवंत सत्यशोधक क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंत उत्सव कार्यक्रम देगाव केंद्राचे केंद्र प्रमुख लतिफ तांबोळी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उदय जाधव हे होते. कार्यक्रमास प्रशालेतील सहशिक्षक लक्ष्मण आगलावे, सारंग पाटील, विजयकुमार लांडगे, कैलास देशमुख, सहशिक्षिका सुनिता वणगे, शिपाई संतोष उपस्थित होते. आम्रपाली दगडू कांबळे हिने मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सारंग पाटील तर आभार विजयकुमार लांडगे यांनी मानले.




### काँग्रेसतर्फे संघटन सृजन अभियान

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने महाराष्ट्रसह सोलापूर जिल्ह्यात संघटन सृजन अभियान माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुका निहाय दौरा करून दिल्लीचे निरीक्षक देबाशीष पटनायक व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे निरीक्षक मोहन जोशी, यशराज पारखी, भाऊसाहेब आसबे यांच्या उपस्थितीत संपूर्ण जिल्ह्यात संघटन सृजन अभियान कार्यक्रम राबविण्यात आला. पहिल्या दिवशी अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढा या तालुक्यातील कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली. दुसऱ्या दिवशी पंढरपूर, सांगोला, माळशिरस तर तिसऱ्या दिवशी माढा, करमाळा, बार्शी तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्याशी दिल्लीचे निरीक्षक देबासिष पटनायक यांनी भेट घेऊन चर्चा केली. ज्या काही निवडी होतील त्या केंद्रीय निवड समितीमध्ये चर्चा करून निवडी होणार आहे. या सर्व निवडी पारदर्शकपणे होणार असून काही वर्तमानपत्रांमध्ये जिल्हाध्यक्ष निवडी बद्दल चुकीच्या बातम्या येत असून अश्या बातम्या वर किंवा अफवांवर कार्यकर्त्यांनी विश्वास ठेवू नये. असे आवाहन सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले आहे. यावेळी माजी आमदार ॲड. रामहरी रुपनवर, माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, प्रदेश सचिव ॲड. रविकरण कोळेकर, सुरेश हावळे, वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. अर्जुनराव पाटील, राजकुमार पवार, जुगलकिशोर तिवाडी, अशपाक बळोरगी, अरुण जाधव, डॉ. सुवर्णा मलगोंडा, पृथ्वीराज ढवण उपस्थित होते.



### पारंपारिक वाद्याच्या माध्यमातून जयंती उत्सव साजरी करा : विनोद घुगे

**सांगोला, दि. १२ एप्रिल-**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवात लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांनी सामील होऊन उत्साहाने साजरी करा. परंतु मिरवणुकीत नो डीजे, नो डॉल्बी, पारंपारिक वाद्याच्या माध्यमातून जयंती उत्सव साजरा करा असे आवाहन सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी केले. ते नाझरे (ता.सांगोला) ग्रामपंचायत मध्ये आयोजित जयंती निमित्त बैठकीत बोलत होते. या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक पोपट काशीद, पोह.सुजित जाधव, भानवसे, सुनील कांबळे, डॉ.विजय सरगर, मधुकर ढोबळे, सुरेंद्र ढोबळे, संदिपान पवार, अमोल काळोखे, शुभम ढोबळे, महादेव ढोबळे, गणेश ढोबळे, अनिकेत पवार, प्रवीण ढोबळे, विनोद पवार, सुभाष पवार, पोलीस पाटील लक्ष्मण बनसोडे, गौतम साठे, अण्णा ढोबळे, आनंदा कोकरे, सचिन कोकरे, तुकाराम वाघमोडे, दत्ता सरगर, नितीन टिंगरे उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### माणिक धांडोरे



**वेळापूर, दि. १२ एप्रिल-**

माणिक निवृत्ती धांडोरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सहा मुली, नातवंडे असा परिवार आहे. ग्रामपंचायत लिपिक धनाजी धांडोरे यांचे ते वडील होते.

### सुखदेव शेंडे



**सांगोला, दि. १२ एप्रिल-**

महिम (ता. सांगोला) येथील रहिवासी सुखदेव प्रभू शेंडे (वय-७५) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### दादासाहेब माळी



**सांगोला, दि. १२ एप्रिल-**

येथील माळवाडी परिसरातील रहिवाशी दादासाहेब माळी यांचे दि. १२ एप्रिल रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### सुदर्शन आडम



**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

सोलापूर येथील जुना घरकुल येथील प्लॅटिनम अप्पर्टमेंटमधील रहिवासी सुदर्शन चंद्रमौली आडम यांचे शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वा. निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० होते. त्यांच्या पसच्यात पत्नी, एक मुलगी, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्याची अंत्यसंस्कार शनिवार पद्मशाली स्मशानभूमीत झाला. वेंकटेश्वर मेडिकल स्टोअर्सचे मालक मुरलीधर आडम यांचे बंधू होत.

# माळशिरस पं. स. कर्मचाऱ्यांवर आता सीसीटीव्हीची नजर

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१२ एप्रिल-**

माळशिरस पंचायत समिती कार्यालयात ५० सीसीटीव्हीची कॅमेरे बसविण्यात येत असून या सीसीटीव्हीची कॅमेरेमुळे कर्मचाऱ्यावर नजर राहणार असून कर्मचाऱ्यांना शिस्त लागणार असून येत्या चार दिवसात हे काम पूर्ण होणार आहे. तसेच अधिक क्षमतेची सोलर सिस्टीम झाल्याने वीज पुरवठा अखंडित राहून विज बिलही वाचणार असल्याची माहिती गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी दिली.



सोलापूर जिल्हापरिषदेकडून डीपीडीसी मधून पंचायत समिती कार्यालयात ५० ऑडीओ, व्हिडीओ कॅमेरे बसविण्यात येणार असून त्याचे स्क्रीन गटविकास अधिकारी दालनात असणार आहे. पंचायत समिती कार्यालयाची इमारत माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून तत्कालीन सभापती धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे मोठी असून दुमजली आहे.ग्राउंड फ्लोअर ला आस्थापना, घरकूल, रोजगार हमी, बांधकाम, शेती यांसह गटविकास अधिकारी, सभापती, उपसभापती यांचे कार्यालय, अधिकारी मिटिंग हॉल, सभागृह आहे तर पहिल्या मजल्यावर पाणीपुरवठा,लघु पाटबंधारे, शिक्षण विभाग,अंगणवाडी, आरोग्य विभाग आदी कार्यालये असून ९५ ते १०० अधिकारी, कर्मचारी आहेत. या सर्व विभागात वैयक्तिक, सार्वजनिक कामासाठी तालुक्यातून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. सी सी टीव्ही कॅमेरे यामुळे कर्मचारी यांच्यावर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.त्यांना शिस्त लागण्यास मदत होणार आहे.



### मोडनिंब येथे टेंभुर्णी पोलिस ठाणेकडून रूट मार्च

**मोडनिंब, दि. १२ एप्रिल-**

मोडनिंब (ता. माढा) येथे टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी परि. सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांनी पोलीस ठाणे हद्दीत येणार आगामी सण, उत्सव, महापुरुषांचे जयंती चे काळात कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याची पूर्व तयारी करणे करता रविवारी रोजी दुपारी दरम्यान मोडनिंब शहरातील मुख्य रस्त्यावरून व मध्यवर्ती भागातून पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, होमगार्ड यांच्यासह सरकारी वाहने सह रूट मार्च आयोजित केला होता.त्यानंतर दंगा काबू योजनेची पूर्वतयारी म्हणून पोलीस ठाण्याचे आवारात लाटी ,हेल्मेट ढाल गॅस गन रायफल इत्यादी सह पोलीस अधिकारी व अंमलदार यांची रंगीत तालीम घेण्यात आली.त्यानंतर शहरातून पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार, होमगार्ड यांच्यासह मेन रोडने व मध्यवर्ती भागातून रूट मार्च घेण्यात आला आहे.टेंभुर्णी पोलीस ठाणे कडून घेण्यात आलेल्या रूट मार्च व दंगा काबू रंगीत तालीम याद्वारे पोलीस ठाणे हद्दीतील जनतेस कोणीही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणार नाही असे रूट मार्च द्वारे सूचित करण्यात आले आहे.सदर रूट मार्च करता व दंगा काबू योजने करता राहुल आत्राम, (खझड), परी सहाय्यक पोलीस अधीक्षक ,प्रभारी अधिकारी टेंभुर्णी पोलीस ठाणे, प्रशांत मदने, पोलीस उपनिरीक्षक टेंभुर्णी व पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार, माढा पथकाचे होमगार्ड उपस्थितहोते.



# बार्शीत डिजिटल मीडिया पत्रकार असोसिएशनचा पदग्रहण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ एप्रिल-**

महाराष्ट्रातील पत्रकारांच्या हक्कांचे रक्षण करणाऱ्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल विंग अंतर्गत कार्यरत असलेल्या डिजिटल मीडिया पत्रकार असोसिएशनचा बार्शी तालुका व शहर पदग्रहण सोहळा पार पडला. शहर अध्यक्षपदी गणेश शिंदे यांच्याकडे, तर ग्रामीण अध्यक्षपदाची संतोष कानगुडे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

या सोहळ्यासाठी सोलापूर जिल्हा (पश्चिम) कार्यकारिणीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये अध्यक्ष विनोद ननवरे, उपाध्यक्ष विजय कोरे, सचिव संजय बोकेफोडे, सहसचिव बाबासाहेब शिंदे आणि खजिनदार अजय पाटील यांचा समावेश होता. शहरातील डिजिटल पत्रकारितेलासक्षम करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष- गणेश शिंदे, उपाध्यक्ष- अभिजीत शिंदे, सचिव- निलेश उबाळे, सहसचिव: अमीन गोरे, खजिनदार- समाधान विधाते. सदस्य- स्वप्निल पोफळे, सचिन साळवे, संदीप सुतार. मार्गदर्शक: रमेश गायकवाड, रमण कारंजकर. कायदेशीर सल्लागार- ॲड. शंकर ननवरे.अध्यक्ष- संतोष कानगुडे, उपाध्यक्ष- काशिनाथ क्षीसागर, सचिव- विश्वनाथ सोनवणे, सहसचिव- राजेश भोगे, खजिनदार- बालाजी देवकते. सदस्य- शांतीलाल काशीद, अर्जुन गोडगे. महिला आघाडी प्रमुख- राजश्री गवळी यांची संघटनेच्या महिला सक्षमीकरणासाठी निवड करण्यात आली. सूत्रसंचालन निलेश उबाळे यांनी तर आभार अभिजीत शिंदे यांनी मानले..

### राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या कार्यकारणी सदस्यपदी उत्तम चौगुले

**सांगोला, दि. १२ एप्रिल-**



महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेची पदाधिकारी निवड प्रक्रिया सुरू आहे. प्रत्येक विभागातून राज्य संघटनेचे पदाधिकारी निवडले जात आहेत. ही प्रक्रिया झाल्यानंतर राज्याच्या सात विभागातून निवडलेल्या केंद्रीय व्यवस्थापन समिती सदस्यांमधून राज्याचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस व खजिनदार निवडले जाणार आहेत. या अंतर्गत संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र विभागाची बैठक सातारा येथे पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सल्लागार शिवगोंड खोत तसेच सरचिटणीस विकास सूर्यवंशी, उपाध्यक्ष रघुनाथ कांबळे व पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष विजय पारगे उपस्थित होते. यावेळी सोलापूर जिल्ह्यातून अंबादास शिंदे व उत्तम चौगुले यांची राज्य कार्यकारणी सदस्यपदी निवड जाहीर करण्यात आली. या बैठकीचे आयोजन राजेंद्र माळी, गणेश पवार, ताजुद्दीन आगा, गणेश पवार, भास्कर भोरे, लहुराज लवळे, हमीद खान यांनी केले. राजेंद्र माळी यांनी शेवटी सर्वांचे आभार मानले.



### श्रीक्षेत्र महात्मा फुले गणेशोत्सव मंडळातर्फे महात्मा फुले जयंती साजरी

**वेळापूर, दि. १२ एप्रिल-**

वेळापूर (ता.माळशिरस) येथील श्री क्षेत्र महात्मा फुले गणेशोत्सव मंडळाच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन माजी जि. प. सदस्य सतीशराव माने देशमुख, प.स. सदस्या विमल जानकर व जिल्हा परिषद सदस्या मीनाक्षी सरतापे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री क्षेत्र महात्मा फुले गणेशोत्सव मंडळाच्या वतीने नूतन जिल्हा परिषद सदस्या म ीनाक्षी सरतापे व पंचायत समिती सदस्या विमलताई जानकर यांचा लक्ष्मी राऊत व अश्विनी भानवसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे, माजी जि.प. सदस्य सतीशराव माने-देशमुख, महादेव ताटे, अमरसिंह माने-देशमुख, मिलिंद सरतापे, शंकरराव काकुळे, हनुमंतराव साळुंखे, विश्वास वाघे, धनंजय माने-देशमुख, मदनसिंह माने-देशमुख, ओंकार माने-देशमुख, संदीप माने-देशमुख, दीपक राऊत, काकासाहेब जाधव, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, अमृतराव माने देशमुख, काशिनाथ आडत, भागवत गायकवाड, शिवाजी मोहिते, ॲड. विठ्ठल मंडले, अमोल मंडलिक, राजकुमार शिंदे, डॉ. धनंजय मेहत्रे, पिनू येडगे, भैय्या कोडग, उमेश भानवसे, अजीत साठे, चंद्रकांत बनकर, चंद्रकांत आडत, इसाक पठाण, अमोल साठे, महेश साठे, मल्हारी बनकर, बापू आडत, खंडू आडत, गोपाळ शिरसागर, ओंकार आडत, ओंकार खराडे, जवान माने-देशमुख, ॲड. दत्तात्रय राऊत, कैलास सुरवसे, डॉ. महेश हजारे, डॉ. धनंजय मेहत्रे, तुकाराम राऊत, मंडळाचे अध्यक्ष राजकुमार पोरे, नागेश क्षीरसागर, विलास राऊत, बापू भानवसे, सोमनाथ चांडोले, शंकर राऊत, आर.बी. पवार, आनंद वाघे, स्वप्निल सरवदे, नागेश मोहिते, माऊली राऊत, सीमा खाडे, प्रियंका आडत, अजित बनकर उपस्थित होते.

# महात्मा फुले सामाजिक विषमतेविरोधात लढणारे विचारवंत

## संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ता डॉ. बालाजी जाधव यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १२ एप्रिल-**

महात्मा फुले हे धर्मविरोधक नव्हते, तर ते अंधश्रद्धा, अन्याय आणि सामाजिक विषमतेविरोधात लढणारे विचारवंत होते, असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ता डॉ.बालाजी जाधव यांनी केले.



राष्ट्रपिता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती व द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात निमित्त तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५वी जयंतीनिमित्त माळेवाडी-अकलूज येथे मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांनी म.फुले यांच्या जीवनातील विविध पैलूंवर आपल्या ओघवत्या आणि प्रभावी शैलीत प्रकाश टाकत उपस्थितांना विचारप्रवृत्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील तसेच अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. अकलूज नगर परिषदेच्या वतीने नगराध्यक्ष रेश्मा अडगळे उपनगराध्यक्ष शिवतेसिंह मोहिते पाटील शितल देवी मोहिते पाटील यांनी भाजी मंडई येथील महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

यावेळी मराठा सेवा संघाचे प्रदेश संघटक उत्तमराव माने, माजी जिल्हा परिषद सदस्य जालिंदर फुले, संचालक जयदीप एकतपुरे, सुनंदा फुले, भारत फुले, प्रा. अरुण खंडागळे, अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक नामदेव गलांडे, स्वाती फुले, रेश्मा तांबोळी, अझर शेख, मंदाकिनी पाडोळे, उज्वला विटकर, ॲड. वजीर शेख, बाळासाहेब धाईंजे, अमोल फुले, प्रा. विठ्ठलराव साळुंखे (तालुकाध्यक्ष मराठा सेवा संघ), नवनाथ कोडग (जिल्हा उपाध्यक्ष), तुकाराम साळुंके, अक्काताई माने, मनोरमा लावंड (जिल्हाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड), शारदा चव्हाण (तालुकाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड), राजेंद्र फुले, उमेश फुले, उमेश एकतपुरे, सचिन एकतपुरे, अजित माने(संभाजी ब्रिगेड), शिवाजीराव लोंढे, गजानन फुले, मधुकर फुले, किसनराव एकतपुरे, राजेंद्र बनकर, रामभाऊ एकतपुरे , अर्जुन शिंदे, मारुती बनकर, ज्ञानेश्वर फुले, ज्ञानेश्वर (माऊली) फुले, जालिंदर फुले, तुषार केंगार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋतुजा फुले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अमोल माने यांनी केले.

# ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला साखर उद्योग वाचला पाहिजे

## एमएससीएसएफचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१२ एप्रील-**

महाराष्ट्रातील साखर उद्योगामुळे प्रत्यक्ष दोन लाख कर्मचारी तसेच १० लाख ऊस तोडणी मजूरांना रोजी रोटी मिळते. अप्रत्यक्ष व्यापार, उद्योग करणारे वेगळेच आहेत. साठ हजार कोटींची उलाढाल करणाऱ्या साखर उद्योगामुळे सरकारला दरवर्षी ९ हजार कोटींची कर मिळतो सर्वात महत्वाचे म्हणजे हा उद्योगा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने हा उद्योग वाचला पाहिजे असे उद्गार एमएससीएसएफचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांनी काढले.



श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना व डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या साखर उद्योगा पुढील अडचणी व उपाय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. प्रथम चर्चासत्राचे संयोजक कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी मंचावर कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक डीएसटीएचे अध्यक्ष रोहन शिरगावकर, एमसीडीसीचे मंगेश तिटकारे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सुधीर पोफळे यांनी केले.

**साखर उद्योग नफ्यात नाही चालला तर भवितव्य वाईट**

आज शेतकरी वर्गाची मानसिकता बदलली आहे. जादा साखर उतारा देणारी ऊस लागवड कमी होत आहे, त्यातच संघटनेच्या माध्यमातून बसत नसताना बळजबरीने ऊस दर मागितला जातो. त्यामुळे जो पर्यंत नफ्या तोट्याचा विचार होत नाही तो पर्यंत हा उद्योग टिकणार नाही.

**- प्रशांतराव परिचारक,** चेअरमन

# कारागृहात झालेल्या मैत्रीने केला विश्वासघात; ३ लाखांचा ऐवज लुटला

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १२ एप्रिल-**

सोलापूर येथील कारागृहात असताना झालेल्या मैत्रीच्या ओळखीतून डोंबिवली येथील एकास तुला गुन्ह्यातून बाहेर काढतो, असे सांगून ब्रम्हपुरी हद्दीतील कॅनॉलवर बोलावून ३ लाख ५ हजार सोने व पैसे लुटण्याचा प्रकार घडला. याप्रकरणी अजित उर्फ काळ्या सुरेश पवार, एक अनोळखी महिला व अनोळखी पुरुष (रा.नंदूर) या तिघांविरुध्द मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.




याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, यातील फिर्यादी ग्लेन सिक्वेरा (रा. कल्याण डोंबीवली) हे सोलापूर शहरात फिर्यादीवर सायबर फ्रॉडचा गुन्हा दाखल होता. त्यामुळे फिर्यादी व यातील आरोपी अजित उर्फ काळ्या सुरेश पवार असे दोघेजण चाळीस दिवस सोलापूर जिल्हा कारागृहात असताना ते जिगरी दोस्त बनले. काळ्या पवार याने फिर्यादीस माझे मोठ मोठे पुढारी ओळखीचे असून तुला सायबर केसमधून बाहेर काढण्यासाठी मदत करतो, असे म्हणाला.

दि.२४ मार्च रोजी फिर्यादी व आरोपी दोघेही कारागृहातून बाहेर आले. दि.९ एप्रिल रोजी फिर्यादी व फिर्यादीची मैत्रीण मनिषा हरावत हे सोलापूर येथे असताना आरोपीने कॉल केला. तू सोलापूरला आला आहेस तर मी तुला लोकेशन पाठवतो त्या लोकेशनवर ये ओळखीच्या पुढाऱ्यांची भेट घालून सायबर गुन्ह्यातून मुक्त करतो असे आश्वासन दिले.

आरोपीने फिर्यादीच्या मोबाईलवर लोकेशन पाठविले व त्याने येताना सोबत वडापाव घेवून येण्यास सांगीतले. त्या प्रमाणे फिर्यादी व फिर्यादीची मैत्रीण ब्रम्हपुरी हद्दीत उपसरपंच हॉटेलच्या पाठीमागे कॅनॉलवर दुपारी २.३५ वाजता आले. यावेळी उपस्थित आरोपींनी फिर्यादीची मैत्रीण हिच्या गळ्यातील सोन्याची चेन व पैसे एकूण ३ लाख ५ हजार जबरदस्तीने काढून घेतले.

### वारंवार घडतात अशा घटना

मागील एक वर्षापुर्वी एका आरोपीने याच कॅनॉलवर एका महिलेवर जबरी अत्याचार केला होता. या परिसरात वारंवार अशा घटना घडत असल्याने नागरिकांतून भीती व्यक्तविण्यात येत आहे.

# मे महिन्यापुर्वीच सोलापूर शहर ‘हॉटस्पॉट’च्या उंबरठ्यावर

## पारा चाळीशी पार, एकाच दिवसात ०.२ अंशांची वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १२ एप्रिल-**

सोलापूरकरांना उन्हाचे चटके आता खऱ्या अर्थाने सोसावे लागणार आहेत. मे महिन्यापुर्वीच सोलापूर शहर जणू 'हॉटस्पॉट'च्या उंबरठ्यावर असल्याचे दिसून येत आहे. ११ एप्रिलच्या तुलनेत १२ एप्रिल रोजी तापमानात तब्बल ०.२ अंशांची लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली. पारा ४१.६ओ सेल्सिअसवर जाऊन पोहोचला आहे.


दि.२७ मार्चनंतर पहिल्यांदाच तापमानाने चाळीशी ओलांडल्याने दुपारच्या वेळी शहरात जणू 'अघोषित संचारबंदी' असल्यासारखा शुकशुकाट पाहायला मिळत आहे. आजच्या हवामान नोंदीनुसार कोरडे हवामान आणि कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असल्याचे सांगण्यात येते. हवामान घटक नोंदवलेले प्रमाण बदल/स्थिती याप्रमाणे; कमाल तापमान ४१.६ओ से (१०६.९ओ फॅ) २ अंशांची वाढ. किमान तापमान २६.६ओ से (७९.९ओ फॅ). हवेतील आर्द्रता ३०% कोरडे हवामान. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, एप्रिलचा मध्य जवळ येत असताना सूर्याची प्रखरता आणखी वाढणार आहे.

१० मार्च रोजी तापमानात मोठी वाढ झाल्यानंतर मध्ये काही दिवस किंचित दिलासा मिळाला होता. मात्र, आजच्या ४१.६ अंशांच्या नोंदीने पुन्हा एकदा उष्णतेच्या भीषण लाटेचे संकेत दिले आहेत. आर्द्रता केवळ ३० टक्क्यांवर आल्याने कोरड्या उन्हाचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. वाढत्या उन्हामुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. सोलापूरच्या तापमानाचा हा आलेख पाहता, मे महिना उजाडण्यापूर्वीच शहर राज्याचे 'हॉटस्पॉट' ठरण्याची चिन्हे गडद झाली आहेत.

# दारु पिऊन कुटुंबात धिंगाणा; भावानेच केले भावाला ठार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १२ एप्रिल-**

दारु पिवून कुटुंबात धिंगाणा घातल्याच्या कारणावरुन भावानेच भावाचा खून करण्यात आल्याची घटना नंदेश्वर येथे घडली. याप्रकरणी दत्तात्रय म्हाळू मोटे (रा.मोटे वस्ती) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी म्हाळू धोंडीबा मोटे (वय-६०) यास पत्नी आकाताई, मुले कृष्णात व दत्तात्रय असून दि.१० एप्रिल रोजी रात्री ९ वाजता फिर्यादी व फिर्यादीची पत्नी मुलगा दत्तात्रय, नातू असे घरी असताना कृष्णात हा दारु पिवून घरी आला.



सगळ्यांना शिवीगाळ करु लागल्यावर सर्वांनी शिवीगाळ करु नको, मुलांना मारु नको असे म्हणाल्यावर तो माझा मुलगा आहे मी त्याला मारेन नाही तर काहीही करेन असे म्हणून अंगावर धावून आला. त्याला समजावून सांगण्याचा भरपूर प्रयत्न केला, मात्र तो ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.

रात्री ११ वाजता पुन्हा कृष्णात सगळ्यांना शिवीगाळ करु लागला. घरातील कुऱ्हाड घेवून हवेत फिरवू लागला. या वागण्याला कंटाळून मुलगा दत्तात्रय याचा राग अनावर झाला आणि त्याने कृष्णात याच्या हातातील कुऱ्हाड घेवून त्याच्या डोक्यात, दोन्ही पायावर वार केले. यात तो गंभीर जखमी होवून रक्तस्त्राव झाला. त्याला उपचारासाठी सांगोला येथे नेले. मात्र उपचारापुर्वीच त्याचा मृत्यु झाल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# पंचाचार्य जगद्गुरूंचा अड्डापालखी मिरवणुक सोहळा उत्साहात



### ■ आज मुख्य कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. १२ एप्रिल-**

लक्ष लक्ष नायनांनी पंचाचार्य जगद्गुरूंचा भव्य-दिव्य अड्डापालखी मिरवणुक सोहळा उत्साहात पार पडला. श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींचा अमृत आणि सुवर्ण पट्टाभिषेक महोत्सवानिमित्त ऐतिहासिक धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल चार दिवस सुरू आहे.

रविवारी पंचाचार्य जगद्गुरूंची भव्य-दिव्य अड्डापालखी मिरवणुक सोहळा पालखी मैदान ते श्री बृहन्मठ पर्यंत भव्य असा सोहळा निघाला. लेझीम महिलांचे ढोलीबाजा पथक विविध धार्मिक वाद्य कलश धारक महिला घोड्यावर सत्कारमूर्ती श्री गुरु मुक्तेश्वर शिवाचार्य महाराज व श्री सद्गुरु सदाशिव शिवाचार्य महाराज आरुड झाले होते. तदनंतर श्री रंभापुरी जगद्गुरु, श्री उज्जैन जगद्गुरु, श्री शैल्य जगद्गुरु, श्री काशी जगद्गुरु, डॉक्टर मल्लिकार्जुनश्री काशी जगद्गुरु यांची अड्डा पालखी तर सोहळ्यासाठी उपस्थित शिवाचार्य गण यांची रथातून मिरवणूक काढण्यात आली तर नंतर रेणुकाचार्य यांचा सजवलेला रथ व अनेक भक्तगण मिरवणुकीत सहभागी झाले. या सोहळ्यासाठी हजारो भक्तगण गेले तीन दिवस उपस्थित आहेत. मिरवणुकीनंतर हिंदू वीरशैव लिंगायत समाज पंचाचार्य जगद्गुरू यांचे दिव्यसानिध्यात व अनेक शिवाचार्य यांच्या उपस्थितीत धर्मसभा संपन्न होऊन प्रसादाचे वाटप करण्यात आले.

सोमवारी मुख्य कार्यक्रम होणार आहे पंचाचार्य जगद्गुरूंच्या दिव्यसानिध्यात श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांना हरिद्रलेपन व अभ्यंग स्नान संपन्न होवून सकाळी १०.३० वाजता पंचाचार्य जगद्गुरु तसेच, उपस्थित शिवाचार्य, संत-महंत, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मसभा संपन्न होईल आणि नंतर उपस्थितांसाठी महाप्रसाद होईल.

# सांगोल्यात पोलिसांचा रूटमार्च



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ एप्रिल-**

सांगोला शहरात व तालुक्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच आगामी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अनुषंगाने सांगोला पोलिसांकडून रविवार दि.१२ एप्रिल रोजी शहरातील सांगोला पोलीस ठाणे ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक-भीमनगर-वाडेगाव नाका- महादेव गल्ली- शनी गल्ली- परीट गल्ली-हनुमान मंदिर-जय भवानी चौक- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक-तहसील कार्यालय-परत पोलीस ठाणे या मार्गाने रूटमार्च आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पीएसआय.पाटील, पुजारी, काशीद, महिला पोलीस अधिकारी उबाळे उपस्थित होते.

# सोलापूर विद्यापीठात समतेचा संदेश: १८ तासांचा अखंड वाचन-अभ्यास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या वतीने दि. ८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रबोधनपर उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत रविवारी सलग १८ तासांच्या वाचन-अभ्यास उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला या उपक्रमात एकूण ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून ज्ञानार्जनासोबतच सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ करण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या हस्ते झाडाला पाणी देऊन करण्यात आली. ज्ञानासोबत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम सर्वांच्या लक्षात राहणारा ठरला.



या उपक्रमाचे नियोजन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. अनिल घनवट यांनी केले होते. कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, समन्वयक डॉ.गौतम कांबळे, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

# महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत होणार सात विशेष समित्यांची नियुक्ती

### पाणीपुरवठ्याच्या १३७८ कोटी योजनेचा विषयही सभापटलावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

महापालिकेची एप्रिल महिन्याची सर्वसाधारण सभा सोमवार, दि. २० एप्रिल रोजी होणार आहे. या सभेत महापालिकेच्या विविध सात विशेष समिती सदस्यांची नियुक्ती करण्याचा विषय आहे. याशिवाय शहरातील अंतर्गत जलवितरण व्यवस्था सुधारण्याचा १३७८.४२ कोटींचा प्रस्ताव सभापटलावर आहे. शहरातील अंतर्गत जलवितरण व्यवस्था सुधारणा करण्याच्या १३७८.४२ कोटी इतक्या प्रकल्प अहवालास मान्यता देण्याचा विषय प्रशासनाकडून सभापटलावर ठेवण्यात आला आहे.

शहराची लोकसंख्या सुमारे १२ लाख असून शहरातील सध्याची जलवितरण व्यवस्था जीर्ण व अपुरी आहे. त्यामुळे शहरात अंतर्गत जलवितरण व्यवस्था सुधारण्यासाठी प्रथम टप्प्यात र.रु. ८९२.५४ कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. या योजनेसाठी नगर विकास विभागाच्या दि. १६ सप्टेंबर २०२२ च्या शासन निर्णयानुसार यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन LLP छत्रपती संभाजी नगर यांचे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करण्यास, त्यांना योजनेच्या ०.६१% सल्ला फी देण्यास, येणाऱ्या खर्चास प्रशासक ठराव (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ) ठराव क्र. ३४१, दि.०९/१२/२०२५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

ही योजना परिपूर्ण करण्यासाठी मुख्यकार्यकारी अधिकारी Marashtra Institute for Transformation (MITR/मित्रा) व अप्पर मुख्यसचिव, नगरविकास विभाग-२ यांच्या मार्गदर्शनानुसार प्रस्तुत योजनेसाठी अनुदान व निधी उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता MaharashtraUrbanWSS Reuse Programme (MUWREP) नुसार जागतीक बँकेकडून अनुदान साधारणतः ६००,०० कोटी कॅपिटल बॉन्ड माध्यमातून २००.०० कोटी व १०० कोटी मनपा हिस्सा माध्यमातून निधी उपलब्ध होऊ शकेल. त्यानुसार शासन स्तरावर आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यास, विविध माध्यमातून अनुदान व इतर बाबींची पूर्तता करण्यास तसेच प्रस्तुत योजनेतील वर नमूद वित्तीय आकृतीबंधास प्रशासक ठराव (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ ठराव क्र. ३४५, दि. १२/१२/२०२५ अन्वये मान्यता दिलेली आहे.




या योजनेच्या अनुषंगाने 'मित्रा' (Maharashtra Institute for Transformation) व जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांशी वेळोवेळी झालेल्या चर्चेप्रमाणे व त्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे ही योजना एकाच फेजमध्ये पूर्ण करण्याच्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन LLP छत्रपती संभाजीनगर यांनी नव्याने र.रु. १३७८.४२ कोटी ढोबळ किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. या योजनेत १० चइठ, ३० उंचावरील जलकुंभ, १२० MLD व ३० MLD क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र, १५०.२३ कि.मी. ट्रान्समिशन लाईन व ११०५.६१ कि.मी. डिस्ट्रब्युशन लाईन याचा समावेश आहे, असे या प्रस्तावात नमूद आहेत.

विशेष सात समिती सदस्यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आहे. या समिती सदस्यांची निवड राजकीय पक्षांच्या तौलनिक संख्याबळानुसार होणार आहे. स्थापत्य समिती, वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती, विधी समिती, शहर सुधारणा समिती, मंड्या नि उद्यान समिती, कामगार व समाजकल्याण समिती, महिला व बालकल्याण समिती अशा एकूण सात विशेष समिती आहेत. शहरातील मनपा मालकीच्या मंडई विभागाकडील महात्मा फुले मंडई, राणी लक्ष्मीबाई मंडई, कस्तुरबा मंडईमधील रिकाम्या गाळ्यांचा ऑफलाईन बोली लावून बोली भाडे अधिक ऋध्दढ स्वतंत्र आकारणी करुन योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर रजिस्टर्ड करारपत्र करुन पुढील १० वर्षे मुदतीकरिता भाडे तत्वावर देण्याचा विषय प्रशासनाने या सभापटलावर ठेवला आहे. सोरेगाव, भवानी पेठ व पाकणी या तिन्ही जलशुध्दीकरण केंद्राकडे पाणी शुध्दीकरण प्रक्रियेकरीता ६०० नग क्लोरीन टनर खरेदी, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शहरात विविध विकास कामे करणे, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत विविध विकास कामे करणे आदी विषयदेखील अजेंड्यावर आहेत.

गोरोबा काकांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त येणाऱ्या सर्व वारकरी व भाविकांचे तेरनगरीत

मनःपूर्वक सहर्ष स्वागत...!





सौ. दिदी लोकेश काळे
सरपंच, तेर ता. धाराशिव

श्री. श्रीमंत रमेश फंड
उपसरपंच, तेर ता. धाराशिव

श्री. बाबासाहेब भागवत खोचरे
ग्रामपंचायत अधिकारी, तेर ता. धाराशिव

- ग्रामपंचायत सदस्य -
श्री. अमोल विश्वास कसबे, २) अविनाश बिभीषण आगाशे, सौ. भाग्यश्री धनाजी आंधळे, ४) प्रियंका लखन रसाळ, सौ. आशा नामदेव कांबळे

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



## विरुध्द दिशेने येत दिली दुचाकीला धडक

**सोलापूर :** एक्टिवा मोटरसायकलच्या चालकाने विरुद्ध दिशेने येऊन एका दुचाकीला धडक दिली. यात अज्ञात चालका विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याची हकीकत अशी की, महेश अण्णाराव तमनवरु (वय-३७, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) यांची एम.एच.१३ सी.ई.३०५० दुचाकीला एम.एच.१३ डी.ए.८५२७ या क्रमांकाच्या वाहनाच्या चालकाने विरुद्ध दिशेने येऊन भरधाव वेगाने वाहन चालवून महेश तमनवरू यांच्या दुचाकाला धडक देऊन गंभीर जखमी केले. याबाबत अज्ञात चालकाच्या विरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गायकवाड हे करत आहेत.

# राज्याची तिजोरी सर्वसामान्यांच्या मालकीची, त्यामुळे पैशावर कुणीही अधिकार सांगू नये!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे रोखठोक प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ एप्रिल-**

राज्याची तिजोरी ही सर्वसामान्यांच्या विकासासाठी असते. त्याच्यावर राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य जनतेचा अधिकारी असतो. त्यामुळे पैशावर अधिकार कुणीही सांगू नये. हे पैसे जनतेचे आहेत याची जाणिव प्रत्येकाने ठेवली पाहिजे, असे रोखठोक प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. दरम्यान, शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींना निधी वाटप करताना दुजाभाव केला जात असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभुमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या या वक्तव्याविषयी राजकीय वर्तुळातून तर्कवितर्क लढविले जात आहेत.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके, पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके आणि भैरवनाथ शुगर्सचे अनिल सावंत यांनी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षात प्रवेश केला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, महाराष्ट्राच्या तिजोरीवर सर्वात पहिला अधिकार बळीराजाचा, लाडक्या बहिणीचा, लाडक्या भावांचा आहे. आम्ही जनतेचे मालक नाहीत तर सेवक आहोत. आपण सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेलो नाही. पण आपल्यामुळे सर्वसामान्य जनतेला सोन्याचे दिवस कसे येतील; या विचाराने आपण नेहमी काम करीत असतो.




शिंदेची शिवसेना ठाण्यापुरतीच मर्यादित राहणार असे विरोधकांकडून बोलले जायचे. शिवसेना खरी कोणती हे वेगळे सांगण्याची आता गरज राहिली नाही. आपण किती प्रॉपर्टी कमाविली यापेक्षा आपल्याकडे सर्वसामान्य जनतेची किंवा लोकांची श्रीमंती किती आहे? या गोष्टीला आपण महत्व देत असतो. आपण मुख्यमंत्री असताना एवढा निधी दिलेला आहे की त्या दिलेल्या निधीतून अजून देखील काही ठिकाणी कामांचा शुभारंभ किंवा पुर्ण झालेल्या कामांची उद्‌घाटने केली जात आहेत. आपण कधी या हाताचे या हाताला कळु दिले नाही, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

पंढरपूर पालिकेच्या प्रशासकीय इमारत, यमाई तलाव, शहरातील विविध रस्त्यांची कामे, आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाची विविध कामे यांसह मंगळवेढा येथे २४ गावांच्या उपसासिंचन योजना, चोखामेळा, महात्मा बसवेश्वर आदी कामांसाठी निधी देण्यात यावी, अशी मागणी नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके, भगिरथ भालके यांनी आपल्या भाषणातून केली. याप्रसंगी ना.प्रकाश आबिटकर, ना.भरत गोगावले, खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, माजी मंत्रीद्वय सिध्दाराम म्हेत्रे, तानाजी सावंत, माजी आमदार शहाजीबापू पाटील, जिल्हा प्रमुख महेश साठे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र आणि कॉरिडॉर

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्रीविठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनार्थ राज्य-परराज्य, देश-विदेशातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. त्यामुळे पंढरीला जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र करावयाचे आहे. पंढरपूर येथील कॉरिडॉरचे काम सर्वांना विश्वासात घेऊनच केले जाईल. आता तर भगिरथ भालके देखील आपल्याबरोबर आहेत. त्यामुळे सर्वांनी मिळून या पंढरपूरचा कायापालट करावयाचे आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

#### ऑपरेशन-बिपरेशनच्या फंदात आपण पडत नाही

आँपरेशन टायगरची सुरुवात झाली आहे का? असा प्रश्न प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले असता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्टपणे सांगून टाकले की, आपण एकदाच आँपरेशन केलेले होते. ते अजून देखील सर्वांच्या लक्षात आहे. आजपर्यंत आपल्या शिवसेनेत कित्येक जण सहभागी झालेले आहेत. त्यामुळे जर औषध, गोळ्याने उपचार होत असेल तर आँपरेशन-बिपरेशनच्या फंदात आपण पडत नाही.

#### शंभर कोटींच्या निधीची घोषणा झालीच नाही

भगिरथ भालके यांनी पक्ष प्रवेशा संदर्भात माहिती घेताना घेतलेल्या पत्रकार परिषदेच्यावेळी ज्या दिवशी पक्ष प्रवेश होईल त्याच दिवशी नेत्याकडून पंढरपूरच्या विकासकामांसाठी शंभर कोटी रुपयांच्या निधीची घोषणा करुन घेऊ, असे सांगितले होते. मात्र उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केवळ पंढरपूर पालिकेच्या प्रशासकीय इमारतीसाठी निधी आणि मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर आणि चोखामेळा स्मारकासाठी निधी बद्दलच मोगम उहापोह केला. त्यामुळे शंभर कोटी निधी आणू म्हणणारे भालके यापुढील काळात किती निधी आणतात? हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.

## थोडक्यात...



### रणरणत्या उन्हात अनवाणी फिरणाऱ्यांना चप्पल वाटप

**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

शहरात भीषण उन्हामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, रस्त्यावरून अनवाणी चालणाऱ्या कष्टकऱ्यांचे हाल होत आहेत. रखरखत्या उन्हात अनवाणी चालणाऱ्या कष्टकऱ्यांच्या वेदना ओळखून संभाजी ब्रिगेडच्या वतीने रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, सिद्धेश्वर मंदिर, सात रस्ता परिसरातील भर उन्हात अनवाणी फिरणाऱ्या नागरिकांना चप्पल वाटप करण्यात आली. यावेळी शाम कदम, संभाजी भोसले, मीनल दास, शेखर भोसले, मनीषा कोळी, सोनाली सगर आदी उपस्थित होते.

### सतत मोबाईल चेक करुन चारित्र्यावर घेतला संशय

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

सतत मोबाईल चेक करुन विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेतल्याप्रकरणी पतीसह सासरकडील मंडळीच्या विरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत दिव्याराणी विजय कामुर्ती (पाटील नगर, सोलापूर) यांनी ११ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, लग्नात सोने पैसे दिले नाही, योग्य मानपान केला नाही, असे म्हणत व मोबाईल चेक करत चारित्र्यावर संशय घेत पतीसह सासरच्या मंडळींनी मानसिक व शारिरिक छळ केला. कर्ज फेडण्यासाठी माहेरुन १३ लाख रुपये घेऊन ये, असे म्हणत जुलै २०२५ ते २४ जानेवारी २०२६ पर्यंत मारहाण केली. यात्प्रकरणी पती विजय कामुर्ती, सासू रंगम्मा कामुर्ती, सासरे श्रीनिवास कामुर्ती (रा.यशवंत सोसायटी, स्वागत नगर, सोलापूर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### पोलिसाचा खबरी आहे असे म्हणत तिघांनी केले एकास मारहाण

**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

पोलिसांचा खबरी आहे तू येथे आमची टीप द्यायला आला का? असे म्हणत तिघा जणांनी एकास मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि.१० एप्रिल रोजी लखन परदेशी, विकास आयगोळी, सोहेल मुलाणी, विशाल आयगोळी (तिघेही रा.जुना विजापूर नाका, सोलापूर) यांनी किरण राजेंद्र जाधव (रा.६६९ झोपडपट्टी नंबर १, जुना विजापूर नाका, सोलापूर) याला पोलिसाचा खबरी आहेस. तू येथे आमची टीप द्यायला आला का? असे म्हणत शिवीगाळ व मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बार्शीत पोलिसांचा रुट मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहरात शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी; यासाठी बार्शी शहर पोलीस ठाण्याच्यावतीने रुट मार्चचे आयोजन करण्यात आले होते. हा रुट मार्च शिवसृष्टी, भीमनगर, सिद्धार्थनगर, हांडे गल्ली, कोर्ट चौक, तानाजी चौक मार्गे पुन्हा शिवसृष्टीपर्यंत काढण्यात आला. याद्वारे जयंती उत्सव शांततेत पार पाडण्याचा संदेश देण्यात आला.

डीजे, डॉल्बीमुक्त जयंती साजरी करण्यात यावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या अनुषंगाने सर्वांनी पुढाकार घ्यावे, असे आवाहन पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले. या रुट मार्चमध्ये सहाय्यक पोलिस निरीक्षक समीर ढोरे, पोलिस उपनिरीक्षक महेश गळगटे, पोलिस उपनिरीक्षक सोनम जगताप यांच्यासह पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते.

## लाडक्या बहिणींना ई-केवायसीबाबत चुकीचे मार्गदर्शन; लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होईनासे झाले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ई-केवायसी करण्यासाठी अनेक वेळा मुदतवाढ दिले आहे. परंतु अंगणवाडी सेविका, आपले सरकार केंद्र चालकांकडून ई-केवायसीबाबत चुकीचे मार्गदर्शन केले जात असल्याने लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होईनासे झाले आहे. याकडे लक्ष वेधताना लाडक्या बहिणींना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित पद्मशाली सखी संघमने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारर, उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



अंगणवाडी सेविका व आपले सरकार (महाईसेवा) यांच्याकडे ई-केवायसी दुरुस्ती करण्याची सोय होती. परंतु प्रत्यक्षात अंगणवाडी सेविकांकडे गेले असता ते नागरिकांना योग्य मार्गदर्शन करू शकले नाही किंवा त्यांच्याकडून रीतसर काम पुढे सरकविण्यात आलेला नाही. मोबाईलवरुन थेट दुरुस्ती करण्याचे सोय असल्याचे शासनाकडून सांगितले जाते. पण, प्रत्यक्षात ई-केवायसी दुरुस्ती करण्याचे पोर्टल बंद आहे. महिलांचे आधार कार्ड ज्यावेळेस पोर्टलवर सबमिट करण्यात येते. त्यावेळी आधार क्रमांक ई-केवायसी दुरुस्तीच्या यादीमध्ये नाही, असा स्पष्ट मेसेज येत आहे. एकीकडे ई-केवायसी दुरुस्ती करण्यासाठी मुदतवाढ द्यायचे, पण, त्या संबंधित कार्य सोपविलेले व्यक्ती खरेच महिला आहे, लाभार्थी आहेत का नाही? हे पडताळणी अथवा कधीही प्रत्यक्ष भेट किंवा त्यांच्या खात्यात हफ्ता जमा होते का नाही? याचे निरसन केलेले आढळत नाही तर मुदतवाढ देऊन काय उपयोग असे आम्हाला वाटत आहे. अनेक लाडक्या बहिणींना गेल्या ३-४ महिन्यांपासून हफ्ता येण्यास बंद झाले आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे. रुचिरा मासम, सविता येदूर, ममता तलकोकूल, गीता भूदत्त, वनिता सुरम, सुनीता क्यामा यांच्या शिष्टमंडळाने हे निवेदन सादर केले.

# एमपीएससी भरतीला वेग

## उशीर करणाऱ्या विभागांवर कारवाई; सोलापूरसह राज्यभरातील रिक्त पदांसाठी बिंदूनामावली तयार करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

राज्यातील शासकीय भरती प्रक्रियेला लागणारा विलंब कमी करण्यासाठी शासनाने आता ठोस पावले उचलली आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत होणाऱ्या भरतीसाठी आवश्यक असलेली मागणीपत्रे वेळेत न पाठवणाऱ्या विभागांवर थेट जबाबदारी निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत या संदर्भात स्पष्ट निर्देश देण्यात आले.

राज्यसेवा व इतर स्पर्धा परीक्षांसाठी विविध विभागांकडून रिक्त पदांची माहिती आणि मागणीपत्र एमपीएससीकडे पाठवले जाते. मात्र, अनेकदा ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होत नसल्यामुळे भरती प्रक्रिया रखडते. परिणामी, हजारो पदे दीर्घकाळ रिक्त राहतात आणि उमेदवारांमध्ये नाराजी वाढते. या पार्श्वभूमीवर ६ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत सर्व विभागांना त्यांच्या अधिपत्याखालील रिक्त पदांचा तातडीने आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी बिंदूनामावली (रोस्टर) अद्ययावत करण्यावर विशेष भर देण्यात आला. सोलापूरसह राज्यातील सर्व जिल्ह्यांची बिंदूनामावली अंतिम करून त्यानुसार भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे आरक्षण व पदसंख्या निश्चित करण्यात स्पष्टता येऊन भरती प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे. शासनाने सर्व विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

प्रत्येक संवर्गातील रिक्त पदांची अद्ययावत माहिती तातडीने सादर करावी, बिंदूनामावली अद्ययावत ठेवावी आणि मागणीपत्रे विहित मुदतीत एमपीएससीकडे पाठवावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. मागणीपत्र उशिरा सादर झाल्यास संबंधित विभागांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांकडूनही वेळेत मागणीपत्र देण्याची मागणी वारंवार केली जात आहे.

अनेकदा एमपीएससीकडून जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर काही विभागांकडून उशिरा मागणीपत्र पाठवले जाते. त्यामुळे जाहिरातीत बदल करावे लागतात आणि पदसंख्या तसेच आरक्षणात फेरबदल होतात. अशावेळी उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची संधी द्यावी लागते, असे स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

#### २०० पेक्षा अधिक पदे भरण्याची गरज

सोलापूर जिल्ह्यातही विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याचे समोर आले आहे. तलाठी पदांची ७० ते ८०, महसूल सहाय्यकांची १२० पदे तसेच मंडळ अधिकारी पदांच्या काही जागा असे २०० पेक्षा अधिक जागा रिक्त आहेत. ही पदे भरण्याची गरज आहे. त्यामुळे एमपीएससीमार्फत होणाऱ्या भरती प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान : उपक्रमशील शाळा, आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्यावतीने दिल्या जाणाऱ्या उपक्रमशील शाळा, आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कारार्थ्यांची नावे जाहीर करण्यात आली. गुरुवार, दि.१६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता कुंभार वेस येथील प्रांगणात प्राचार्य डॉ.विजयकुमार उबाळे यांच्या हस्ते, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली व सो.स.क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री, सहस्त्रार्जून शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजू भूमकर यांच्या उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, उत्सव समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत बिराजदार, कार्याध्यक्ष अनिल वजीरकर यांनी दिली.

ज्ञानज्योती मराठी विद्यालय, सहस्त्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिर, हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व समाधान माध्यमिक प्रशाला या चार शाळांची उपक्रमशील शाळा म्हणून निवड करण्यात आली. आदर्श शिक्षक म्हणून गुरुनाथ वांगीकर, सोमेश्वर याबाजी, विजयालक्ष्मी बिराजदार, रामदास खवेकर, शितल महिमाने, कावेरी द्यावरकोंडा, मधुमती खंडेराव लालबोंद्रे, वैशाली कदम, सूर्यकांत हत्तुरे-डोगे, प्रकाश राचेटी, शुभांगी कलकेरी, रियाज नदाफ, मनीषा कोकाटे, राजअहमद बाबूलाल शेख तर आदर्श शिक्षकेतर कर्मचारी म्हणून महारुद्र कत्ते, गणेश कविटकर, डॉ.शिवाजी शिंदे, मल्लिकार्जुन तालिकोटी यांचा सन्मान करण्यात येणार आहे. डॉ.अंजली शिरसी यांची 'बालभारती'वर निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४११

**ऐसीं गर्जती पुराणें ।**
**नका जाऊ आडराणें ।।**

नैसर्गिकत: जवळपास प्रत्येकालाच आपण जे करतो आहोत ते बरोबरच आहे असे वाटत असते. एखाद्याने आपण करीत असलेले चूक असल्याचे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला तर आपण आपल्या कृतीला दुजोरा देण्यासाठी पुरावे देतो किंवा दाखले देऊन ते पटवून दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्या कृतीला पुराण किंवा शास्त्राची जोड दिल्यास त्याला निश्चितच वजन येते, याची जाणीव असल्याने शास्त्राचा, पुराणाचा थोडाफार अभ्यास असणारी मंडळी न चुकता शास्त्राचा, पुराणाचा आधार घेतात. शास्त्र पुराणाची जोड देऊन कृती योग्य असल्याचे दाखविताच समोरचाही गप्प होतो. चुकीच्या कृतीला पुराणाची जोड देणे अत्यंत अयोग्य आहे. कारण कोणत्याही पुराणात चुकीच्या मार्गाला पुष्टी दिलेली नाही. त्याचबरोबर अयोग्य गोष्टीला पाठिंबाही दर्शविलेला नाही. म्हणून पुराणाचा आधार घेऊन चुकीच्या मार्गावर जाणे उचित



नसते. पुराणांनी गर्जना करून स्पष्टपणे आडमार्गानी न जाण्याचा मार्ग दाखविला आहे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम अनेक संत महात्म्यांना सद्गुरु लाभले नाहीत. तेव्हा त्यांनी पुराण, शास्त्रांनाच सद्गुरुचे स्थान देऊन आपले जीवन कार्य केले. जीवनातील प्रत्येक प्रश्नांची, समस्यांची उकल अत्यंत योग्य प्रकारे पुराण, शास्त्रांनी केली असल्याने त्यावर विश्वास ठेवून सकारात्मक दृष्टी जोपासून पुराण शास्त्रांचा मार्ग जीवनात अवलंबिला तर अपयशाचे काटे मोडण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. पण पुराण शास्त्राचा अर्धवट अभ्यास करून किंवा मनाला आवडेल तसा चुकीचा अर्थ लावून त्याचा अवलंब करण्याचे ठरविले तर कमी अधिक प्रमाणात नुकसान झाल्याशिवाय राहत नाही. काळामुळे पुराणातील एखादी गोष्ट कालबाह्य झाली असेल तर तीचा अंगिकार करावाच असे बंधन नाही. अर्थात, आपण ती गोष्ट, तो मार्ग सोडून इतर बाबीचा स्विकार करायला हरकत नाही. जे योग्य आहे, ते जेथून मिळेल तेथून घ्यायलाच हवे. पुराण, शास्त्रांमध्ये निती नियमांचा साठा असतो. अनुभवी महात्म्यांचे अनुभवही त्यात रेखाटलेले असतात. आपणाला त्यातून काय आणि कसे व किती घ्यायचे हे ज्याचे त्याच्यावर अवलंबून असते. मूळात वत्तीच नकारात्मक असेल तर त्यातून कांहीच घेता येणार नाही. उलट त्यास नाव ठेवून मोकळी होणारेही लोक पाहायला मिळतात. कोणताही व्यक्ती व्यक्तिश: परीपूर्ण नसतो. त्याची कशात ना कशात कांही तरी उणीव ही असतेच. त्यामुळे आपल्यातही उणीव असणार आहे. आपल्यातील उणीवा, त्रुटी भरून काढण्यासाठी व आपले जीवन सुखकर बनविण्यासाठी आपणाला जेवढे जमेल तेवढे पुराण, शास्त्रातून सकारात्मक दृष्टीने घेण्याचा निश्चित प्रयत्न करायला हवा, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. १३ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - चैत्र कृ. एकादशी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- धनिष्ठा (१६.०२)**
**योग - शुभ (१७.१५)**
**करण - बव (१३.१८)**
**राहू काल : सोमवार**
**स. ७.३० ते ९.००**

**दिनविशेष : १७३१: सातारा आणि कोल्हापूरच्या छत्रपतींमध्ये 'वारणेचा तह' होऊन सीमावाद मिटला.**
**१८९५: भारतातील प्रसिद्ध वैद्यकीय संशोधक वसंत रामजी खानोलकर यांचा जन्म.**
**१९१९: जालियनवाला बाग हत्याकांड.**
**१९५०:आध्यात्मिक गुरु आणि तत्त्ववेत्ते वेंकटरमण अय्यर यांचे निधन.**
**१९५६: अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते सतीश कौशिक यांचा जन्म.**

# ज्वारीचे भाव वाढीच्या उंबरठ्यावर; टप्प्याटप्प्याच्या पेरणीचा परिणाम

## आवक वाढूनही मागणीत तेजी; गुणवत्तेनुसार दरात मोठी तफावत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या ज्वारीच्या दरात चढ-उतार सुरू असले, तरी आगामी काळात दरवाढीची शक्यता स्पष्टपणे दिसू लागली आहे. यंदा पावसाळा लांबल्याने ज्वारीची पेरणी एकाच वेळी न होता टप्प्याटप्प्याने झाली. त्यामुळे बाजारात ज्वारीची आवकही सातत्याने होत असून, एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर माल येत नसल्याने दरावर तातडीचा दबाव येत नाही. याच पार्श्वभूमीवर वाढती मागणी लक्षात घेता पुढील काही दिवसांत दरात सुधारणा होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला सुमारे ७०० ते ८०० क्विंटल इतकी असलेली ज्वारीची आवक आता वाढून दीड हजार क्विंटलच्या पुढे गेली आहे. दरम्यान, प्रतिक्विंटल ज्वारीचे दर सध्या ३,००० ते ४,५०० रुपयांच्या दरम्यान असून, उत्तम प्रतीच्या ज्वारीला ५,००० रुपयांपेक्षा अधिक दर मिळत आहे. याउलट जुन्या ज्वारीचे दर २,८०० ते ३,५०० रुपयांदरम्यान असल्याचे दिसून येते. गुणवत्तेनुसार दरात मोठी तफावत असल्याने चांगल्या प्रतीच्या मालाला व्यापाऱ्यांकडून अधिक मागणी आहे.


दररोज बाजारात सुमारे ५०० ते ७०० पिशव्यांची आवक होत असून, नव्या ज्वारीला तुलनेने चांगला प्रतिसाद मिळत आहे. पावसामुळे वेगवेगळ्या टप्प्यांत पेरणी झाल्याने काही भागांत ज्वारी अजूनही हुरड्याच्या अवस्थेत आहे. त्यामुळे सर्व उत्पादन एकाच वेळी बाजारात येण्याची शक्यता कमी असून, हीच बाब शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

बाजारातील जाणकारांच्या मते, सध्या मागणी हळूहळू वाढत असताना आवक मात्र नियंत्रित राहिली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत आवक कमी झाली, तर ज्वारीच्या दरात निश्चितच वाढ होऊ शकते. आडत व्यापारी बसवराज इटकळे यांनीही टप्प्याटप्प्याच्या पेरणीमुळे आवक नियंत्रित राहिल्याचे सांगत, भविष्यात दर वाढण्याचा अंदाज व्यक्त केला.

राज्याच्या पातळीवरही यंदा ज्वारीच्या पेरणी क्षेत्रात काही प्रमाणात घट झाली आहे. सरासरी १४.९५ लाख हेक्टरच्या तुलनेत २०२५-२६ मध्ये सुमारे १३.८९ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. तर सोलापूर जिल्ह्यात सरासरी २.७५ लाख हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत यंदा २.२७ लाख हेक्टर (८३ टक्के) पेरणी झाली आहे. यामुळे उत्पादनावरही काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्याच्या स्थितीत ज्वारीचे दर स्थिर दिसत असले, तरी कमी पेरणी, टप्प्याटप्प्याने होणारी आवक आणि वाढती मागणी या घटकांच्या पार्श्वभूमीवर येत्या काळात ज्वारीच्या भावात तेजी येण्याची शक्यता अधिक बळकट होत आहे.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### शिक्षक नव्हे, तर संस्कारक्षम गुरू बना



ज्याप्रमाणे शिक्षकांनी केवळ ज्ञान देणारे 'टीचर' न राहता संस्कारांचे वाहक आणि समाजाचे दिशादर्शक 'गुरू' बनावे, यासाठी अंतर्मनाची शुद्धी, संयम आणि सजगता आवश्यक असल्याचे प्रतिपादन प.पू. निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी केले.

वालचंद शिक्षण समूहाच्या 'टीचर वेलनेस रिट्रीट २०२६' मध्ये मार्गदर्शन करताना मुनिश्रींनी 'माइंडफुलनेस' आणि 'माइंड फुल्लनेस' यांतील सूक्ष्म फरक स्पष्ट केला. शिक्षकाचे मन सतत जागृत आणि सकारात्मक विचारांनी समृद्ध असावे, तरच तो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात प्रभावी योगदान देऊ शकतो. अंतर्मनातील नकारात्मकता दूर करण्यासाठी पंचेंद्रियांबरोबरच मन या सहाव्या इंद्रियाच्या शुद्धतेचे महत्त्व अधोरेखित करताना मुनिश्रींनी उपस्थित शिक्षकांना प्रत्येकाला पाच द्राक्षे देऊन स्पर्श, रंग, आवाज आणि चव अशा पंचेंद्रियांद्वारे त्याचा आस्वाद कसा घ्यावा, याचे प्रात्यक्षिक दिले. कोणत्याही पदार्थाचा किंवा कृतीचा पूर्ण सजगतेने आस्वाद घेणे म्हणजेच खरी जागरूकता असल्याचे त्यांनी पटवून दिले. त्यांनी 'पाच डब्लू' (का, कसे, किती, कोणते आणि कोठे) या सूत्राचा वापर करून प्रत्येक कृती अर्थपूर्ण व उद्देशपूर्ण करण्याचे आवाहन केले.

# खुला प्लॉट विकायचा असल्याचे दाखवत लाखोंची फसवणूक

**प्लॉट जागा खरेदी देण्याच्या तगादा लावल्याने प्रकार झाला उघड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

घर व हॉस्पिटल बांधण्यासाठी खुला प्लॉटची गरज असलेल्या एका व्यक्तीला दोघांनी मिळून दुसऱ्याच्या नावाचा असलेला प्लॉट स्वतःचा असल्याचे दाखवत विक्री करायचे आहे असे सांगत लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा सोलापूर शहरात उघड झाला आहे. रोख आरटीजीएस व ऑनलाईन द्वारे काही रक्कम दिली. प्लॉट जागा खरेदी देण्याचा तगादा लावला असता हा प्लॉट दुसऱ्याच्या नावाचा आढळून आल्याने फसवणूक झाल्याचे उघडकीस आले.

दि. २१ नोव्हेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत संजय सखाराम बडोदकर, वय ६२, रा. १३६ आर्यनंदी नगर, वसंत विहार रोड सोलापूर यांना घर व हॉस्पिटल बांधण्यासाठी खुल्या प्लॉटची गरज असल्याने त्यांनी करण प्रभूलिंग दुगाने व संदीप प्रभूलिंग दुगाने, रा. माही विला, प्लॉट नंबर ६६, गायत्री नगर, वसंत विहार, सोलापूर यांच्याकडे गेले असता त्यांनी ११६.७८ मीटरचा प्लॉट विक्री करायचा आहे. ते बघा असे म्हणाल्यावर संजय बडोदकर यांनी तो प्लॉट बघून २४५० रुपये प्रति स्क्वेअर फूट प्रमाणे एकूण रक्कम ३० लाख ७७ हजार रुपयाने खरेदी करण्याचे ठरले. त्यानंतर दि. २१ नोव्हेंबर २०२४ रोजी ३ लाख रुपये संदीप दुगाने यांना रोखीने दिले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचे शिवम डेव्हलपर्स अँड कन्स्ट्रक्शनचे पावती क्रमांक ६५२ दिले.

दि. १० डिसेंबर २०२४ रोजी २ लाख रुपये संदीप दुगाने यांच्या युनियन बँक खातेवर आरटीजीएस द्वारे जमा केले. दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी करण दुगाने यांच्या मोबाईलवर फोन पे वर ५० हजार रुपये दोन वेळेस असे १ लाख रुपये पाठवून दिले. दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी करण दुगाने यांच्या फोनपेवर १ लाख रुपये दिले. दि. १४ जानेवारी २०२५ रोजी करण दुगाने यांच्या फोनपेवर १ लाख रुपये दिले.

दि. १५ जानेवारी २०२५ रोजी परत ५० हजार रुपये फोन पे वर पाठवून दिले. उर्वरित रक्कम २२ लाख २७ हजार रुपये खरेदी करता वेळी देण्याचे ठरले. परंतु बरेच दिवस झाले प्लॉट जागा खरेदी देण्याचे करण व संदीप दुगाने यांना तगादा लावला असता, प्लॉट हा विक्रांत वानकर यांच्या नावे व मालकीचा असल्याचे समजले त्यांच्याकडे विचारणा केली असता.

वानकर यांनी करण व संदीप दुगाने यांना आमचा प्लॉट विक्री करायचा आहे असे सांगितले नाही. आमचा आणि त्यांचा काही एक संबंध नाही असे सांगितले. तेव्हा संजय बडोदकर यांना खात्री झाली की करण व संदीप दुगाने यांनी त्यांची वेळोवेळी फसवणूक केली आहे व दिलेली रोख रक्कम, ऑनलाईन द्वारे दिलेली रक्कम ही परत न देता त्यांची फसवणूक केली आहे.

याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास डी. पाटील करत आहेत.



# जैन श्राविका आश्रमची आस्था संस्थेस स्वयंपाक उपयोगी साहित्याची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

श्राविका संस्था नगर येथील ब्र.राजुलमती माताजी दिंगबर जैन श्राविका आश्रम गेल्या ५० वर्षांपेक्षा अधिक काळापासून चालू होती. या आश्रमात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुली, विधवा, परित्यक्ता महिलांना अल्पदरात भोजनाची व राहण्याची व्यवस्था केली जात होती. या आश्रमातील दैनंदिन स्वयंपाक उपयोगी शेंगडी, मोठे भांडे, कुकर, स्टील टाकी, फफ्रीज, असे बाजारनूसार ३० हजारांचे भांडे दान स्वरूपात सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या आस्था सामाजिक संस्थेला मोफफत दिले.. आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने दिलेल्या साहित्यांचा हृदयपूर्वक स्वीकार करून स्वयंपाक उपयोगी साहित्य भेट दिल्याबद्दल श्राविका आश्रमाचे ऋण व्यक्त केले. यासाठी श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त करण शहा, विश्वस्त अंजली शहा, विश्वस्त देवई शहा, वरिष्ठ दिप्ती शहा सर्व विश्वस्त यांचे आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे यांनी ऋण व्यक्त केले

# बार असोसिएशनतर्फे महात्मा फुले यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

बार असोसिएशन हॉल येथे महान समाजसुधारक, शिक्षणाचे पुरस्कर्ते व समतेचे प्रणेते महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन भावपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या समाजपरिवर्तनातील योगदानाचा गौरव करत त्यांच्या विचारांची आजच्या काळातही असलेली प्रासंगिकता अधोरेखित केली.

'बार'चे ज्येष्ठ वकील अॅड. अजय रणशुगारे, माजी सचिव अॅड. श्रीनिवास क्यातम, अध्यक्ष अॅड. बाबासाहेब जाधव यांनी मनोगतातून फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. बारचे सचिव अॅड. बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले. आभार अॅड. मळसिद्ध देशमुख यांनी मानले. यावेळी माजी अध्यक्ष अॅड. धानय्या चिवरी, अॅड. बसवराज सावळगी, अॅड. असीम बांगी, अॅड. विवेक शाक्य, अॅड. अविनाश बिराजदार उपस्थित होते.



# महात्मा फुलेंचे विचार आजही सर्वांना दिशादर्शक

**सम्यक विचार मंच आयोजित मिलिंद व्याख्यानमाला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा आजच्या तरुण पिढीने जतन करणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुण्याचे विक्रम सोनवणे यांनी केले.

सम्यक विचार मंच आयोजित मिलिंद व्याख्यानमालेत उद्योजक राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अरुणकुमार इंगळे होते. यावेळी विचारमंचावर विजयानंद भालशंकर, रवी ढावरे, सुधीर चंदनशिवे, शांतीकुमार कांबळे, चंद्रकांत कोळेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सोनवणे पुढे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते दूरदृष्टीचे उद्योजकही होते. त्यांनी आपल्या व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नातून पुणे शहरात अनेक शाळा सुरू करून शिक्षणाचा प्रसार केला आणि समाजासमोर आदर्श निर्माण केला. त्यांनी सामाजिक क्रांतीसाठी आपली संपत्तीही समाजाच्या विकासासाठी खर्च केली. त्यामुळे त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे ठरतात. फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांचे आकलन झाल्यास समाजाचा सर्वांगीण विकास होईल. तरुणांनी या महापुरुषांच्या कार्याचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घेणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांनी केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, प्रभाकर भालेराव, लक्ष्मण चलवादी, प्रा. अर्जुन व्हटकर, प्रा. डॉ. वनिता सावंत-चंदनशिवे, अनिल जगझाप, अनिरुद्ध वाघमारे, प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे, सुनिता गायकवाड, प्रा. अब्राईम कुमार, बापूसाहेब सदाफुले, पी. डी. सोनकांबळे, अॅड. दशरथ वलेकर आदींसह बहुसंख्य श्रोते उपस्थित होते.

# घोषणांचा गाजावाजा; 'आठ हजार' मानधन अजूनही अधांतरीच!

## वर्ष उलटले तरी अंमलबजावणी शून्य; २७ हजार ग्रामरोजगार सेवक संतप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल-**

राज्यातील ग्रामरोजगार सेवकांना दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय मोठ्या गाजावाजात जाहीर झाला; मात्र वर्ष उलटूनही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. शासन निर्णय काढूनही एक रुपयाही खात्यावर जमा न झाल्याने सुमारे २७ हजार ग्रामरोजगार सेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी २६ जानेवारी २००८ पासून ग्रामरोजगार सेवक कार्यरत आहेत. विहीर, फळबाग, शौचालय, गांडूळ खत प्रकल्प, घरकुल, रेशीम उद्योग अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. मात्र एवढ्या जबाबदाऱ्या पार पाडूनही त्यांना अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामरोजगार सेवकांच्या बैठकीत दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय जाहीर केला होता. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी यासंदर्भात शासन निर्णयही काढण्यात आला. मात्र आजपर्यंत या निर्णयाची अंमलबजावणीच झालेली नाही. त्यामुळे हा निर्णय केवळ घोषणापुरताच होता का, असा संतप्त सवाल सेवकांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामपातळीवर सर्व कामांचा भार सांभाळणाऱ्या सेवकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. मिळणारे तुटपुंजे मानधनही कामाशी संबंधित खर्चातच संपत असल्याने घरखर्च भागवणे कठीण झाले आहे. ऑनलाईन हजेरी प्रणाली सुरू करण्यात आली असली, तरी प्रिंटरची सुविधा नसल्याने छपाईचा खर्चही स्वतःच्या खिशातून करावा लागत आहे. त्यामुळे योजनांची अंमलबजावणी करतानाच आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.

तब्बल १७ वर्षे सेवा करूनही ग्रामरोजगार सेवकांना ना शासकीय दर्जा, ना स्थैर्य, ना कोणत्याही सुविधा मिळाल्या आहेत. शासनाकडून त्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा किमान अंशकालीन कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याबाबतही ठोस निर्णय झालेला नाही. इतर संघटनांच्या मागण्यांवर तत्काळ निर्णय घेतले जात असताना, ग्रामरोजगार सेवकांच्या प्रश्नांकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना तीव्र होत आहे.

दरम्यान, शासनाच्या ग्रामीण विकासाच्या महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचेही चित्र समोर येत आहे. घोषणांचा गाजावाजा आणि प्रत्यक्षात शून्य अंमलबजावणी यामुळे ग्रामरोजगार सेवकांचा संयम सुटत चालला असून, लवकरच राज्यभर तीव्र आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### तातडीने अंमलबजावणी करा

शासनाने घेतलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मानधनवाढीचा निर्णय झाला; मात्र आजतागायत अंमलबजावणी शून्य आहे. सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, असे ही संघटनेच्यावतीने सांगण्यात आले.



# मानवता हाच फुले, आंबेडकरांच्या समतेचा घटक

**डॉ. दुष्यंत कटारे; सोलापूर विद्यापीठात भारतरत्न सामाजिक समता सप्ताह**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

समता ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती विचारांची क्रांती आहे. जेव्हा समाजात समतेचा विचार रुजतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाला गती मिळते. आजच्या धावपळीच्या आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या युगात तंत्रज्ञान जरी प्रगत झाले असले, तरी महापुरुषांच्या वैचारिक वारशाचे काय, असा प्रश्न निर्माण होतो. अशा काळात मानवतेसाठी महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समतेचा संदेश आणि त्यासाठी सांगितलेला शिक्षणाचा मार्ग हाच मानवतेच्या मुक्तीचा खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन लातूर येथील कै. व्यंकटराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र आणि सामाजिक शास्त्रे संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतरत्न सामाजिक समता सप्ताहात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंती निमित्त आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे होते. मंचावर सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे आणि वित्त व लेखा अधिकारी महादेव खराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गौतम कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानेश्वरी हजारे यांनी सूत्रसंचालन केले. हाजीमलंग शेख यांनी आभार मानले.

# महात्मा फुले जयंती गैबीपीर उर्दू स्कूल येथे साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ एप्रिल**

गैबीपीर उर्दू प्राथमिक स्कूल सोलापूर येथे सत्यशोधक महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. यावेळी शाहु-फुले आंबेडकर मुस्लीम विचार मंचाचे अध्यक्ष हाजी के. बी. नदाफ हे कार्यकमाचे अध्यक्ष होते तर अभियंता बाबूराव म्हेत्रे यांच्या हस्ते महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमेवर हार घालून अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी प्रस्तावना व स्वागतशाळेचे मुख्याध्यपक अ. मजीद शेख यांनी केले. बाबूराव म्हेत्रे यांनी महात्मा फुले यांनी समाजातील अशपृस्ता 'जातिभेद आणि अन्यायविरुध लढा' या विषयवर सविस्तर माहिती दिली. प्रमुख पाहुणे सोजल राऊळ यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांनी शाळा स्थापनासाठी केलेल्या प्रवासबद्दल माहिती दिली. जमीअत उलेमा हिंदचे सचिव हसीब नदाफ यांनी ज्योतिबा फुले यांनी शेतकरी व समाजासाठी केलेले कामाची माहिती दिली.

बोधी वृक्ष संस्थेचे अमोल वाघमारे यांनी महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणासाठी योगदान दिल्याबद्दल माहिती दिली. शिक्षिका मर्सरत शेख यांनी 'महात्मा फुले व त्यांचे कार्य' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यकमाचे अध्यक्ष हाजी के. बी. नदाफ यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांचे कार्यबद्दल मार्गदर्शन केले व महात्मा फुले यांचे पाच पुस्तक पाहुण्यांना भेट दिले.

कार्यकमात व्हाइस ऑफ मिडियाचे जिल्हा अध्यक्ष तौफिक नदाफ, सेवानिवृत मंडळ अधिकारी बसवराज संगेपाग, निलोफर शेख, शबाना जमादार, सलमा नदाफ, सुमैया शेख, यासीनबी शेख आदी पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शबीर अहमद शेख यांनी तर आभार अकबर मुतवल्ली यांनी मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# मोहोळ-वैराग मार्गावर जीवघेणा सापळा

## मलिकपेठ येथे रेल्वे पुलाजवळ सिमेंट रस्त्यात उघडे लोखंडी रॉड, प्रशासनाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. १३ एप्रिल-**

मोहोळ ते वैराग या महत्त्वाच्या दळणवळणाच्या मार्गावर मालिकपेठ येथे रेल्वे पुलाजवळ सिमेंट रस्त्याची अत्यंत धोकादायक अवस्था उघडकीस आली आहे. रस्त्याच्या पृष्ठभागातून लोखंडी रॉड उघडे पडल्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून, हा रस्ता अक्षरशः अपघाताला आमंत्रण देणारा 'जीवघेणा सापळा' ठरत आहे.

हा रस्ता प्रमुख मार्ग असल्याने येथे दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि व्यापारी वर्ग या मार्गाचा नियमित वापर करतात. अशा परिस्थितीत रस्त्याची ही बिकट अवस्था नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे.

सिमेंट रस्त्याच्या पृष्ठभागातून बाहेर आलेले धारदार लोखंडी सळई कोणत्याही क्षणी वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरू शकतात. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. वाहनांचे टायर फुटणे, वाहन घसरणे, अचानक तोल जाऊन पडणे अशा घटना



घडण्याची शक्यता वाढली आहे. काही वाहनचालकांनी या ठिकाणी थोडक्यात बचाव झाल्याच्या घटनाही सांगितल्या आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, या ठिकाणी काही काळापूर्वी सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कालांतराने सिमेंटचा थर उखडून गेला असून आतील लोखंडी सळई उघड्यावर आल्या आहेत. संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाने काम पूर्ण झाल्यानंतर योग्य देखरेख न केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिक करत आहेत. रात्रीच्या वेळी या ठिकाणी धोका आणखी वाढतो. अपुरी प्रकाश व्यवस्था, कोणतेही इशारा फलक नसणे आणि रस्त्यावर उघडे पडलेले रॉड-या सर्व बाबी अपघातासाठी पोषक ठरत आहेत. अंधारात वाहनचालकांना हे रॉड दिसत नसल्यामुळे अचानक अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी केल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित रेल्वे प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर यंत्रणांनी तातडीने पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा, नागरिकांच्या जीवाशी खेळ केल्याचा ठपका प्रशासनावर बसणार असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

### नागरिकांच्या तातडीच्या मागण्या

उघडे पडलेले लोखंडी रॉड तात्काळ काढून सुरक्षित करणे किंवा त्यांना कव्हर बसवणे.
खराब झालेल्या सिमेंट रस्त्याची त्वरित दुरुस्ती करणे.
धोकादायक ठिकाणी इशारा फलक, बॅरिकेड्स व रिफ्लेक्टर बसवणे
रात्रीसाठी पुरेशी प्रकाश व्यवस्था करणे.
निकृष्ट कामासाठी जबाबदार ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणे.

मोहोळ-वैराग मार्गावर मालिकपेठ येथे रेल्वे पुलाजवळ सिमेंट रस्त्यातील लोखंडी रॉड उघडे पडले आहेत. दुचाकीवरून जाताना खूप भीती वाटते. टायर फुटण्याचा आणि घसरून पडण्याचा धोका कायम असतो. विशेषतः रात्री तर काहीच दिसत नाही. हे तात्काळ दुरुस्त करायला हवे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्ता दुरुस्त करावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, ही आमची ठाम मागणी आहे. **- दत्तात्रय कादे, स्थानिक नागरिक**

---

## महत्वाचे...



### मोडनिंब येथील सर्वरोग तपासणी शिबिरात ९२ जणांची तपासणी

**मोडनिंब, दि. १२ एप्रिल-**

माढा तालुक्यातील मोडनिंब येथे महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.सकाळी दहा वाजता दत्त चौक, ग्रामपंचायत कार्यालय येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. महात्मा फुले यांचा सामाजिक सुधारणांचा वारसा पुढे चालविण्याचा संकल्प महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीने केला.प्राथमिक आरोग्य केंद्र, मोडनिंब येथे मोफत सर्वरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये दमा, मधुमेह, थायरॉईड, उच्च रक्तदाब, डेंग्यू, मलेरिया, सर्पदंश, विषबाधा तसेच विविध श्वसनाच्या आजारांवर तपासणी व उपचार करण्यात आले.या मोफत शिबिराचा एकूण ९२ नागरिकांनी लाभ घेतला. तज्ञ डॉक्टरांनी उपस्थितांची तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन केले. यावेळी दामोदर माळी, डॉ. प्रशांत कोल्हे, मृदुल माळी, रोहन माळी, किरण यादव, ऋषी यादव, ओंकार नामदे, ओंकार कोळी, माऊली माळी. बालाजी माळी, मयुर नामदे, मंगेश माने उपस्थित होते.



### लोकविकास हायस्कूलमध्ये महात्मा फुले यांची जयंती साजरी

**वेळापूर, दि. १२ एप्रिल-**

वेळापूर येथील लोकविकास शिक्षण प्रसारक संस्था संचलित लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल, लोकविकास मराठी मीडियम स्कूल व ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य अमोल पांढरे, मुख्याध्यापक सुनिल पताळे, अजित बनकर यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रशालेतील विद्यार्थी अहिल्या लवटे, मृणाल पिसे, आरोही सावंत, शुभश्री बनकर, स्वराज शिंदे, विरांश कुदळे, फैजान मुरसल, श्रेयस शेंडगे, रसिक साठे, पूजा जगताप, ऐमन तांबोळी , राजश्री भोसले व शिक्षक विद्या येवारे व राणी शिंदे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जयश्री साठे यांनी केले व आभार वैशाली पांढरे यांनी मानले.



### बार्शीत संभाजी ब्रिगेडची तालुका कार्यकारिणी जाहीर

**बार्शी, दि. १२ एप्रिल-**

संभाजी ब्रिगेडच्या बार्शी तालुका कार्यकारिणीची घोषणा उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात येत संघटनेने नव्या इनिंगची सुरुवात केली. प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या नेतृत्वात संघटनेचे काम राज्यस्तरावर सुरु आहे. याप्रसंगी नूतन तालुका अध्यक्ष म्हणून संग्राम देशमुख, तर शहराध्यक्षपदी दत्तात्रय जगताप यांची निवड जाहीर करण्यात आली. जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनलताई दास, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष विक्रांत वानकर, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, सचिन देशमुख, सुजीत लोखंडे, अविनाश जाधव आदी उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संभाजी ब्रिगेडच्या कार्याचा आढावा घेत नव्या पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. समाजहिताच्या दृष्टीने संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचे आवाहनही करण्यात आले. दरम्यान, तालुका संपर्क प्रमुखपदी शंतनू चोपडे, सचिवपदी आदित्य देवेंद्र पाटील, कार्याध्यक्षपदी यशवंत धस, तर युवा संघटकपदी कृष्णा देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली.



### आंबेडकर जयंतीत 'नो डीजे, नो डॉल्बी'; पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य : पोलिस प्रशासनाचे आवाहन

**टेंभुर्णी, दि. १२ एप्रिल-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्सव शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या वेळी नो डीजे, नो डॉल्बी धोरण राबवून पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातूनच जयंती साजरी करावी, असे स्पष्ट आवाहन सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांनी केले. बैठकीत मार्गदर्शन करताना आत्राम यांनी सांगितले की, जयंती उत्सवात सर्वांनी उत्साहाने सहभागी व्हावे; मात्र कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श ठेवून, प्रेरणादायी वातावरणात पारंपरिक वाद्यांचा वापर करून जयंती साजरी करावी, असेही त्यांनी नमूद केले. कायद्याचे उल्लंघन टाळून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीस टेंभुर्णी, मोडनिंब, बेंबळे, अरण व तुळशी या गावांतील आंबेडकरप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिदास पवार, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने, पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे तसेच पोलीस अंमलदार व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## सौरभ काटगावकर यांच्या गायनसेवेने श्रोते मंत्रमुग्ध

### धर्म संकीर्तन नववे पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ एप्रिल-**

सौरभ काटगावकर व सहकाऱ्यानी सादर केलेल्या अभंग गौळण भक्ती संगीतानी स्वामी भक्त अक्कलकोटवासीयाची मने जिंकली. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर येथे स्वामी महाराजाच्या १४८ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवात नववे पुष्प गुंफताना सौरभ काटगावकर व सहकाऱ्यांनी स्वामी चरणी भक्ती संगीत सेवा सादर केली.

प्रारंभी आयोध्येचा राम, पालखीच्या संगे आज मन माजे, दत्तगुरु दत्तगुरु, आमुचा कैवारी हनुमान; माझे माहेर पंढरी; कानडा राजा पंढरीचा, कन्नड भाषिकासाठी भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, गुरु हा संत कुळीचा राजा; गुरु हा प्राण विसावा माझा पद्मनाभा नारायणा



; श्री स्वामी समर्थ जय जयस्वामी समर्थ , नामजप आदी रसिक श्रोत्या च्या ओठावरील अभंग गीते सादर करुन रासिक श्रोत्यांची वाहवा मिळवली.

प्रारंभी सौरभ काटगावकर यांचा परिचय ओंकार पाठक यांनी करुन दिला. गायक सौरभ काटगावकर, तबला नितीन दिवाकर ;मृदुंग पखवाज; ज्ञानेश्वर दुधाने ओंकार पाठक (हार्मोनियम) अक्षय सरदेशमुख (ताल) आदी कलाकारांचा वटवृक्षस्वामी महाराज देवस्थान मंदिर सामती चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सचिव आत्माराम घाटगे, विश्वत महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, श्रीशैल गंवडी, मनोज जाधव, स्वामी लोणारी, काशीनाथ इंडे, बाळासाहेब कुलकर्णी, राजू भोसले, महादेव तेली, लक्ष्मण पाटील, प्रसाद सोनार, अशोक कडगंची, संजय पवार, रमेश शिंदे, सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे, मडोळा घिवारे, निगुताई हिंडोळे, जाजू , मनोज देगावकर ' ज्योती दिपक जरीपटके, प्रसाद पाटील उपस्थित होते.

---

## अमरनाथ यात्रेकरुंच्या आरोग्य तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयांना अधिकार द्या

### भाजप अकलूज मंडल सरचिटणीस ओंकार आडत यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १२ एप्रिल-**

जम्मू काश्मीर येथील श्री अमरनाथ यात्रा २०२६ साठीची नोंदणी १५ एप्रिलपासून सुरू होणार आहे. भाविकांना वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आणि प्रमाणपत्रे देण्यासाठी ग्रामीण रुग्णालयांना अधिकार द्या, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे अकलूज मंडल सरचिटणीस ओंकार रेखा दत्तात्रय आडत यांनी केली आहे.



यात्रेकरूंसाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय तपासण्यांबाबत, श्री अमरनाथ बोर्डाने आपल्या अधिकृत वेबसाइटवर महाराष्ट्र राज्यातील अधिकृत रुग्णालये आणि डॉक्टरांची यादी प्रसिद्ध केली आहे. सदर यादीनुसार, केवळ महाराष्ट्रातील शहरी भागांमध्ये, विशेषतः मुंबई आणि ठाणे येथे स्थित असलेली रुग्णालये आणि डॉक्टरच यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांना वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आणि प्रमाणपत्रे देण्यासाठी अधिकृत करण्यात आलेली आहेत. परिणामी, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आणि इतर जिल्ह्यांतील भाविकांना तीर्थयात्रेबाबत प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे, कारण केवळ वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना राज्यभर शेकडो किलोमीटरचा प्रवास करावा लागत आहे. मुंबई, ठाणे येथे जाऊन मेडिकल तपासणी करून वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास महाराष्ट्र राज्यातील भाविक श्री अमरनाथ यात्रा २०२६ करू शकणार आहेत.

श्री अमरनाथ यात्रा २०२६ साठी इतर शहरातील प्रमुख रुग्णालये व जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीचे अधिकृत अधिकार प्रदान करण्याबाबत श्राईन बोर्डाने सकारात्मक निर्णय घेतल्यास, महाराष्ट्र राज्यातील हजारो भाविकांना एक सुखकर आणि सुखद तीर्थयात्रेचा अनुभव सुनिश्चित करण्यासाठी अमूल्य साहाय्य मिळेल असे आवाहन त्यांनी केले आहे.

---



## सायली दुधाणे यांची सहाय्यक कर अधिकारी पदावर निवड

### करकंब कोष्टी समाजाच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब दि.१२ एप्रिल-**

करकंब ता.पंढरपूर येथील सायली किशोर दुधाणे यांची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत सहाय्यक कर अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल समस्त कोष्टी समाज बांधव, भगिनींच्या वतीने मंगल टकले यांच्या शुभहस्ते सहृदय सत्कार करण्यात आला. प्रथमतः श्री. चौंडेश्वरी मातेची पूजा सायली दुधाणे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी कोष्टी समाजाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी गितांजली टकले यांनी स्पर्धा परीक्षेतील उमेदवारांना संबंधित कुटुंबीयांनी जरी साथ दिली तरी यशस्वी झालेल्या व्यक्तीचे स्वतःचे ९५टक्के कष्ट असतात.स्वतः कष्ट घेतले तरच यश प्राप्त होते.सध्याच्या युगात स्पर्धा परीक्षेत वाढती स्पर्धा लक्षात घेता हे मिळवलेल यश हे टकले,दुधाणे परिवारासाठी खुप आनंददायी असल्याचे मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी ज्ञानेश्वर दुधाणे, प्रभाकर टेके,चंद्रकांत रसाळ,संजीवकुमार म्हेत्रे,स्नेहा दुधाणे,सुनील दुधाणे,यांनी मनोगते व्यक्त करत सायली दुधाणे यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करत अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी कोष्टी समाज बंधू,भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### मार्गदर्शनाचा भविष्यामध्ये नक्कीच फायदा होईल

सहाय्यक कर अधिकारी हे पद प्राप्त झाले असले तरी यापुढेही वरिष्ठ पद मिळवण्यासाठी माझा प्रयत्न असेल. कुटुंबीयातूनच दत्तप्रसाद नडे वर्धा जिल्हा जात पडताळणी कमिटी अध्यक्ष, गितांजली टकले उपविभागीय पोलीस अधिकारी, सागर टकले सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचे अनमोल मार्गदर्शन मिळत आहे. त्या मार्गदर्शनाचा भविष्यामध्ये नक्कीच फायदा होईल.
**- सायली किशोर दुधाणे**, नूतन सहाय्यक कर अधिकारी.

---

## माणुसकीचे दर्शन: सेवानिवृत्त भगिनींनी वाचविले फिरत्या गायीचे आणि वासराचे प्राण

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१२ एप्रिल-**

आजच्या धावपळीच्या युगात जिथे माणूस माणसाला विसरत चालला आहे, अशा काळात वैराग भागातील मानेगाव हद्दीत माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचे एक अनोखे उदाहरण समोर आले आहे. एका असहाय्य, फिरत्या (बेवारस) गायीला प्रसूती कळा सोसत असताना पाहून, सेवानिवृत्त आरोग्य सहाय्यिका अलका अंधारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देवदूतासारखे धावून जात तिची सुखरूप प्रसूती केली.

शनिवार, ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास मानेगाव हद्दीत एक फिरती गाय प्रसूती कळांनी व्याकुळ झाली होती. तिची अवस्था अत्यंत बिकट होती आणि तिला कावळे त्रास देऊ लागले होते. ही गाय 'फिरती' असल्याने तिचा कोणताही मालक जवळ नव्हता. अशा कठीण प्रसंगी, सेवानिवृत्त आरोग्य सहाय्यिका (सिस्टर) अलका अंधारे, राधा भजने आणि दीपाली भोळ यांनी ही परिस्थिती पाहिली.

### आरोग्य सेवेचा अनुभव आला कामी

अलका अंधारे यांनी आपल्या प्रदीर्घ वैद्यकीय अनुभवाचा वापर करत, कोणतीही कचर न करता स्वतःहून पुढाकार घेतला. त्यांनी आणि त्यांच्या भगिनींनी मिळून अत्यंत शिताफीने त्या गायीवर उपचार केले आणि तिची प्रसूती सुखरूप पार पाडली. एखाद्या आईची प्रसूती करताना डॉक्टरला जेवढे समाधान मिळते, तितक्याच आत्मीयतेने त्यांनी या मुक्या जनावराचे प्राण वाचवले आणि वासराला सुरक्षित बाहेर काढले. प्रसूतीनंतर त्या गायीला ऊब आणि अन्नाची गरज होती. या भगिनींनी केवळ प्रसूती करून आपले कर्तव्य संपवले नाही, तर स्वखर्चातून गायीसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था केली.

---

## ध्यान, नियम व सत्कर्मातून भगवंत कृपा : बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १२ एप्रिल-**

येथे बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांची भागवत कथा भाविकांच्या प्रचंड प्रतिसादात सुरु आहे. या संगीतमय कथेचे दुसरे पुष्प गुंफताना बालयोगी गोपाल महाराज यांनी मल, विक्षेप आणि आवरण असे तीन दोष आहेत. निषिद्ध कर्म करण्याची वासना तिथ मल दोष. स्नानसंध्या केल्याने दोष नष्ट होतात. तर चित्ताची चंचलता झाली की, विक्षेप दोष निर्माण होतो. देवाच ध्यान केल्याने विक्षेप संपून जातो. तिसरा आवरण जो पर्यंत बुद्धीच्या ठिकाणी अज्ञानाच आवरण आहे.

एकदा ज्ञान प्राप्त झाले की अज्ञानाच आवरण नष्ट होते. मनुष्य जीवन जगत असताना नित्य नियम असला पाहिजे. कथेचे श्रवण



असले पाहिजे. चांगले कर्म असले पाहिजे. आपण जे कर्म केले ते अंतिम समयी भोगून घ्यावे लागते असल्याचे दुसऱ्या दिवशी कथेच्या विवेंचनात सांगितले. कथेचे तिसरे पुष्प गुंफताना जीवनामध्ये साधक अवस्थेत ध्यान महत्वाच असल्याचं गोपाल महाराज कारखेडकर यांनी सांगितले.

मोडनिंब येथे गुरुवार पासून कथेला सुरवात झाली. राष्ट्रसंत सद्गुरू श्रीपादबाबा यांच्या २८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संगनबसवेश्वर मठ येथे सप्ताह पार पडणार आहे. रोज सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात टेंभुर्णी, मोडनिंब, अरण व बावी, गिड्डेवाडी, आष्टी, तेलंगवाडी, शेटफळ, जाधववाडी, तुळशी, बैरागवाडी, भेंड येथील हजारो भाविक सहभागी होतात. दिवंगत पत्रकार रवींद्र पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांनी भावपूर्ण शब्दांत त्यांचे कार्य अधोरेखित केले. मी येण्याच्या आठ दिवसांपूर्वीच वर्तमानपत्रात बातमी यायची, एवढं त्यांचं काम वेळेवर आणि जबाबदारीने असायचं. आता त्यांचा मुलगाही हे कार्य पुढे चालवत आहे, असे त्यांनी सांगितले.

---

## तरुणावर काचेच्या ग्लासने हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ एप्रिल-**

शहरातील हॉटेलमध्ये झालेल्या किरकोळ वादावादीचा राग मनात धरुन, तरुणाच्या उजव्या कानावर काचेच्या ग्लासने हल्ला केला. ही घटना गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास घडली. या प्रकरणी शाम भास्कर रांजणकर (वय ५०, रा. बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी) यांनी आकाश कोथमिरे (रा. वडर गल्ली, बार्शी) याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. रांजणकर हे त्यांचे मित्र गोविंद ननवरे यांच्यासह गुरुवारी दुपारी एका हॉटेलमध्ये बसले होते. यावेळी शेजारील टेबलवर दोन अनोळखी तरुण बसले होते. त्यातील एकाने रांजणकर यांच्या जवळ येऊन तुम्ही कोठे राहता, तुमचे नाव काय? अशी विचारणा करत त्यांच्याशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. हॉटेल मॅनेजर सुकुमार कांबळे यांनी मध्यस्थी करुन त्यांच्यातील हा वाद मिटवला. हॉटेलमधून शाम रांजणकर घरी जात असताना, आरोपी आकाश कोथमिरे याने त्यांना गाठले. मला उलट का बोलतोस? असे म्हणत त्याने शिवीगाळ केली आणि हातातील काचेचा ग्लास रांजणकर यांच्या उजव्या कानावर जोरात मारला.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बार्शी बसस्थानकात ९ तोळ्यांचे दागिने लंपास

**बार्शी, दि.१२ एप्रिल-**

धाराशिवला जाण्यासाठी बसमध्ये गर्दीत चढत असताना एका महिलेच्या पर्सची चेन उघडून नऊ तोळ्यांचे सोन्याचे दागिने पळविल्याची घटना बार्शी बसस्थानकावर घडली. ही घटना १० एप्रिल रोजी दुपारी २च्या सुमारास घडली.

याबाबत अरुणा हिंमतराव गिलबिले (वय ५५, रा. आष्टा, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी बार्शी शहर पोलिसांत फिर्याद दिली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ३० ग्रॅमचे सोन्याचे गंठण, १० ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस, ५ ग्रॅमची अंगठी, १८ ग्रॅमचे मिनी गंठण, ८ ग्रॅमचे मणिमंगळसूत्र व २० ग्रॅमचे सोन्याचे




दागिने व चांदीचे दोन करंडे, असा ऐवज चोरट्यांनी पळवला. याबाबत दिलेल्या फिर्यादी आष्टा येथे राहत असून, पती शेती करतात. त्यांची दोन्ही मुले नोकरी व व्यवसायानिमित्त धाराशिव येथे राहतात. त्यांच्याकडे जाण्यासाठी फिर्यादी महिला आष्टा येथून भावाच्या गाडीत बार्शी बसस्थानकावर आल्या होत्या. येताना त्यांनी सर्व दागिने पर्समध्ये ठेवून चेन लावली होती. धाराशिवला जाणारी बस आली आणि गर्दीतून आत चढल्या. त्यावेळी त्यांना चोरी झाल्याचे कळले.



## महत्त्वाचे



### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि १२ एप्रिल-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्याकडून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार तानाजी सावंत, मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



### भोजलिंगवाडी अंगणवाडी शाळेतील चिमुकल्यांचा कलाविष्कार

**सांगोला, दि. १२ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील चोपडी गावांतर्गत भोजलिंगवाडी अंगणवाडी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उल्लेखनीय व गौरवास्पद ठरला. विद्यार्थ्यांनी लावणी, शालेयगीत, भावगीत, लोकनृत्य सादरीकरण केले. याप्रसंगी व्यासपीठावर माजी सैनिक अमोल बाबर, दशरथ बाबर उपस्थित होते. यावेळी पहिलीसाठी दाखल पात्र मुलांना विद्यारंभ प्रमाणपत्र गुढीपाडवा पट वाढवा या उपक्रमांतर्गत देण्यात आले. पालकांकडून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी सानिका जावीर, अलका बाबर, सविता चौगुले, विजया मेखले, पुनम जवंजाळ, शोभा जवंजाळ, ताई जावीर, सविता बाबर, उषा बंडगर उपस्थित होत्या. यावेळी राहुल बाबर, गणेश चव्हाण, ज्ञानेश्वर बाबर, आगतराव चव्हाण, प्रताप बाबर, अमोल बाबर, आकाश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना बक्षीस देत कौतुक केले. सूत्रसंचालन उलका निकम यांनी केले. आभार अंगणवाडी सेविका मनीषा खळगे यांनी मानले.



### रयतचे सुनील भोसले यांना सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान

**वेळापूर, दि. १२ एप्रिल-**

रयत शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण विद्यालय, फळवणी येथे शिपाई पदावर कार्यरत असलेले सुनील भोसले यांचा सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. संस्थेत तब्बल ३९ वर्षे ६ महिने प्रामाणिक व निष्ठेने सेवा बजावून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विद्यालयात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संस्थेच्या व भोसले परिवाराच्या वतीने सुनील भोसले यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मिलिंद सरतापे, केदार सर तसेच महिला शिक्षिकांनी मनोगत व्यक्त करत भोसले यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक केदार, रिपाइं तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, माजी सरपंच सचिन पाटील, रिपाइंचे सुधीर भोसले, युवराज अवताडे, ॲड. आणासो डोंगरे, चेअरमन दत्तात्रय अवताडे, रिपाइं (आठवले) शाखाध्यक्ष महेंद्र धांडोरे, स्कूल कमिटी सदस्य जोतीराम अवताडे,जगन्नाथ वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य अशोक आसबे, कुरबावीचे उपसरपंच यशोदीप दणाने, होळे माजी सरपंच सौ.सुगंधा बाळू लोंढे, तसेच महेंद्र भोसले,अरुण भोसले, संजय खरे, पंकज भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

### सलगर बु. येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या साहित्यांची चोरी

**मंगळवेढा दि. १२ एप्रिल-**

सलगर बु. येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे गेट तोडून चोरट्याने आत प्रवेश करुन १७ हजार किंमतीचे विविध वस्तूंची चोरी करण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी शाखाधिकारी विजयकुमार मुदगूल यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.७ रोजी सांयकाळी ६.३० वाजता बँकेतील शिपाई मंहतेश पाटील यांनी बँक बंद करुन घरी गेले. दि.८ रोजी सकाळी ७ वाजता शिपाई बँकेत गेल्यावर त्यांनी फिर्यादीस फोन करुन कळविले की,बँकेचे कोणीतरी शटर उघडले असून तात्काळ तुम्ही बँकेकडे या. फिर्यादी व शिपाई यांनी बँकेत जावून पाहिले असता बँकेचे सी.सी.टी.व्ही,मॉनिटर,शटर, कुलूप,केबल असे अंदाजे दहा हजार रुपये किंमतीचे तोडून फोडून नुकसान केल्याचे दिसून आले. आतील लॉकर उघडण्याचा प्रयत्न केलेला दिसला. यावेळी सी.सी.टीव्हीचे डी.व्ही.आर चोरीला गेल्याचे निदर्शनास आले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## बार्शी तालुक्यातील शेळगाव-वाणेवाडी रस्ता प्रश्न पेटला

### आदेशानंतरही शासनाकडून कागदपत्रांची टोलवाटोलवी

### १० कोटींच्या निधीसाठी ग्रामस्थांचा लढा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १२ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या शेळगाव-वाणेवाडी रस्त्याचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांच्या सीमेवरील 'बसवेश्वर चौक' हा विकासाचा केंद्रबिंदू असूनही, केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे हा मार्ग रखडला आहे. याप्रकरणी स्थानिक अल्पभूधारक शेतकरी



व समाजसेवक दयानंद भगवान बादगुडे यांनी थेट लोकायुक्त आणि मंत्रालय स्तरावर लढा पुकारला असून, प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास तीव्र संघर्षाचा इशारा दिला आहे. आता चेंडू प्रशासनाच्या दरबारात असून, जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि सार्वजनिक बांधकाम मंत्रालय यावर काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

#### काय आहे मुख्य अडचण?

शेळगाव (आर) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोरून जुना काटी रस्ता (बसवेश्वर चौक) सीमा हद्द ते वाणेवाडी हा रस्ता जिल्हा व राज्य मार्गाला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, तांत्रिक कारणास्तव या मार्गाला अद्याप अधिकृत 'रस्ता क्रमांक' मिळालेला नाही. रस्ता अधिकृतरित्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दफ्तरी नसल्याने १० कोटी रुपयांचा प्रस्तावित निधी तांत्रिक कारणास्तव प्रलंबित आहे.

#### शेवटच्या श्वासापर्यंत लढा सुरू राहील



प्रशासकीय साखळी आणि स्वार्थी हितसंबंधांमुळे माझ्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, याची मला जाणीव आहे. पण वैयक्तिक मृत्यू पेक्षा गावाला विकासापासून वंचित ठेवणे हा मोठा गुन्हा आहे, असे मी मानतो. हा लढा शेवटच्या श्वासापर्यंत सुरू राहील.

**- दयानंद भगवान बादगुडे (अर्जदार, शेळगाव आर)**

#### लोकायुक्तांच्या आदेशाची पायमल्ली?

श्री. बादगुडे यांनी ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे लोकायुक्त कार्यालयात उपस्थित राहून आपली कैफियत मांडली होती. लोकायुक्तांनी या प्रकरणाची दखल घेत प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत. असे असूनही, सोलापूर आणि धाराशिव जिल्हा प्रशासन सीमेच्या वादावरून एकमेकांकडे बोट दाखवत वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप बादगुडे यांनी केला आहे.

#### स्वखर्चातून पुराव्यांची जुळवाजुळव

एका बाजूला प्रशासन दिरंगाई करत असताना, बादगुडे यांनी स्वतःच्या कुटुंबाच्या पोटाला चिमटा काढून, पदरमोड करत ड्रोन सर्व्हे, गुगल मॅपिंग आणि तांत्रिक नकाशे तयार केले आहेत. त्यांनी ६ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अभियंता (जि.प. बांधकाम, बार्शी) यांच्याकडे ७ संच कागदपत्रे जमा केली आहेत. यामध्ये गाव, तालुका नकाशा आणि गुगल मॅप, ग्रामपंचायत ठराव आणि लोकप्रतिनिधींची शिफारस पत्रे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे पत्र, या बाबींचा समावेश आहे.

#### बसवेश्वर चौक: विकासाचा 'झिरो पॉईंट'

बसवेश्वर चौक हा सोलापूर-धाराशिव आणि बार्शी-तुळजापूर या दोन जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या सीमेवर आहे. या चौकाच्या विकासावर संपूर्ण परिसराचे आर्थिक भवितव्य अवलंबून आहे. रस्त्याच्या कामाची वर्क ऑर्डर निर्गमित करताना 'बसवेश्वर चौक' (नशी झेळपीं) येथूनच कामाला सुरुवात करण्याची कायदेशीर अट असावी, अशी आग्रही मागणी बादगुडे यांनी केली आहे. आता रस्ते विकासासाठी ते ठाम उभे आहेत. हा रस्ता येणाऱ्या पिढ्यांच्या प्रगतीचा मार्ग आहे. भ्रष्टाचार आणि स्थानिक राजकारणामुळे यात खोडा घातला जात आहे. जर ३० दिवसांत या रस्त्याला अधिकृत क्रमांक देऊन निधी मंजूर झाला नाही, तर विधी सेवा प्राधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार, असे श्री. बादगुडे यांनी सांगितले.

## विठ्ठल-रुक्मिणी पादुका विसावा मंदिराचे जिर्णोध्दार हे आमच्या संस्कृतीचे जतन : परिचारक




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ एप्रिल-**

वाखरी ते पंढरपूर पालखी मार्गावरील मध्ययुगीन कालखंडापासूनचा इतिहास लाभलेल्या विठ्ठल रुक्मिणी पादुका विसावा मंदिराचा जिर्णोद्धार म्हणजे आमच्या संस्कृतीचे जतन करणेच आहे, यासाठी सर्वतोपरी सहकार्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन विधान परिषदेचे माजी सदस्य प्रशांतराव परिचारक यांनी केले.

विसावा मंदिराच्या जिर्णोद्धार शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी वारकरी संप्रदायातील संत मंडळी उपस्थित होती. यावेळी राणा महाराज वासकर म्हणाले, मंदिरासमोरील विहिरीचा जीर्णोद्धार होणे खूप गरजेचे आहे या विहिरीला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. येणाऱ्या महिना वारकरी तसेच वारीमध्ये येणाऱ्या वारकरी यांच्यासाठी या ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध होतील उपलब्ध करून देण्यासाठी त्या पद्धतीने या व्यवस्था व्हावी. विसावा मंदिराचे विश्वस्त व भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष काशिनाथ थिटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर माजी आमदार प्रशांत परिचारक, शंकर महाराज बडवे, ह.भप.राणा महाराज वासकर, डॉ.प्रशांत सुरू, निवृत्ती महाराज नामदास, बापूसाहेब महाराज देहूकर, ऋषिकेश उत्पात, मुख्याधिकारी महेश रोकडे, अभयराव वांकरएकनाथ महाराज देशमुख (जळगावकर), रंगाप्पाजी, रघुनाथ महाराज कबीर, नागेश महाराज बागडे, समाजसेवक गणेशभाऊ अधटराव, सिकंदर ढवळे, विठ्ठल महाराज चवरे, आबासाहेब महाराज भोसेकर या मान्यवर व महाराज मंडळीच्या हस्ते नारळ वाढवून जीर्णोद्धार कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी पहिल्या टप्प्यातील रंग काढण्याचा पूर्ण खर्च श्री लक्ष्मी नृसिंह देवस्थान नीरानरसिंहपूरचे विश्वस्त व आळंदी देवस्थानचे पूर्व विश्वस्त डॉ.प्रशांत सुरू यांनी याप्रसंगी समर्पित केला. तसेच सुधा मोरे यांनी देखील उत्स्फूर्तपणे पंचवीस हजार रुपयांची देणगी याप्रसंगी समर्पित केली. अभय शिटे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला. सूत्रसंचालन डॉ.सचिन लादे यांनी केले.

## टेंभुर्णीत पोलिसांचा रूट मार्च; दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

### जयंती उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची सज्जता

### कायदा, सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांना इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १२ एप्रिल-**

आगामी सण, उत्सव व महापुरुषांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या वतीने रविवारी शहरात रूट मार्च काढण्यात आला. याचबरोबर दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेऊन पोलिसांनी आपली तयारी दर्शविली.

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परी. सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत टेंभुर्णी शहरातील मुख्य रस्ते व मध्यवर्ती भागातून पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांच्या उपस्थितीत शिस्तबद्ध रूट मार्च पार पडला. सरकारी वाहनांच्या ताफ्यासह झालेल्या या मार्चमुळे शहरात पोलिसांची ठोस उपस्थिती जाणवली.

यानंतर पोलीस ठाण्याच्या आवारात दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. यामध्ये लाठी, हेल्मेट, ढाल, गॅस गन, रायफल आदी साहित्यांसह पोलिसांनी प्रात्यक्षिक सादर करून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.

त्यानंतर मोडनिंब शहरातही मुख्य रस्ते व मध्यवर्ती भागातून रूट मार्च काढण्यात आला. या उपक्रमाद्वारे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करत, कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश पोलिसांनी दिला.

या रूट मार्च व रंगीत तालीमीत पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तसेच माढा पथकाचे होमगार्ड सहभागी झाले होते.


## तालुकानिहाय पटपडताळणीत माढा-मोहोळ आघाडीवर

### मनपा क्षेत्रात उपस्थिती कमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ एप्रिल-**

जिल्हा परिषद सोलापूरच्या प्राथमिक शिक्षण विभागाने राबविलेल्या पटपडताळणी मोहिमेत तालुकानिहाय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे चित्र समोर आले असून, ग्रामीण भागात समाधानकारक प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्याची एकूण उपस्थिती ९६.५० टक्के नोंदली गेली असली तरी काही तालुक्यांमध्ये तुलनेने कमी उपस्थिती आढळून आली आहे.

तालुकानिहाय आकडेवारीनुसार मोहोळ (९९.५३%) आणि माढा (९९.४४%) हे तालुके सर्वाधिक उपस्थितीसह आघाडीवर राहिले. या दोन्ही तालुक्यांमध्ये जवळपास शंभर टक्के विद्यार्थी शाळेत उपस्थित होते. बार्शी (९८.७०%), माळशिरस (९८.६१%) आणि मंगळवेढा (९८.५८%) या तालुक्यांनीही उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. करमाळा (९७.९०%), सांगोला (९७.७३%) आणि पंढरपूर (९७.०२%) या तालुक्यांमध्येही विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक राहिली. मात्र, उत्तर सोलापूर (९६.८४%) आणि अक्कलकोट (९५.१७%) येथे उपस्थितीचा टक्का तुलनेने कमी असल्याचे दिसून आले.विशेषतः मनपा सोलापूर क्षेत्रात केवळ ९२.४७ टक्के उपस्थिती नोंदली गेली असून, ही जिल्ह्यातील सर्वात कमी उपस्थिती आहे. शहरी भागातील





पट पडताळणी मोहिमेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची उपस्थिती ९६.५० टक्के इतकी दर्शवली गेली. आता या पुढील पट पडताळणी मोहीम दि.१५ आणि २२ एप्रिल रोजी होणार आहे. त्यानंतर एकूण आकडेवारी समोर येणार आहे.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी**

ही स्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

या मोहिमेमुळे तालुकानिहाय शिक्षण व्यवस्थेचे वास्तव चित्र स्पष्ट झाले आहे. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची शाळेकडे असलेली ओढ सकारात्मक असल्याचे दिसून येत असताना, शहरी भागात अजूनही सुधारणा करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. शिक्षण विभागाकडून यापुढे उपस्थिती वाढीसाठी अधिक प्रभावी नियोजन करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी स्वतः मोहोळ येथील डी.व्ही. गायकवाड प्राथमिक शाळा आणि स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेत जाऊन पडताळणी केली सध्या शाळांच्या वार्षिक परीक्षा सुरू असून आलेली कार्यांनी हजेरी पत्रकाच्या मदतीने उपस्थित विद्यार्थ्यांची नोंदी घेतली.

**तालुकानिहाय शाळांची पटपडताळणी**

| तालुका | शाळा | पटसंख्या | उपस्थित | अनुपस्थित | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अक्कलकोट | ७१ | ९,९२३ | ९,४४४ | ४७९ | ९५.१७% |
| बार्शी | ३८ | ४,९३५ | ४,८७१ | ६४ | ९८.७०% |
| करमाळा | २० | २,३७८ | २,३२८ | ५० | ९७.९०% |
| माढा | ६० | ५,४८८ | ५,४५७ | ३१ | ९९.४४% |
| माळशिरस | ४९ | ८,२११ | ८,०९७ | ११४ | ९८.६१% |
| मंगळवेढा | २३ | ३,५३२ | ३,४८२ | ५० | ९८.५८% |
| मोहोळ | १७ | ३,३७६ | ३,३६० | १६ | ९९.५३% |
| पंढरपूर | २६ | ४,४६४ | ४,३३१ | १३३ | ९७.०२% |
| सांगोला | २५ | ३,७३७ | ३,६५२ | ८५ | ९७.७३% |
| उत्तर सोलापूर | ३९ | ७,५११ | ७,२७४ | २३७ | ९६.८४% |
| मनपा सोलापूर | ३६ | १५,६७६ | १४,४९६ | १,१८० | ९२.४७% |